IRBK-0100084

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे

विषय नाटक

दा क्र ८४

IRBK-0100084

IRBK-0100084

# पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना.

हें नाटक **करमणुकीच्या** यंदांच्या **वसंत अंकांत** चैत्र शु० प्रति-च्या दिवशीं प्रसिद्ध झालें. तें लिहिलें, त्यावेळीं श्राव्य म्हणून लिहिलें, य म्हणून लिहिलें नव्हतें. परंतु **नाट्यकलाप्रवर्तक मंडळीच्या** चालकांस रंगभूमीवर आणावें असें वाटून त्यांनीं माझी अनुमति मागितली. ती मीं त्यांस मोठ्या आनंदानें दिली. श्राव्याचें दृश्य करण्यासाठीं मळ आवृत्तींत अर्थातच फेरफार करणें अवश्य झालें. तेव्हां मीं मंडळीच्या व माझ्या विचारें योग्य वाटेल ते फेरफार करून व नवे प्रवेश लिहून दिले. त्याचप्रमाणें त्यास गीत रूप देणेंही इष्ट वाटलें. मूळ नाटकांत **सखूबाईच्या** मुखीं **श्रीज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, जनाबाई** आदिकरून संतांचे अभंग घातले होतेच. रंतु रागदारींत गातां येतील अशीं पदेंही या व इतर कित्येक पात्रांच्या तोंडीं पाहिजेत असें वाटून योग्य ठिकाणीं नवीन पदें करवून घातलीं. हीं पदें रा० **कृष्णाजीपंत महेश्वरकर** यांनीं रचून दिलीं याबद्दल मी [illegible] फार आभारी आहें. नाटक रंगभूमीवर आणण्याचे कामीं **नाट्यकलाप्रवर्तक** मंडळीनें फार परिश्रम केले, याबद्दल त्यांचेही मी मनःपूर्वक आभार मानतों. या नाटकाचा पहिला प्रयोग ता० २६ आगस्ट रोजीं पुणें येथें विजयानंद थिएटरांत झाला.

संतचरित्रकार महीपतिबोवा यांच्या संतलीलामृतांत ३५ व्या अध्यायांत ही सखूबाईची कथा आहे. ती या नाटकास आधार होय. ती कथा वाचकांस थोडक्यांत समजावी म्हणून कथानुसंधानास अनावश्यक तो भाग वगळून **महीपतिबोवांच्याच** शब्दांत पुढें दिली आहे.

रंगभूमीवर जसा याचा स्वीकार लोकांनीं केला तसाच पुस्तकरूपानेंही करावा अशी सर्वांस विनंति आहे.

पुणें,
ता० १६ आक्टोबर, [illegible]

ह. ना. आपटे.

[illegible] ठाणे, [illegible]
नाट्य

मराठी ग्रंथसंग्रहालय नं. ठाणे

# संत सखूबाईचें चरित्र

( महीपतिकृत संतलीलामृत, अध्याय ३५ )

श्री

आतां कृष्णातीरीं साचार । करवीर नगर । तेथें नांदत होता एक द्विजवर । त्याचें चरित्र अवधारा ॥ १३ ॥ आपण कांता दोघेजण । एकचि पुत्र एकचि सून । चौघें मनुष्य असती जाण । परि कठिण मन तयांचें ॥ १४ ॥ सुनेलागीं सासुरवास । अखंड करिती रात्रंदिवस । धंदा करितां उसंत नसे । परि गार्‍हाणें कोणासी सांगेना ॥ १५ ॥ तिचें नाम सखू निधान । अखंड करी नामस्मरण । केशव विठ्ठल रुक्मिणीरमणा । राम कृष्ण गोविंदा ॥ १६ ॥ क्षमा शांति धरोनि मनीं । सुखदुःख साहिलें मानी । देवाचें रूप ऐकिलें कानीं । तें ध्यानांत आणी अखंड ॥ १७ ॥ सासू कर्कशा मोटी कठीण । अपशब्द करोनि बोले हेळण । तेणें हृदयीं वसती बाण । परि जाब परतोन देईना ॥ १८ ॥ खाया न देती पोटभरी । शिळीपाकी मीठ भाकरी । तितुकें मात्र खावोनि रात्रीं । प्राणरक्षण करितसे ॥ १९ ॥ सून सारवूं लागली घर । सासू हिरोन घेत पोतेर । धुःसा देती गालावर । कोरडी कर भोय ऐसी ॥ २० ॥ पाणी आणितां साचार । रांजणासी खालीं पाडिलें छिद्र । कां गे करिसी भराभर । उलटें उत्तर बोलती ॥ २१ ॥ घरीं साटोपा नानाप्रकार । सासूचें ओळखण तयावर । कांहीं होतां सणवार । उच्छिष्ट पोटभर मग देती ॥ २२ ॥ ऐसी त्यांची घरस्थित । घरोघरीं असे विदित । कोणी सांगती न्यायनीत । तरी कलागत त्यांसी करिती ॥ २३ ॥ तंव कोणे एके अवसरीं । यात्रा चालली पंढरपुरीं । गरुडटके निशाण भेरी । वैष्णव गजरें डुल्लती ॥ २४ ॥ सर्व यात्रा घेवोनि बहुत । पंढरीस चालले वैष्णवभक्त । कृष्णातीरीं अकस्मात । येवोनियां उतरले ॥ २५ ॥ तों सखू परम सासुरवासिनी । घागर घेऊनि वाहे पाणी । प्रानवशा गेली

तेक्षणीं । तों यात्रा नयनीं देखिली ॥ ३८॥ हरिचरित्रें गाती संत । ऐकतां रमलें तिचें चित्त । मग शेजारिणीसी बोलत । पंढरीस निश्चित मी जातें ॥ ३९ ॥ सासू सासरा परम कठिण । ऐकतां घेतील माझा प्राण। तरी न यें घरासी परतोन । निश्चय मनीं दृढ केला ॥ ४० ॥ ऐसें म्हणोनि चित्तांत । जावोनि बैसली यात्रेंत । संतांसी नमन करोनि त्वरित । म्हणे तुम्हां सांगातीं मी येत ॥ ४१ ॥ हें दृष्टीसी देखोनि । आश्चर्य करीत शेजारिणी । मग पानवथां घागरी ठेवोनि। गेली सदनीं सांगावया ॥ ४२ ॥ सासूसि सांगे लवलाहें । म्हणे बाई बैसलीस काय । सून तुझी अगोचर आहे । आलें प्रत्यया मजलागीं ॥ ४३ ॥ यात्रेकरांचा धरोनि हात । पंढरीस चालली मज देखत । आपुले दृष्टीस पाहोनि तेथ । आलें त्वरित सांगावया ॥ ४४ ॥ नगरवासी बोलती जन । सून भली सासू कठीण । परी तुझा अन्याय नसे जाण । मजलागोनि कळों आलें ॥ ४५ ॥ ऐसें सांगतां शेजारणी । हृदयीं धडकला क्रोधाग्नि । मग पुत्रासी तयेक्षणीं । गोष्ट जावोनि सांगत ॥ ४६ ॥ यात्रेकऱ्यांचा धरोनि हात । रांड जाती देखत देखत । जिणें वागविसी जनांत । क्लीब निश्चित तूं होसी ॥ ४७ ॥ ऐसें सांगतां मातेनें । पुत्र झाला क्रोधायमान । कृष्णातीरीं गेला धांवोन । कांतेसि धरोनि आणावया ॥ ४८ ॥ मग यात्रेमाजीं येउनी । भार्वेते पाहे विलोकुनी । तिसी ओळखोनी ते क्षणीं । हृदयीं क्रोधाग्नी भडकला ॥ ४९ ॥ ताडण करितां तयेक्षणीं । ओढीत चालविली धरोनि वेणी । ऐशा रीतीं आपुल्या सदनीं । गेला घेवोनि तेधवां ॥ ५० ॥ सासू सासरा आणि पती । विचार करिती एकांतीं । आतां हे आंवरेल कैशा रीतीं । जाहली फजिती लोकांत ॥ ५१ ॥ जनांत आहाणा बोलती ऐसा । रांड भांड आणि म्हैसा । खवळे तरी नावरे सहसा । अनुभव तैसा आला कीं ॥ ५२ ॥ ऐसें बोलोनि एकमेकांसी । सवेसि बांधिलें खांबासी । म्हणती अन्नोदक न द्यावें इसी। तेव्हां आपसी आकळेल ॥ ५३ ॥ पंधरा दिवस साचार । यात्रा वाहील निरंतर । बांधिली असों द्या तोंवर । ऐसा विचार दृढ केला ॥ ५४ ॥ निर्दयपणें बांधिली जाया । किंचित् नाहीं भूत-

द्या । चव्हाटे मांसांत बुडोनियां । गेलीं असती सर्वही ॥ ५५ ॥ गृहस्थित कठिण म्हणोनि । परके माणूस न ये सदनीं । सोडवितें तिजलागोनि । त्रिभुवनींही दिसेना ॥ ५६ ॥ परी सखू प्रेमळ भाविक । अंतरीं करोनि विवेक । सुख तैसें मानी दुःख । न धरी शोक मानसीं ते ॥ ५७ ॥ चित्तीं रूप आठवोनियां । म्हणे धांव पावें पंढरीराया । मज घातलें बांधोनियां । तरी तुझिया पायां अंतरलें ॥ ५८ ॥ तंव देवाधिदेवें तयेक्षणीं । सखूचा धांवा ऐकिला कानीं । ...मग देव ते अवसरीं । सत्वर आले करवीरपुरीं । स्त्रियेचें रूप धरूनि श्रीहरी । लाघव करी तेधवां ॥ ६९ ॥ सखूचें रूप जैशा रीतीं । तैसाचि झाला रुक्मिणीपती । त्याचे सदनीं अर्धरात्रीं । प्रकटोनियां काय करी ॥ ७० ॥ जया ठायीं कोंडिलें तिसी । तेथें उभा राहोनि हृषीकेशी । सखू सखू म्हणोनि तिसी । हांका मारी तेधवां ॥ ७१ ॥ ऐकोनि म्हणे सासुरवासिण । बाई तूं कवणाची कवण । प्रत्युत्तर देत जगज्जीवन । मी यात्रेकरीण पंढरीची ॥ ७२ ॥ यात्रेस न्यावया तुजप्रती । येथें आलें सत्वरगती । सखू म्हणे मज निश्चिती । बांधोनिया घातलें ॥ ७३ ॥ तूं न्यावया आलीस निर्धारें । परि माझें प्राक्तन विचित्र । पापियासि कैचें पंढरपुर । आहाणा सर्वत्र बोलती ॥ ७४ ॥ यावरी बोले यात्रेकरीण । मी तुझ्या जन्माची मैत्रीण । तुझ्याबारीचें घेतें बांधान । यात्रा करोनि तूं येई ॥ ७५ ॥ ऐसें म्हणोनि पंढरीराय । सोडिले तिचे हातपाय । रात्रीमाजीं तीतें लवलाहें । नेवोनि तेथें घातली ॥ ७६ ॥ भक्तिभावें भुलला हरी । मागुती येवोनि तिचे घरीं । आपुल्या हातें घेवोनि दोरी । बांधोनि घेत जगदात्मा ॥ ७७ ॥ भावार्थाचा भुकेला देव । नाठवोनि आपुलें थोरिव । भाविकाच्या कार्यासि धांवे । अवतार नाना रचोनि ॥ ७८ ॥ सासू सासरा नाना रीतीं । दुरुत्तरें शिव्या देती । तितुकेंही सोसूनी श्रीपती । संतोष चित्तीं मानितसे ॥ ८० ॥ ऐसें पंधरा दिवसपर्यंत । बांधोनि घेतलें वैकुंठनाथं । तंव सखूचा भ्रतार तेथ । विचार करीत मानसीं ॥ ८१ ॥ अन्नोदकावीण निश्चित । इसी बांधिलें दिवस बहुत । प्राण जातील अ- स्मात । मग मी निश्चित काय करूं ॥ ८२ ॥ ऐसें म्हणोनि भ्रतारें । बंधन

सोडित आपुल्या करें । मग बोलोनि मधुरोत्तरें । समाधान करीतसे ॥ ८४॥ वडिलीं गांजिली नानारीतीं । त्याचा राग न धरावा चित्तीं । आतां स्नान करोनि सत्वरगती । पाकनिष्पत्ति करावी ॥ ८५ ॥ ऐसें ऐकतांचि वचन ॥ संतोषला जगज्जीवन । म्हणे सखूच्या कृपेंकरून । बंधनापासोनि सूटलों । ॥ ८६ ॥ आतां अदृश्य जाहलों जरी । तरी तीतें गांजितील परोपरी । म्हणोनि यात्रा फिरोनि ये जोंवरी । तोंवरी येथें असावें ॥ ८७ ॥ मग स्नान करोनि वैकुंठनाथ । स्वहस्तें केली पाकनिष्पत्त । तिचें जेविलीं तिच्या हातें । संतोषयुक्त तेधवां ॥ ८८ ॥ एकासि एक बोलती उत्तर । आजि अन्न लागलें रुचिकर । तया मागून शार्ङ्गधर । जेविले साचार तेधवां ॥ ८९ ॥ धंदा सारोनि ऐशा रीतीं । तों अस्तमाना गेला गभस्ति । भ्रतारें धरोनियां हातीं । शेजेप्रती नेतसे ॥९०॥ प्रेमभक्तीनें बांधिला हरी । बैसोनि त्याच्या पलंगावरी । सांडोनि महत्त्वाची थोरी । चरण चुरी स्वहस्तें ॥ ९१ ॥ एकांत देखोनि ते अवसरीं । कामातुर जाहला अंतरीं । ऐसें जाणोनि श्रीहरी । विचार करी मनांत ॥ ९२ ॥ माझा तो पुरुषदेह जाण । सर्वथा न कळे यालागून । जरी न देतां भोगदान । तरी मोडेल मन पैं याचें ॥ ९३ ॥ आम्ही अदृश्य जाहलियावरी । मग तिसी गांजील नानापरी । खळखळ होईल जन्मवरी । ऐसें विचारी जगदात्मा ॥ ९५ ॥ ऐसा विचार करोनि तेथें । स्त्रीदेह केला अनंतें । चित्तीं न होवोनि संकोचित । त्याचे मनोरथ पुरवले ॥ ९५ ॥ भक्तकार्यानिमित्त हरी । लज्जा न धरी अंतरीं । होवोनियां त्याची नारी । पपंच बोहरी करीतसे ॥ १०२ ॥ काम उद्भवतां अर्जुनासी । ऐसें जाणोनि हृषीकेशी । मग सुभद्रा होवोनि वेगेंसि । भोग तयासी दीधला ॥ १०३ ॥ ऐशा रीतीं शार्ङ्गधर । गुंतोनि राहिला साचार । तों इकडे सखू आनंदें गजरें । पंढरपुरा पावली ॥ १०८ ॥ चंद्रभागेसि करोनि स्नाना । सखू चालली देवदर्शना । परम अनुताप धरोनि मना । लोटांगण घालीतसे ॥ ११२ ॥ सखू बोले ते अवसरीं । कुडींत जीव आहे जोंवरी । मी न जाय सीमेबाहेरी । क्षेत्र पंढरी टाकोनि ॥ १२१ ॥ ऐशी प्रतिज्ञा करून । पांडुरंगाचें आठविलें ध्यान । तत्काळ प्राण सोडिला

तिनें । अचेतन प्रेत जाहलें ॥ १२२ ॥ तों करवीर नगरासमीप जाण । किवळ गांवींचा ब्राह्मण । यात्रेसि आला होता त्यानें । प्रेत दुरोनि देखिलें ॥ १२३ ॥ मग यात्रेकरीयांसि बोले वचन । करवीर क्षेत्रींचा अमका ब्राह्मण । ही सखू तयाची सून । मृत्युसदना पावली ॥ १२४ ॥ आपण देखिलें दृष्टीसीं । तरी अग्निसंस्कार द्यावा इसी । परतोनि गेलिया घरासी । मग तयासी श्रुत करूं ॥ १२५ ॥ प्रेत उचलोनि सत्वरी । त्यानें नेलें भीमातीरीं । शुभा घेवोनि बाजारीं । मसणावरी रचियेल्या ॥ १२६ ॥ सखूच्या प्रेतासिं देवोनि अग्न । स्नान करोनि म्हणे गेलें पिशुन । ऐसें देखोनि वर्तमान । माता रुक्मिणी चिंतातुर ॥ १२७ ॥ जिच्या कैवारास्तव जाण । स्वरूप धरिलें जगज्जीवनें । ती तरी पावली सायुज्यसदन । केलें दहन प्रेताचें ॥ १२८ ॥ श्रीहरीच्या वियोगें जाण । घटिका जाती युगासमान । तरी सुटोनि येती जगज्जीवन । तो उपाय त्वरेनें योजावा ॥ १३० ॥ ऐसें म्हणोनि मानसीं । माता गेली दहनापासीं । अस्थि होत्या स्मशानासीं । त्या दृष्टीस ओळखिल्या ॥ १३१ ॥ ऐसी जगन्माता जाण । अमृतदृष्टीं पाहतां तिनें । सखू उठली न लागतां क्षण । अतर्क्य विंदान मायेचें ॥ १३४ ॥ रात्रिसमयीं निद्रिस्त होतां । दृष्टांतीं येवोनि सांगे माता । तूं घरासि परतोनि जाई आतां । संशय चित्तीं न मानीं ॥ १३५ ॥ या देहीं न जाय परतोन । ऐसी वाहिली होती आण । त्या कुडीचें जाहलें दहन । जन्म नूतन लाधलीसि ॥ १३६ ॥ गोपाळकाला जाहलियावरी । मातेची आज्ञा वंदूनि शिरीं । मग यात्रेकरांबरोबरी । करवीरनगरीं ते आली ॥ १३७ ॥ सखूचें रूप धरोनि हरी । राहिले होते तिचे घरीं । सांज्यावरी घेवोनी घागरी । पाणवथा सत्वरीं ते आली ॥ १३८ ॥ दृष्टीसी देखतां ते वेळ । उभयतां भेटती तत्काळ । म्हणे यात्रा जाहली कां सफळ । दीनदयाळ पुसतसे ॥ १३९ ॥ सखूनें दृढ धरिले पाय । म्हणे तुझ्या धर्मे घडली माये । तुझा उपकार आठवूं काय । बोलतां नये सर्वथा ॥ १४० ॥ यात्रेसि जाऊनि आली त्वरित । ऐसें कोणासि नाहीं श्रुत । घागर बुडवोनि जळांत । निज मंदिरीं प्रवेशली ॥ १४२ ॥ तों क्षिवळकर

ब्राह्मण । ज्यानें प्रेतासि दिला अग्न । तो सांगावया ये त्वरेनं । पावली निधन म्हणोनि ॥ १४३ ॥ करवीरास येऊन सत्वरीं । पाहते जाहले ते अवसरीं । तों सखू संसारधंदा करी । आश्चर्य अंतरीं त्या जाहलें ॥ १४४ ॥ सासू-सासऱ्या बोलावून । स्वमुखें सांगे वर्तमान । इचें प्रेत आम्हीं बोळखून । स्वहस्तें दहन केलें कीं ॥ १४५ ॥ सोडोनियां क्षेत्र पंढरी । येथें सांगावया आलों सत्वरीं । तों सखू कामधंदा करी । नवल अंतरीं वाटलें ॥ १४६ ॥ सासूसासरा सुनेसि पुसत । तुज बांधोनि घातलें हातें येथ । कैसी गेलीस यात्रेत । सांग आम्हांस ये समयीं ॥ १४७ ॥ सखू म्हणे ते अवसरीं । लोट-लिया अर्धरात्रीं । मजाचि ऐशी दुसरी नारी । आली मंदिरीं आपुलिया ॥ १४८ ॥ मजला सोडोनियां जाण । म्हणे पंढरीस जाय त्वरेनें । आपुल्या स्वहस्तें तिनें । घेतलें बांधोनि मज देखतां ॥ १४९ ॥ मी परतोनि ये जों माघारीं । आजवर होती आमुचे घरीं । मज भेटली कृष्णातीरीं । ठेविली घागर पानवथां ॥ १५० ॥ कांहीं पुसावी गोष्ट मात । तों अदृश्य जाहली तेथ । तिचीच घागर घेवोनि निश्चित ॥......

सासूसासरा आणि पती । अनुताप जाहला तयांप्रती । म्हणती तो होता रुक्मिणीपती । निश्चय चित्तीं बाणला ॥ १५२ ॥

# संगीत संत सखूबाई.

## अंक १ ला.

### प्रवेश १ ला.

[ स्थळ—कऱ्हाड, कृष्णानदीच्या कांठचा घाट—घाटाच्या निरनिराळ्या भागांवर कांहीं स्त्रिया धूत आहेत; कांहीं स्नानें करीत आहेत; कांहीं पाणी भरीत आहेत; कांहीं पुरुष संध्यावंदन, कांहीं स्नान करीत आहेत; कांहीं मुलें इकडे तिकडे उड्या मारीत भटकत आहेत; वारकरी वगैरे जात येत आहेत; एके बाजूस विटोबाचें देऊळ आहे, त्या देवळाचे पुढें बऱ्याच मुली उभ्या असून पुढील मंगलाचरणरूप पद म्हणत फुलें उधळतात. ]

**पद.**

जय जगन्निवास सुखसदना ॥
सद्रूपा मुनिहृत्कमलाविकसना नमितों ॥
अगम्य तव पद सुरांस ॥ जय० ॥ ध्रु० ॥
ध्यानिं मनीं निशिदिनीं मुनी ध्याती सदा ॥
स्वरूप तव सुरनरही पूर्ण ब्रह्म निर्गुण ॥
परि तव मूर्ती मनीं सगुणा-ठसवुनि-रमती-जनते-
अं-तीं-जा-ती वैकुंठीं स्थिरचिरसुखकर पदास
॥ जय० ॥ १ ॥

तन मन वाहियेलें तुझे पायीं बुधीं ॥
सुकृत तें अघ हरतें—दुःख दैन्य सौख्यही ॥
समजती सम तें जणूं तरणी—भवनिधी—तरुनि
पतितां—

ने--ती--त्यां--ची--या--चित्तीं--विचरुनी पाळिसी
जगास ॥ जय० ॥ २ ॥

पद.

नटसि तूं नटापरी । विठ्ठला ॥
पंढरींत क्रीडसी श्रीहरी ॥
चरण विटेवर । ठेवुनि कटिं कर ।
प्रगट जग करुनी । हरितोसि उदरिं ।
उचित समयीं अवतार धरिसि बहु,
स्वजन निष्ट करी । नच आस दुसरी ॥ १ ।

[ आपलें वंदन आटपून मुली आपापल्या घागरी वगैरे घेऊन जातात, तों दुसऱ्या बाजूनें चंद्रभागा, भीमा आणि अनसूया आपापल्या कमरेवर घागरी व धुणीं घेऊन बोलत बोलत येतात. तिघीही मुली तरुण- १८ पासून २० वर्षांच्या आंतबाहेर आहेत. ]

अनसूया:- छे. छे. छे. बाई ! कोणीं काय वाटेल तें जरी म्हटलं तरी असा सासुरवास कांहीं बाई कधीं आम्हीं पाहिला नाहीं, आणखी भोगलाही नाहीं.

चंद्रभागा:- अग अनसूये, हा सासुरवास कसला ! हा पूर्वजन्मींचा दावा साधून घेत आहे झाल म्हाळसाकाकू. मला बाई सांगूं का काय वाटतं तें ?

अनसूया:- सांग पाहूं.

चंद्रभागा:- मला वाटतं, कीं ती आपली सखू म्हणूनच इतके दिवस हा छळ सहन करून जगली. मला जर इतका सासुरवास असता तर मीं एक जीव तरी दिला असता, नाहींतर पळून गेलें असतें.

भामा:- ( चंद्रभागेपुढें हात ओंवाळून ) अहाहाहाहाहाहाऽऽ काय पण अक्कल ! म्हणे मीं जीव तरी दिला असता, नाहीं तर पळून तरी गेलें

असतें. जीव द्यायचं काम कांहीं सोपं नाहीं. बाकी पळून जाण्याची तुला संवयच आहे.

**चंद्रभागाः**— अन् तुला काय ती संवय कमी आहे ? लग्गीन झाल्यावर चारदां तर सासऱ्याहून माहेरीं पळून आली होतीस. लहानपणीं मेलं आपलं सासरचं भयच वाटतं, आणखी माहेरचं वेड असतं. अन् त्यांत माहेर गांवांतल्या गांवांत असलं कीं आपलं एखादे वेळीं डोळा चुकहूं ऽऽ (हंसते व तिचें भुंवयां उडाविणें व हातवारे पाहून बाकीच्या दोघी हंसतात.)

**भीमाः**— पण आतां हो चंद्रभागाबाई ? आतां मला वाटतं लोटून घालवल्या आपल्याला तरी सुद्धां जायच्या नाहीं माहेरीं आपण. काय मेलं एवढं सारा दिवस दोघं हितगुज करीत असतां कोण जाणें. काय तुम्हीच एक मुलखावेगळीं नवराबायको आहां ! अनसूये, हिची सासू कालच आमच्या सासूबाईजवळ सांगत होती कीं, पोरांनीं अगदीं लाजा सोडल्या. आणखी हिचे मामंजीसुद्धां माझ्या मामंजींजवळ असंच म्हणत होते कीं, पोरगा घरचं सावकारीचंन् शेतीभातीचं कांहीं पहात नाहीं. आपला बायकोच्या मागें मागें असतो ! पण बाई, मी हें सांगतें आहें तरी कोणाला? अनसूयाबाई, काल मी आपल्या घरीं सकाळीं आलें, तेव्हां आपले यजमान गाईची धार काढीत होते आणखी त्यांच्या खांद्याशीं वांकून आपण........

**अनसूयाः**— इश्श मेले भिमे, तुला असं हें बोलायची लाज कशी नाहीं वाटत ? अन् केवढ्यानं मोठ्यानं बोलतेस ? आपण आहोंत कुठें कांहीं विचार आहे का नाहीं ? कोणी ऐकलं तर म्हणेल काय ?

**चंद्रभागाः**— भिमे, तुझ्या नशिबीं हें असं सुख नाहीं, म्हणून का तूं हीं अशी आमची थट्टा करितेस ? पण बिचाऱ्या सखूसारखी तर तुझी स्थिति नाहीं ना ? उठल्याबसल्या मार तर खावा लागत नाहीं ना ?

**भीमाः**— ( उसासा टाकून ) चंद्रे, तें दिखिल झालं असतं,

मामंजींचीन् सासूबाईची मर्जी संभाळून असतें म्हणून आपलं निभावलं आहे. नाहीं तर माझे हाल कुत्रासुद्धां खाता ना.

अनसूया:– असं कां म्हणतेस ? तुझी सासू आणखी सासरा दोघेंही चांगलीं आहेत.

भीमा:– अग अनसूये, सगळीं चांगलींन् सगळीं वाईट. एक दिवस थोडं मर्जीच्या बाहेर वागूं दे म्हणजे पहा काय माझी स्थिति होते ती. अग बाई, कामावे तें सामावे. ( असें म्हणून घागर खालीं ठेवून तिच्या तोंडावर धुणीं ठेवते. )

चंद्रभागा:– हें काय ? इथें मुक्काम करायचा आहे वाटतं ?

भीमा:– अग, थांबूं या अंमळ. घाई मेली रोजचीच आहे.

अनसूया:– भिमे, तूं सगळं म्हणतेस खरं, पण—

पद.

कठिण कठिण गति सखुची दिसते ॥
उगिच तिला छळछळुनी घेती ॥
धन्य बिचारी सोसुनि बसते ॥ ध्रु० ॥
दिनभर देती कष्ट जिवाला ॥
घाण्याला जणुं बैल जुंपिला।
उसंत कशि ती नाहीं तिजला ॥
कसा तरी ती काळ कंठते ॥ १ ॥
तैलकार तरी निज वृषभाला ॥
तत्कष्टाचा पिंड तयाला ॥
संतोषानें दे खायाला ॥
परि न बापुडिस अन्नहि पुरतें ॥ २ ॥

चंद्रभागा:– हें बरीक खरंग बाई ! भिमे, तूं आपल्या काम करण्याच्यान् शहाणपणाच्या मोठ्या गोष्टी सांगतेस, पण ती बिचारी सखू सकाळपासून संध्याकाळपर्यंत एखाद्या घाण्याच्या बैलासारखी जुंपलेली असते आतां अनसूया म्हणाली तशी अगदीं तिची स्थिति आहे. क्षणभर तिला उसंत [illegible] तरी त्याचा मालक विसांवा देतो आणखी

त्याची पाठ थोपटून त्याच्याच मेहनतीनं तयार झालेली पेंड त्याला प्रेमानं चारतो. पण इथें तें कांहीं नाहीं. उठतां लाथ, अन् बसतां बुक्की म्हणतात ना, तश्शी अगदीं गत आहे. मी रोज पहातें ग, काय सांगूं तुम्हांला ! अनसूये, भिमे, तुमच्या आमच्या सास्वा आपल्याला बोलतात, रागें भरतात; पण बाई हें सखूच्या सासूचं सगळंच निराळं ! पण सखू बिचारी तस्सं सगळं मुकाट्यानं सहन करते. कोणाचा आधार नाहीं ग तिला ! माहेरचं कोणी नाहीं, नवऱ्याची बळकटी नाहीं. ती जरी असती तरी तिला आधार वाटता ! पण तो तर मला अगदीं शुद्ध नंदीबैल दिसतो. आईनं डुगुडुगु केलं कीं हा आपला मान हालवतो आणखी मायलेंकरं तिला बिचारीला बडीव बडीव बडवीत असतात !

**भीमाः**– अनसूये, चंद्रे, तुम्ही सखूच्या मैत्रिणी आहां, आणखी ती चुलत चुलत नणंद म्हणून मला कांहीं तिच्याबद्दल कमी वाईट वाटतं असं नका हो समजूं; पण मला बाई वाटतं कीं सासूची, सासऱ्याची आणि नवऱ्याची मर्जी कशी राखावी, याचं तिला शहाणपणच नाहीं. सगळा दिवस आपलं विठोबाचं नामस्मरण. एवढ्याशा पोरीला कसलं ग नामस्मरण आलं आहे ? ही का मोठी प्रल्हाद का पुंडलीक होणार आहे ? सासऱ्यानं आंघोळीला पाणी मागितलं ही आपली कांहीं तरी पुटपुटते आहे ! सासूनं भाजी निवडायला सांगितली, हिची आपली पुटपुट चाललेलीच ! नवरा जरा प्रेमांत येऊन जवळ गेला कीं ही जर आपली ' पुंडलीकवरदे हरिविठ्ठल ' म्हणायला लागली, तर त्यानं तरी बिचाऱ्यानं करावं काय ? ही सतराअठरा वर्षांची मुलगी, तो बावीस-चोवीस वर्षांचा मुलगा. अन् हिनं जर आपलं त्याला उठल्यासुटल्या रामकृष्ण हरि रामकृष्ण हरि !' म्हटलं तर त्यानं करावं काय ? सांगा मला. तीं माणसं असतील वाईट, नाहीं असं माझं म्हणणं नाहीं. पण बाई मला एवढं कळतं कीं कांहीं सोन्याचा गुण कांहीं सवागीचा गुण; आमच्या चारचौघींसारखी जर ती वागती, तर कांहीं इतका छळ झाला नसता.

**अनसूया:**– भिमे, तूं कांहीं जरी म्हटलंस, तरी तुझ्या म्हाळसाकाकू आणखी तुझा दिगूतात्या, हीं माणसं कांहीं चांगलीं नाहींत. अगदीं विनाकारण त्या बिचारीचीं छळ करतात. भिमे, तूं सखूला सासूसासऱ्याशींन् नवऱ्याशीं कसं वागावं याचं शहाणपण नाहीं म्हणतेस, अन् तुला आहे, तर तुझ्या नवऱ्यानं ग कां तुझं नांव अगदीं टाकलं आहे ? सारा दिवस त्या मेल्या...

**भीमा:**– माझं नशीब. दुसरं काय ? पण सखूचं तसं नाहीं. आमच्या दिगूतात्याला दुसरातिसरा कांहीं नाद नाहीं, म्हणून मला असं वाटतं, कीं सखू जर थोडं शहाणपणानं वागेल, तर तीं त्याला अगदीं आपला गुलाम करून टाकील.

**चंद्रभागा:**– तें कांहीं नाहीं. अग बाई, हे मागल्या जल्मींचे लागे बांधे असतात. इतक्या उत्तम प्रकारानं वागून सगळ्यांची सेवाचाकरी करून तिच्या कपाळीं आपल्या लाथाबुक्याच. घरांत चांगली श्रीमंती असून तिला अगदीं बटकीसारखं राबावं लागतं आहे. मला बाई तिची अतोनात कींव येते. वाटतं कीं एकाद्या दिवशीं जाऊन म्हाळसाकाकूला सडकून बोलावं. मीं एकदां तिकडे दिखील म्हटलं, कीं एवढे स्नेही म्हणून एका ठिकाणीं खेळतां संवरतां, तर एक दिवस त्या दिगूतात्याची चांगली फजिती कां नाहीं उडवीत ! पण आपलं म्हणायचं, कीं " लोकांच्या खाजगी संबंधांत आपण बोलावं कशाला ? उपयोग तर कांहींच व्हायचा नाहीं. आणखी स्नेहांत वितुष्ट मात्र पडायच. "

**अनसूया:**– चंद्रे, तुझंन् माझं मन अगदीं एक आहे. माझ्याही मनांत तुझ्यासारखंच येऊन मीं एक दिवस तिकडे तुझ्यासारखंच म्हटलं, आणखी मला दिखील तुझ्यासारखंच उत्तर मिळालं ! पण बाई, मी उगीच नाहीं बसलें. मीं पुढं म्हटलं, असा चांगला उपदेश केला तर ज्याच्या स्नेहांत वितुष्ट येईल त्या स्नेह्याचा स्नेह तरी पाहिजे कशाला ? तेव्हां मग आलं नेहमींचं पुरुषांचं उत्तर !

**चंद्रभागा:**– तें काय ग ?

**अनसूयाः**– 'तुम्हां बायकांना कांहीं समजत नाहीं !' ( सगळ्या- जणी हंसतात. )

**चंद्रभागाः**– पण काय ग अनसूये, मी किती दिवस तुला विचारीन विचारीन म्हणतें आहें, हिला एवढा हा संताळ्यांचा नाद लागला तरी कसा?

**अनसूयाः**– अग, तुला नाहीं का ठाऊक ? तिचा बाप आणखी आई दोघंही वारकरी होतीं. त्यांचं विठोबा दैवत. वृद्धापकाळ झाला, ही एकुलती एक मुलगी, तेव्हां त्यांनीं काय होतं नव्हतं जवळ, तें या गदा- धरपंतापाशीं दिलं आणखी आपल्या मुलाला मुलगी करा म्हणून म्हटलं. म्हाळसाकाकून् गदाधरपंत दोघंही पैशाला हपापलेलींच, तेव्हां त्यांनीं फारसे आढेवेढे घेतले नाहींत.

**चंद्रभागाः**– कशाला घेतील ? डबोलं बरंचसं होतं म्हणतात. आणखी मुलगी ही अशी नक्षत्रासारखी, तेंव्हां आढेवेढे घेतले असते तर नवल. पण हीं माणसं अशीं नतद्रष्ट हें नव्हतं का त्यांना ठाऊक ?

**अनसूयाः**– हें बघ चंद्रे, तीं आपलीं दोघं साधु होतीं, त्यांना जगांत वाईट म्हणून कोणी दिसतच नसे असं म्हणतात. माझी आई त्यांच्या एकेक गोष्टी सांगते, त्या ऐकल्या कीं वाटतं देवमाणसंच तीं. पण काय दैव पहा ! लग्न वैशाखांत करून तीं दोघं आषाढीला पंढरपूरला गेलीं, तिथें वाखा सुटला. त्यांत दोघंय् वारलीं ! बिचारी सखू निराधार झाली. तिला पहिलं आईबापांच वळण. त्यांत आईबापं अशीं एकाएकीं सोडून गेल्यानं पंढरीला जाण्याचं वेड लागलं. तिला वाटे पंढरपुरास गेलं तर आपले आईबाप भेटतील; म्हणून तिनं पंढरपुरास जाण्याचा नाद घेतला, आणखी झाली यांच्या छळाला सुरवात. कां ? तर टवळी दळभद्री म्हणून तिचे आईबाप वारले अन् आतां जांवयाचे सणवार करायला नी विहिणी- ची हौस पुरवायला कोणी उरलं नाहीं !

**चंद्रभागाः**– पण सणवार करायलान् हौस पुरवायला मूळ जें लागतं तें डबोलं तर यांच्याच स्वाधीन होतं ना !

**अनसूया:**– तें काय ? तें तर कधींच घशाखालीं उतरलं होतं ! पण आणखी मौज तर ऐक. ( भिमीकडे वळून ) कां भीमाबाई, आतां कां नाहीं बोलत ?

**चंद्रभागा:**– बोलायला तोंड आहे कुठें ? अग, आपलं जरी माणूस झालं तरी तें जर अगदींच वाईट असलं, नतद्रष्ट असलं, तर त्याची बाजू राखायची कशी ? तूं आपली मला सांग त्या मौजा.

**अनसूया:**– तिचे आईबाप वारल्याची बातमी आली तेव्हां म्हाळसाकाकूंचा उद्गार काय ? "पटकीपुढें नाहीं का विठोबाचं कांहीं चाललं ? अहो, असे टाळ कुटून का कुठें विठोबा मिळत असतो ! आपण टाळकुटी करकरून या कारटीलाही तोच नाद लागला आहे कीं नाहीं." पुढें पुढें तर त्यांनीं असं चालवलं, कीं त्या नवऱ्याला तिच्याकडे पाहूंसुद्धां द्यायचं नाहीं. कां ? तर म्हणे तिला कारटीं झालीं तर तीं टाळकुटींच होतील, आणखी सगळ्या घरादाराचं वाटोळं करतील ! पण बाई, काय तुला सांगूं ? ती सखू तें सगळं सहन करून आपली विठोबाची भक्ति न सोडतां, करायचीं तीं कामं करून, कोणाजवळ गाऱ्हाणं न सांगतां आपले दिवस काढते आहे ! इतक्या आपण तिच्या मैत्रिणी, पण तिनं कधीं एका-शब्दानं तरी कांहीं आपल्याला सांगितलं आहे का ? चंद्रे, तुझ्यान् तिच्या ओळखीला कांहीं फार दिवस झाले नाहींत, पण मी अगदीं लहानपणा-पासून–तिचं लग्न झाल्या दिवसापासून–पहातें आहें. एक दिवस एका शब्दानं तरी तिनं सासूची का नवऱ्याची माझ्याशीं निंदा करायची होती कीं गाऱ्हाणं सांगायचं होतं !

**चंद्रभागा:**– खरंच बाई, तें मात्र खरं. कधीं अंगावर वण डाग दिसले कीं मीं तिला कितीदां विचारलं, पण म्हणायची, कांहीं नाहीं पहांटे उठलें तेव्हां अंधारांत दार लागलं, –नाहीं तर आधणाचं पाणी उतरतांना आधण सांडलं. आणखी ती गोष्ट उडवून देऊन दुसरी कांहीं तरी एखाद्या साधुसंताची गोष्ट काढायची ! तिनें आम्हांला साधुसंतांच्या

जितक्या गोष्टी सांगितल्या तितक्या मला [illegible] जन्मभर ऐकूनसुद्धां आपल्याला कळल्या नसत्या !

**भीमा:–** मग तुम्ही नाहीं ग कुठें तिच्यासारख्या [illegible] बनलां. लोकांचं कौतिक ज्यांनीं करावं, त्यांनीं आपण तरी त्यांच्यासारखं व्हावं !

**अनसूया:–** असं व्हावं म्हणून का कुठें कोणी होत असतं ? ज्याचं त्याचं आपलं अंगचं असतं. आमच्या हातून जरी बाई तसं झालं नाहीं. तरी तुझ्यासारखीं आम्ही तिला नांव कांहीं ठेवणार नाहीं. अग, तिची एक एक गोष्ट काय तुम्हांला सांगू ! तिची शांति आणखी सहनशीलता तर तिलाच. लहानपणीं तिला तिच्या आईनं पंढरीस जातांना विठोबाची एक रक्तचंदनाची सुंदर मूर्ति दिली होती, तिची तिनं नेहमीं पूजाअर्चा करायची. या सासूनं ती सतरांदां फेंकून द्यायची, पण हिनं ती जिथें पडली असेल तिथून पुनः उचलून आणायची. एकदां तर या नतद्रष्ट सासूनं ती मूर्ति घेऊन आपली चुलींत घातली. तर ती पोरगी ढळढळां रडली आणखी मागें पुढें न पाहतां तिनं त्या फुपाट्यांत-जाळांत खुशाल हात घालून ती बाहेर काढली ! भाजल्याचे अजून डाग हातावर आहेत. एक महिनाभर अस्सा हात धरून होती. पण विव्हळणं नाहीं एकसारखा आपला विठोबाच्या नांवाचा जप, आणखी ती मूर्ति पोटाशीं धरलेली नाहीं तर ओच्यांत ठेवलेली !

**चंद्रभागा:—**खरंच भिमे, तूं कधीं तिला एकांतांत ती मूर्ति घेऊन बसलेली पाहिली नसशील. ती तिला न्हाऊं काय घालते ! पाळणे काय म्हणते ! आणखी हें सगळं चालल असतांना तिच्या डोळ्यांतून प्रेमाचेन् भक्तीचे अश्रु वाहत असतात.

**भीमा:–** अग, नाहीं पाहिलं तर काय झालं. सगळं पाहिलं आहे. पण मी तुझ्यासारखं तिचं कौतिक नाहीं करीत. हे असे तिचे वेडेचार पाहून त्या सासूनंन् नवऱ्यानं तिला बडवूं नये तर काय तिला चौरंगावर बसवून तिच्यापुढें लोटांगणं का घालावीं ? तुम्ही तरी बाई भलत्याच गोष्टींचं कौतिक करतां ! तम्हीं लागा बरं असं करायला, म्हणजे कसं

होतं तें पहा ! चंद्रे, आज रात्री नवऱ्याच्या खोलींत गेलीसन् तो कांहीं लाडीगुडी करायला लागला म्हणजे त्याच्यापुढं चिपळ्या वाजवून

भोगावरी आम्हीं घातला पाषाण।

असं म्हण, म्हणजे तुझ्या डोक्यांतच पाषाण घालायला उठतो कीं नाहीं पहा !

**चंद्रभागा:**— बाई, बाई, बाई ! बाई भिमे, तूं फारच फटकळ आहेस. तुझ्या जिभेला मला वाटतं हाडच नाहीं ! सखू नवऱ्याच्या पुढें चिपळ्या का वाजवीत असते ? तूं पाहिलंस का कधीं ?

**भीमा:**— अग चिपळ्याच कशाला पाहिजेत. पण सारा वेळ विठल विठल म्हणणं म्हणजे तरी काय ? तरण्याताठ्या मुलीनं नटावं, मुरडावं, नवऱ्याला पाहून मुरके मारावे, लाजलंसं करावं, मुद्दामच तीनतीनदां त्याच्या अंगावरून जावं तें सगळं दिलं सोडून, अन् म्हणे ' रामकृष्ण हरि ' म्हणते. मग संतीण होऊन नवऱ्याला सोडून, पंढरपुराला कां नाहीं जात ? नवरा विचारा दुसरं लग्न करून सुखाचा संसार तरी करील ! ( देवळाच्या वरच्या बाजूनें येणाऱ्या सखूबाईकडे पाहात ) तें बघ, तें बघ धांदर येतं आहे देवळाच्या पायऱ्या उतरून. आहे कीं नाहीं ध्यान ? कुठें पहाणं, कुठें चालणं, पदर कोणीकडे, आपण कोणीकडे ? किती जरी स्वरूप अगदीं चंद्राला मावळं नकोस अन् सूर्याला उगवूं नकोस म्हणणारं अस असलं. तरी नवऱ्यान काय रडाव त्याच्याकडे नुसतं पाहून ? पहा तें ! कांहीं तरी पुटपुटणं चाललंच आहे !

( सखूबाई पांढरें स्वच्छ पातळ नेसलेली आहे, गळ्यांत तुळशीची माळ अर्धवट पदराखालीं झांकलेली, अशी आहे. चोळीही पांढरीच आहे. तिचे डावे पदराखालीं कमरेवर एक घागर दुसऱ्या हातांत दुसरी घागर आहे. खांद्यावर दोन तीन लुगडीं व धोतरें आहेत. तिचें वय सुमारें अठरा वर्षांचें. स्वरूप अप्रतिम व चर्येंत एक प्रकारची सौम्य व दैविक तेजस्विता. चित्त कोठें तरी गुंतलेलें असल्याप्रमाणें; नेत्र पाणीदार, अंतर्भेदी, परंतु लीनतादर्शक असून त्यांत अश्रु उभे राहिले आहेत. शांतीचा केवळ मूर्ती अशी ती दिसते आहे. तिला पाहून

चंद्रभागा व अनसूया मोठ्या आदरानें, प्रेमानें आणि कौतुकानें तिच्याकडे टक लावून पहातात व तिचे शब्द ऐकण्यासाठीं चित्त देतात. भिमा मात्र कपाळाला आंठ्या घालून तिच्याकडे पहाते. सखूबाई म्हटलेला अभंग आपल्याशींच गुणगुणत येते. )

### अभंग.

**धांव घालीं आई । आतां पाहातेसी काइ ॥ ध्रु० ॥**
**धीर नाहीं माझे पोटीं । झालें वियोगें हिंपुटी ॥ १ ॥**
**करावें शीतळ । बहू जाली हळहळ ॥ २ ॥**
**तुका म्हणे डोई । कधीं ठेवीन हे पायीं ॥ ३ ॥**

**भामाः**— या तुम्ही संतीणबाई ! आज धुण्याची मोट लहान आहे वाटतं म्हणून इतक्या उशीरां आलांत ? का वाटेंत कोणी भेटला एखादा वारकरी ? पहा ग बाई ? मला तुझं मोठं भय वाटतं कीं एकादा घमंड्या-नंदन वारकरी भेटून तूं आपली त्याच्या मागें जायचीस. या असल्या वेडाचा शेवट असाच कांहीं तरी व्हायचा. कमी नाहींत कांहीं लट्ठानिरंजन वारकरी तुझ्यासारख्या आचरट पोरींना फुसलावायला !

**सखूबाईः**— ( घागरी व चिरगुटें खालीं ठेऊन, कानावर हात ठेऊन ) विठ्ठल, विठ्ठल, विठ्ठल ! भिमावन्सं, हें काय बोलतां ? ते बिचारे मोठे भाग्यवान्. त्यांना दर एकादशीला वाऱ्या घडतात. विठोबाचं दर्शन होतं. चंद्रभागेचीं स्नानं घडतात. आणखी त्यांच्याबद्दल असं कां बोलतां ? त्यांचं भाग्य आपल्याला कुठें आहे ? उद्यां आतां गुढीचा पाडवा, या दिवशीं देवाला सगळे अलंकार चढवतात असं आपलं ऐकलेलं आठवलं आणखी वाटलं कीं देवा ! मला नाहींना तें गोजिरं रूप पहायला आपल्या पायां-पाशीं नेत ! भिमावन्सं, तुम्ही गेलां होतां कां हो कधीं पंढरपुरला !

**भीमाः**— पंढरपुरला ? पाप्याला कसलं बाई पंढरपूर ! तूं एवढी मोठी पुण्यवान् तें तुला दिखिल अजून झालं नाहीं. इतक्यांत कधीं जाणार असलीस तर मला सांग हो. मी येईन तुझ्याबरोबर. म्हणजे तुला विठो-बानं जर वैकुंठाला नेलं तर तुझा पदर धरून मी आपली येईन !

**अनसूयाः**– भिमे, कां बरं असं तिला खोंचूनन् लावून बोलतेस ? तिच्या मनांत आपलं आलं. तिनं तुला सहज विचारलं.

**भीमाः**– पुरे ग तुमचं. या तुमच्यासारख्या खुळ्या मैत्रिणींच्यामुळें तर तिच्या संसाराचा असा नास झाला. तिनं हे वेडेचार सोडण्यासाठीं तिला चार उपदेशाच्या गोष्टी सांगायाच्या तें टाकलं, आणखी तिच्या तोंडावर त्या आचरटपणाचीं कौतिकं कसलीं करतां ! मी नाहीं असल्या गोष्टी बोलायची !

**सखूबाईः**– ( हें भिमीचें बोलणें चाललें असतां आपल्याच नादांत असल्यामुळें तें न ऐकून ) पण भिमाबन्सं, खरंच का तुम्ही याल मी निघालें तर ?

**भीमाः**– हो हो; येईन तर ! आतां मला दुसरं काय उरलं आहे ! ( चंद्रभागा व अनसूया यांच्याकडे वळून ) पाहिलंत हें ? माझं बोलणं हिनं ऐकलं नाहीं, का हिला समजलं नाहीं ? पण असल्या बोलण्याकडे आपलं लक्षच नसतं, आपलं सगळं लक्ष देवाकडे असतं, असं दाखवायचं. मी पण कांहीं जाणून का नाहीं ?

**सखूबाईः**– ( पुनः पूर्वीप्रमाणेंच ) खरंच गडे, तुम्ही येणार असलां तर आपण चौघीजणी बरोबरच जाऊं. उद्यां परवांपासून रहदारी लागेल वारकऱ्यांची. ( मागल्या बाजूनें वारकरी जातात. ) आजच दिसताहेत कांहीं कांहीं. तेंव्हां आपल्याला सोबतीची कांहीं अडचण नाहीं पडायची!

**भीमाः**– अग, तुझ्यासारख्या संतिणीला सोबतीची अडचण काय पडणार ! प्रत्यक्ष विठोबा तुझा पाठीराखा !

**सखूबाईः**– खरंच बाई. तो सगळ्यांचा पाठीराखा आहे. माझाच कां म्हणतां ?

**भीमाः**— मग नवरा खेटरांनीं पाठ सडकतो उठल्याबसल्या, तेव्हां नाहीं पाठ राखायला येत तो ?

**चंद्रभागाः**— छे ! छे ! भिमे, हें काय तुझं बोलणं ? तुझ्या तोंडावर नक्षत्र पडलं आहे जसं कांहीं !

**सखूबाईः**– चंद्रे, वन्सं बोलल्या त्यांत काय खोटं आहे ! त्यांना जें दिसतं तेंच त्या बोलल्या. बरं पण आतां आपण आपआपल्या कामाला लागावं नाहीं ? बरं, तुमचीं झालीं का धुणीं ?

**अनसूयाः**— हो केव्हांच झालीं. आतां आम्ही आपल्या पाणी भरून जाणार होतों. बोलतां बोलतां आपला थोडा इथें मुक्काम केला, इतक्यांत या तुझ्या वन्संनीं तुला येतांना पाह्यलं म्हणून थांबलों. नाहीं तर जाणारच होतों !

**चंद्रभागाः**—गडे अनसुये, आज सखूला उशीर झाला आहे, तर आपण लागूं या तिला धुणीं धुवायलान् घागरी घांसायला ! म्हणजे तिचं लवकर आटपेल. आणखी मग आपण सगळ्याजणी बरोबरच जाऊं.

**अनसूयाः**— खरंच गडे,( असें म्हणून सखूबाईची धुणीं उचलते. )

**भीमाः**— मी नाहीं ग बाई, कोणाचीं लुगडींबिगडीं धुवायला लागायची. मी आपली ही चाललें. अन् तुम्ही तरी कशाला एवढ्या पालथ्याउलथ्या होतां तिच्यासाठीं ? विठोबानं भक्तासाठीं कामं केल्याच्या गोष्टी हिनंच तुम्हांला सांगितल्यान् ना ? मग ही मोठी भक्तीण,संतीण. हिच्या कामांत तो नाहीं का मदत करणार ? अन् तुम्हांला तरी काय ठाऊक करतो का नाहीं तो ! त्याच्याखेरीज का इतका छळ सोसून ही टुमटुमीत दिसते ती ! हं, मग तुम्ही येतां आहां का नाहीं ? का मी जाऊं आपली! तुम्ही आपलीं तिचीं लुगडीं धुवा, घागरी घांसा, कीं आणखी कांहीं करा.

**चंद्रभागाः**– जा हो, जा. आम्ही कांहीं हिचं काम आटपल्याखेरीज येत नाहीं.

**भीमाः**— बरं, अशा गुणानं तुम्ही सुद्धां खेटरं खायला लागाल. दुसरं काय ? ( जाते. )

**चंद्रभागाः**– भारी बाई ही भिमी फटकळ.

**अनसूयाः**– अग, फटकळ कसलीन् कम्य कसलं ! ज्या माणसांची देवावर श्रद्धा नाहीं, आणखी घरीं सुख नाहीं; त्यांचं हें अस्सं असत.

कोणाला काय बोलावं, आणखी केव्हां काय बोलावं हें समजत नाहीं; स्वभाव तुसडा होतो; आपल्यापेक्षांही वाईट स्थितींत असून शांतवृत्तीचं माणूस पाहिलं कीं, त्यांच्या अंगाचा तिळपापड उडतो. आणखी सुखी माणूस पाहिलं कीं मत्सर वाटतो ! त्यांतली ही भिमी आहे. आतां हें आपलं सगळं बोलणं सखूच्या सासूला सांगेल पहा, आपल्या आधीं गेली, ती तेवढ्याचकरितां गेली. न जाणों जातां जातां आमच्या घरांत देखील डोकावून जाईल. सासूबाईनीं मी कां अजून आलें नाहीं म्हणून विचारावं, आणखी आपण तिखटमीठ लावून हें सांगावं. सांगेना का. माझ्या सासूबाई कांहीं मला बोलायच्या नाहींत.

चंद्रभागा:– अन् माझ्या घरीं ही पाऊल देखील घालायची नाहीं. कारण नवऱ्याची ती–ती आमच्या त्याच आळीला...

सखूबाई:— चंद्रे, जाऊं दे. आपण दुसऱ्याच्या निंदा कशाला करा ? अन् तुम्ही तरी कां माझ्याकरितां शिणतां ? माझं मी आपलं काम करीन आणखी येईन. अशीं कांहीं धुणीं फार फार नाहींत. खरंच जा. तुम्हांला उशीर होईल.

अनसूया:— नाहीं, आम्ही कांहीं जाणार नाहीं. निदान मी तरी जाणार नाहीं.

चंद्रभागा:– अन् मी तरी कशी जाईन ! आम्ही दोघी आतां पिळून टाकूं काय चार धुणीं आहेत तुझीं तीं. आणखी तूं घागरी घांस. मग झट्कन् पाणी भरून चालत्या होऊं.

सखूबाई:– चंद्रे, अनसूये, किती हें तुमचं माझ्यावर प्रेम ! नको त्रास घेऊ म्हणत्यें, पण तुम्ही नाहींच ऐकत, तर चला.

पद.

या प्रेमा पाहुनीयां हृदय ये भरुनी ॥
हा त्रास नको, परि घेतां ।
मजसाठीं कष्टी होतां ॥
उपकार मनीं हे येतां ।
हृदय ये भरुनी ॥ [ सर्वजणी जातात.

# प्रवेश २ रा.

[ स्थळः- गदाधरपंताच्या वाड्याचें मागील दार.
भीमा मोठ्या लगबगीनें आंतून बाहेर येते.]

**भीमाः**-नाहीं, तिच्या दृष्टीस कांहीं पडलें नाहीं हें बरं झालं; पण मला इतकं तिचं भय कां बरं वाटतं ? तिला आतां पुढल्या दारानं आंत शिरतांना दुरून पाहिलं आणखी तिथें उभं राहूं नये असंच वाटलं. मी तिच्याबद्दल म्हाळसाकाकूंना सांगतें, त्यांत वावगं काय करतें ? तिच्या या दोघी मैत्रिणी आपलं तिचं कौतिक करून स्तोम माजवतात, म्हणून मीं करावं का काय तसं ? काल तिच्या मैत्रिणींनीं तिला धुणीं धुवायला मदत केली तें सांगितलं, आणखी आज आतां गंगेवरून येतांना जें पाहिलं तें सांगून दिलं. सांगूं नये तर काय करावं ? ही जर कोणाच्या नादाला लागून भलतंसलतं झालं तर नामुष्की कोणाला? म्हाळसाकाकूलान् आम्हांलाच ना. आज असा वणवा आतां पेटवून दिला आहे कीं वाः ! त्यापुढें हिचा हा असला साधूपणा किती दिवस टिकतो तें तरी पाहीन. अहो, हिच्या या वेंधळ्यासारख्या वागण्यानं तिला लोक मोठी साध्वी म्हणतात, आणखी आमच्या नटण्यामुरडण्याला नांवं ठेवितात. जो तो म्हणतो सखू खरी साध्वी ! आम्ही सगळ्या का वेसवा बनलों ? आमचे नटण्यामुरडण्याचे दिवस हे नव्हेत तर यायचे तरी केव्हां ? ती एक झाली मोठी शुक्राचार्यांची बहीण, म्हणून का सगळ्या बायकांनीं पांढरीं पातळं नेसून कुंकवाचे लांब फराटे कपाळावर ओढावे ? टाळन् चिपळ्या घ्याव्या ! पण लोकांचा तरी काय चमत्कार ! तेवढ्यानं ती झाली साध्वी ! चट्टीपट्टीचा बोभाटा, अन् झिपरी मारी झपाटा असं तरी नाहीं कशावरून ! निदान असंच आहे असं आपण म्हणूं नये कां ! मी तिचा पक्का पिच्छा पुरवणार (कानोसा घेतल्यासारखें करते तों म्हाळसाकाकूचे कर्कश बोलणें ऐकूं येतें.) वा ! तोफांचा गडगडाट तर सुरू झाला हो, म्हाळसाकाकूंचाच आवाज हा. आतां आपलं काम झालं. [ जाते.

## प्रवेश ३ रा.

[ स्थळः—गदाधरपंताचा वाडा. म्हाळसाबाई संतापानें लाल झाली आहे. सखूबाई खांद्यावर धुणीं व कमरेवर एक घागर व हातांत एक घागर अशी उभी आहे. ]

**म्हाळसाबाई**:— हें का धुणं धुवायला जाणं म्हणावं, का म्हणावं तरी काय ? अग, तुझ्या लाजा गेल्या तरी कुठें ? तुला लतकोडगीला आतां करावं तरी काय ? मारून मारून आमच्या हाताला घट्टे तर पडले. तुला पंढरीला जावंसं वाटतं, तर जाईनास एकदांची उलथून ? जा. एखाद्या वारकऱ्याचा हात धर आणखी जा. गेलीस तर कत्रंसुद्धां तुझ्या शोधाला यायचं नाहीं. ( सखूबाईच्या खांद्याला हिसडा मारते व तिचा गालगुचा घेते. सखूच्या खांद्यावरचीं धुणां पडतात. ती घागरी ठेवते. ) कशी मख्ख आहे बघा. इतकं मी बोलतें आहें, पण कांहीं आहे का तिला ! (तिच्या पुढचीं धुणीं मुद्दाम मातींत लडबडून) हीच आतां तुला शिक्षा. जा, पुन्हां अशा उन्हांत जाऊन हीं धुणीं धुवून आण. आज पाडव्याचा दिवस आहे, तेव्हांपहांटे अगदीं बेत केला होता कीं, आज तुला बोलायचं म्हणून नाहीं; पण तूं कुठली माझा नेम चालूं द्यायला ? तुला लाथाबुक्क्या खाल्ल्याखेरीज अन्नच गोड लागत नाहीं. बरं तर आज तुला जेवायलाच घालीत नाहीं. जा, जा त्या घांटावर कुठल्या लठनिरंजन वारकऱ्याशीं हितगुज करीत बसली होतीस तिथें जा. तो तुला जेवायला घालील समजलीस ? जा. आजपर्यंत पुष्कळ गय केली.

**सखूबाई**:— नाहीं हो. मी कुठें फार वेळ बसलें नाहीं. घरीं लवकर ये म्हणून सांगितलं होतं म्हणून मी अगदीं लवकर निघालें धुणीं धुवून. पण......

**म्हाळसाबाई**:— आणखी खोटं बोलतेस ? येतां येतां नव्हतीस तूं एका वारकऱ्याशीं बोलत ?

होतं, तर इकडे घरीं येऊन भेटायचं होतं. तुझ्याशीं रस्त्यांत बोलायचं काय काम ?

सखूबाई:—ते मला बाबांसारखे आहेत !

म्हाळसाबाई:— सगळे तुला बाबांसारखेन् विठोबासारखे आहेत, पण आम्हांला नाहींत ना ? सतरांदां सांगितलं आहे कीं मला कांहीं बाई हें असलं खपायचं नाहीं. दिग्या, ए दिग्या, अरे, बायको सगळ्या गांवभर वारकऱ्यांच्या पाठीमागें हिंडायला लागली तरी तूं आपला शुंभासारखा बसला आहेस ! तुला म्हणावं तरी काय ? मेल्या, बायको संभाळायची अक्कलदेखील तुला मींच का शिकवायला पाहिजे ?

दिगंबरपंत:— ( दारांतून बाहेर येऊन ) मी ऐकतच होतों, पण म्हटलं तूं बोलावल्याखेरीज कसं यावं ! ( सखूच्या जवळ जाऊन संतापानें ) रस्त्यांत वारकऱ्याशीं बोलणं म्हणजे काय ? इथें मला नुसतं पाहिलं कीं पळतेस, आणखी वारकऱ्याशीं लघळपणा-( थाडकन् थोबाडीत मारून ) किती ? किती मारावं तरी किती !

म्हाळसाबाई:— अस्सा, असा कांहीं तरी दाखवीत जा नवरेपणा. चांगलीं तुमचीं जेवणींखाणीं झालीं, तस्सं सांगितलं कीं आतां माझं मी आपलं वाढून घेईन. तूं ओली हो आणखी तेवढीं धुणीं धुऊन आण अन् मग जेव. पोरीची जात. जेवल्यावर काम करायचं जिवावर येतं म्हणून आधीं जायला सांगितलं. त्याप्रमाणें गेली. पण आपलीं धुणीं करीं तरी खळचळून कुठला एक लठ्ठनिरंजन वारकरी भेटला, त्याच्याशींच बोलत बसली एका झाडाखालीं ! म्हणे तो माझ्या बाबांचा स्नेही. मला तरी काय ठाऊक ? तिकडून भिमी येत होती, तिनं सांगितलं. ( इतक्यांत सखूबाईला घेरी आल्याप्रमाणें होऊन ती धाडकन् खालीं पडते. दिगंबरपंत थोडा कळवळून तिच्याकडे पहातो. ) काय, पहातोस काय तिच्याकडे असा ? तिची काडीमात्र कींव करायला नको. पडूं दे सटवीला तशीच. तें सगळं ढोंग आहे बरं.

दिगंबरपंत:— आई, अग ढोंग काय म्हणतेस ? खरंच बेशुद्ध पडली आहे. तिच्या डोळ्यांला पाणीबिणी तरी लाव.

**म्हाळसाबाई:**— माझ्यापुढें असं निलाजऱ्याखारखं तीन् ही करतोस ! बाइल्या आहेस बाइल्या ! असं करायला लागलास तर एखाद्या दिवशीं देईल तुझ्या हातावर तुरी अन् जाईल वारकऱ्याचा हात धरून, मग बसशील रडत. अरे गाढवा, या बायकांचे कावे तुम्हां पोरांना काय समजायचे आहेत ! अगदीं नुसतं ढोंग आहे. लाथ मार पाठींत म्हणजे मग बघ कशी शुद्धीवर येते ती. मार एक. बघतोस काय ! (सखूबाई तितक्यांत आपोआप शुद्धीवर येते व विठ्ठल विठ्ठल असें म्हणते.) पाहिलंस, पाहिलंस ! पाठींत लाथ बसायची गोष्ट कानीं पडतांच कशी शुद्धीवर आली ती ! अरे, चवदावं रत्न दाखवलं म्हणजे सगळीं ढोंगंन् सोंगं जिथल्या तिथेंच राहतात. (सखूबाईकडे वळून) ऊठ, ऊठ सटवे, आजपर्यंत मीं तुला कांहीं छळलं नाहीं, पण आतां यापुढें क्षणभरसुद्धां गय करायची नाहीं. समजलीस ? आज तर तुला जेवायला नाहींच घालीत. पण आतां या अरशा उन्हांत तीं भाऱ्हीं धुणीं आणखी हीं धोतरं पुन्हां धुऊन आण. आणखी संध्याकाळच्या आंत ह्या कोंपऱ्यांतला मोठा थोरला पाण्याचा हौद भरून ठेव. मग रात्रीं पाहिन, तुला घांसभर अन्न द्यायचं कीं नाहीं तें. (सखूबाईच्या जवळ जाऊन तिचा गाळगुच्चा घेऊन आणखी तोंयाला हिसडे मारून) जा. तुझ्यासारख्या भक्तिणींचीं कामं विठोबा करीत असतां, तेव्हां तो तुझ्याकरितां लुगडीं धुईलन् पाणी भरील. तुला काय श्रम आहेत ! (दिगंबरपंत तिच्याकडे पहात आहे असें पाहून) ए मेल्या, बाइलबुद्ध्या, पहातो आहेस काय तिच्याकडे ! या तुझ्या अशा कचेरगानं तर सगळं बिघडलं. चल, निघ इथून. (दिगंबरपंत जातो.) (सखूकडे वळून) जर घटकाभर दिवस असेपर्यंत हा हौद पाण्यानं भरला नाहीं तर सांगेन कसं. काय आहे तें ! आजपर्यंत छळली नाहीं अशी छळीन समजलीस ! (जातां जातां एक गालगुच्चा घेऊन जाते.)

**सखूबाई:**— विठोबाराया, नाहीं, आतां सोसवत नाहीं. देवा, मीं आपल्याकडून काडीइतकं सुद्धां चुकत नाहीं. यांच्या कोणाच्या सेवेंत अंतर पडूं देत नाहीं. जें काय त्यांना आवडत नाहीं असं करतें, तें एवढंच कीं, दिवसभर तुझं नांव घेतें. आणखी एकाद वेळ घाटावरच्या देवळांत भजन चाललं तर क्षणभर तिथें उभी राहतें. खरं आहे. होऊं या



**म्हाळसाबाई:**— ऊठ, ऊठ सटवे, आजपर्यंत मी तुला कांहीं छळलं नाहीं पण आतां याच्या पुढें क्षणभरसुद्धां गय करायची नाहीं. [ पृष्ठ १८.

छळ. किती का होईना, पण देवा, मी तुझं नांव कांहीं सोडायची नाहीं. सासूबाईच्या आज्ञेप्रमाणें पुढल्या कामाला लागते.

पद.

कळकळ माझी पांडुरंगा रे
अभंगा तुला ॥ ध्रु० ॥
भजनीं रमतें काम करोनी ।
तिळभर माझा अनय नसोनी ।
शासन देवा व्हावें असें कां ? ।
कळेना मला ॥ १ ॥

[ जाते.

---

## प्रवेश ४ था.

[स्थळ -- कृष्णाकांठचें एक झाड. त्या झाडाखालीं विश्वंभरबोआ आणखी त्यांच्या बरोबरीची मंडळी उतरली आहे. विश्वंभरबोआ ज्ञानेश्वरी वाचून अर्थ सांगत आहेत. कांहीं वारकरी ऐकत आहेत. त्यांची बायको गिरजाबाई स्वस्थ बसली आहे. पलीकडून सखू भरलेल्या घागरी घेऊन येरझारा घालीत आहे. ]

[ पुराण झाल्यानंतर ]

**गिरिजाबाई:**-- ही पोरगी मघांपासून एकसारख्या पाण्याच्या घागरी भरून नेते आहे. मघांशीं आपण तिला बोलावून तिची विचारपूस केली, तव्हां ती धुणीं धुऊन आणखी पाण्याच्या दोन घागरी घेऊन गेली. थोड्या वेळानं लागलीच आली, आणखी तेव्हांपासून घागरी भरभरून नेते आहे. याचा अर्थ तरी काय ? तिला हांका मारून विचारावं तरी. मघांपासून पन्नास खेपा झाल्या असतील.

**विश्वंभरबोआः--** तिला फार सासुरवास आहे म्हणतात, तेव्हां त्या-मुळेंच हें असेल. नाहीं तर गदाधरपंतांची स्थिति कांहीं तशी नाहीं. आणखी आपल्या रामाजीपंतानंय् चांगले दहा एक हजार रुपये त्यांच्याजवळ ठेवले मुलीचं लग्न केलं तेव्हां. पण प्रारब्धन् संचित दोनींचा भोग सरल्याखेरीज माणसाची सुटका कोठली होणार ? एवढ्याकरितां तुकोबारायांनीं म्हटलं आहे तेंच खरं. तें म्हणावं आणखी समाधान मानावं.

**अभंग.**

**संचित प्रारब्ध क्रियमाण । अवघा जाला नारायण ॥ ध्रु० ॥**
**नाहीं आम्हांस संबंधु । जरामरण कांहीं बाधु ॥ १ ॥**
**द्वैताद्वैतभावें । अवघें व्यापियेलें देवें ॥ २ ॥**
**तुका म्हणे हरी । आम्हांमाजी क्रीडा करी ॥ ३ ॥**

**गिरिजाबाईः--** पोरीच्या तोंडीं अन्न तरी पडलं आहे कीं नाहीं कोण जाणे !

**सखूबाईः--**( मध्येंच घागरी ठेवून बसते व जवळची विठोबाची मूर्ति काढून निजकडे पहात आपल्याशींच बोलते. ) पंढरीनाथा, आतां किती अंत पाहणार तूं माझा ! इतर स्त्रियांना माहेर तरी असतं, त्यामुळें कोणा-बरोबर मायबापांना निरोप पाठवले म्हणजे कोणी तरी धांवत येऊन चार दिवस तरी घरीं नेतात आणखी विसांवा मिळतो. दोन मायेचे शब्द मिळतात. पण माझं माहेर तूं आपल्या चरणांपाशीं नेलंस तेव्हांपासून आतां तूंच माझं माहेर. देवा !

**आई मेली बाप मेला । आतां सांभाळीं विठ्ठला ॥**
**हरि रे मज कोणी नाहीं । माझी खात असे डोई ॥**

अशी त्या जनीनं जेव्हां हांक फोडली, तेव्हां तूं धांवलास आणखी आतां माझ्याच हांकेला कां रे येत नाहींस ? विठोबाराया, मला दुसरं कांहीं नको. मला एकदां पंढरीला आपल्या पायांजवळ ने. देवा, तुझ्या नांवाचा मी जप करतें म्हणून का रे माझा असा छळ व्हावा, आणखी तो तूं पहा-वास ! पण माझ्याच अंगीं तरी दोष नसेल म्हणून कशावरून ? आपले दोष आपल्याला दिसत नाहींत. आपण जर चांगल्या असतों, तर

कशाला कोणीं आपला छळ केला असता ? कांहीं नाहीं. साधुसंतांचीं वाक्यं आपल्याला बाबांनीं शिकवलींत तींच खरीं.

अभंग.

चंदनाच्या वासें धरितील नाक ।
नावडे कनक न घडे हें ॥ ध्रु० ॥
साखरेची गोडी सारखी सकळां ।
थोरां मोठ्यां बाळां धाकुटियां ॥ १ ॥
तुका म्हणे माझें चित्त शुद्ध होतें ।
तरी कां छळिते जन मज ॥ २ ॥

( इतक्यांत घेरी आल्यासारखें होऊन ) पण मला असं कां बरं होतं ? सगळं फिरल्यासारखं वाटतं आहे. ( घेरी येऊन पडते. गिरिजाबाई तें पाहून तिच्याकडे धांवते. )

**गिरिजाबाई:—** अरेरे ! पोरीला घेरी आली वाटतं. सखू, ए सखू, काय झालं बाळ ? ( तिच्या घागरींतलें पाणी घेऊन तिच्या डोळ्यांला लावते. ) बाळ, ऊठ, आमच्या त्या झाडाखालीं चल, तिथें थोडा वेळ बस आणखी मग.........

**सखूबाई:—**( अर्धवट शुद्धीवर येऊन ) कोण ? आई, तूं मला आपल्याकडे घेऊन जायला आलीस ? पंढरपुरला नेणार मला ? आई, इतके दिवस कां बरं मला टाकून गेली होतीस ? तूं नेहमीं म्हणत असस ना !–

पंढरी माहेर । विठोबा माउली ।
धांवोनी हे बोली । सांगावी ॥

मग आपण तेवढी गेलीस आणखी मला नाहीं नेलीस ?

**गिरिजाबाई:—** सखू, सखू ! नीट शुद्धीवर ये. माझ्याकडे बघ. मी गिरिजा आहें. तुझी आई नाहीं.

**सखूबाई:—** ( शुद्धीवर येऊन ) काय ? तुम्ही माझी आई नाहीं ? मग मला आई आल्याचा नुसता भासच झाला ? बरं, तिची मर्जी, विठोबाची मर्जी. पण तुम्ही तरी पंढरीलाच जातां आहां ना ? मग मला न्या ना ! मी येतें.

**गिरिजाबाईः**-- हो, मी नेतें. चल येत असलीस तर; आम्ही उद्यां सूर्योदयाबरोबर निघणार पुढें जायला.

**सखूबाईः**-- सूर्योदयाबरोबर निघणार ! बरं आहे. मी येणार. माझी आई मला आतां खचित दिसली. ती मला पंढरीला घेऊन जायलाच आली होती. मला वाटतं तुम्हांला आज तिनंच मला न्यायला धाडलं आहे. नाहीं तर इतक्या वर्षांत नाहीं तुम्ही मला भेटलां ! हो, नाहीं तर मीं आतां विठोबाचा धांवा केला त्यानं तर नाहीं ना तुम्हांला बुद्धि दिली मला घेऊन जायची ! अन् मला तरी जावंच तुमच्याबरोबर असं कां वाटावं ! खरंच नेणार कां मला तुम्ही ! तुह्मी मला पंढरीला नेतों म्हणालांत त्यामुळें माझी तहानभूक सगळी हरली. मी अगदीं थकलें होतें, पण आतां मला फार हुशारी आली. मी येऊं ना ! सकाळीं—अगदीं सकाळींच येतें. तुम्ही मला नेणार ना ! ( आपली विठोबाची मूर्ति पुढें करून ) याच्या समक्ष सांगतां आहां हो ! मला न्या हो ! ( अर्धवट आपल्याशीं )

**अभंग.**

**विठोबाच्या गांवा जाईन धांवोनी ।**
**घालीन लोळणी चरणांवरी ॥ ध्रु० ॥**
**शिणभाग द्रवाळिला तो म्हणेल ।**
**जीवींचे पुसेल जडभारी ॥ १ ॥**
**हरुषें लोळत जाईन महाद्वारा ।**
**भेटाया सामोरा येईल मज ॥ २ ॥**
**उचलोनि शीर पुशिल आदरें ।**
**मुख पीतांबरें पुसील माझें ॥ ३**
**धरोनि हनुवटी उठवील हस्तकीं ।**
**ठेवील मस्तकीं अभयकर ॥ ४ ॥**

तर मग मी जातें आतां. माझा शीणभाग सगळा गेला. मी सकाळीं येईन अगदीं खचित येईन. मला नेऊन एकदां पंढरीला घाला मात्र.

**गिरिजाबाईः**--घालीन, खचित घालीन. तूं सकाळीं ये. पण आतां आमच्या झाडाखालीं चल, तुझ्या पोटांत कांहीं नाहीं असं दिसतं आहे. तर थोडं कांहीं खायला देतें, तें खाऊन जा.

**सखूबाई:**— काय ? खाऊन जाऊं ? छे ! छे ! मला कांहीं खायला नको, प्यायला नको.

### पद.

प्रीति जडे हो हरिपदसेवेची फार ॥
मनोरम ॥ ध्रु० ॥
विठ्ठल राया । भेट दे सदया ॥
ध्यास असा मनिं माझा ॥ १ ॥
तहान हरली । भूक निवाली ॥
राहिलें काम राहो ।
देहधर्म ते । परि तव लाभो सदा ।
समागम ॥ २ ॥

गिरजाबाई, आतां मी जातें. जोंपर्यंत मी इथें आहें, तोंपर्यंत सासूसासऱ्यांची आणखी तिकडली सेवा चुकूं द्यायची नाहीं. उद्यां तुमच्याबरोबर आलें, म्हणजे माझा पंढरीनाथ आहेच. झाला, माझा निश्चय झाला. ( पुढील अभंग गुणगुणत जाते. )

### अभंग.

चला पंढरीसी जाऊं । रखुमादेवीवर पाहूं ॥ ध्रु० ॥
स्नान करूं भिंवरेसी । पुंडलीका पायांपाशीं ॥ १ ॥
डोळे भरूनि पाहूं देवा । तेणें ईश्वर जीवा भावा ॥ २ ॥
ऐसा निश्चय करुनी । म्हणे नामयाची जनी ॥ ३ ॥

---

## प्रवेश ५ वा.

**गिरिजाबाई:**—( अजून पोथी पहाण्यांत गुंतलेल्या आपल्या नवऱ्याजवळ जाऊन ) ऐकलं का ? रामाजीपंतांच्या सखूला आपल्याबरोबर पंढरीला न्यायचं मीं कबूल केलं आहे.

**विश्वंभरबोआ:**— तूं कशी नेणार तिला ?

**गिरिजाबाईः**— कशी म्हणजे ? जशी आपण जाणार तशीच ती चालत येईल.

**विश्वंभरबोआः**-- अग, तें खरं; पण सासूसासऱ्याला, नवऱ्याला न कळत का येणार ती ?

**गिरिजाबाईः**— ती कशी येवो, ' तुला नेईन ! नेईन ! नेईन ! ' म्हणून त्रिवार विठोबाला साक्षी ठेवून मीं सांगितलं आहे.

**विश्वंभरबोआः**-- अग, तिची सासू फार भांडखोर आहे, आणखी ती तिचा भयंकर छळ करते, हें आपल्याला दुपारींच नाहीं का त्या दोघी मुली देवळांत देवाच्या दर्शनाला आल्या होत्या त्यांनीं सांगितलं ? तेव्हां ती सासू कांहीं सुध्या मनानं का जाऊं देणार आहे तिला आपल्याबरोबर ? ती येते आहे आणखी आपण तिला नेतों आहोंत असं जर त्या माणसांना कळलं तर तिचा छळ दुप्पट व्हायचा तो व्हायचाच, पण दुसऱ्याची मुलगी पळवून नेता- हेत, म्हणून आपल्याला सरकारघरणं येऊन पकडून नेलं नाहीं म्हणजे मिळवलं तुम्हांला बायकांना कांहीं समजत नाहीं. आपण आपले वारकरी, आपल्याला या उठाठेवी कशाला ?

**गिरिजाबाईः**-- उठाठेवी कसल्या आल्या आहेत त्यांत ? रामाजीपंतांची आणखी जानकीकाकूंची मुलगी, ती माझीच मुलगी. तिचा जर छळ- होतो आहे, तर तिला सोडवलीच पाहिजे त्या छळापासून. येऊं या सरकार- घरणं, म्हणजे त्या म्हाळसाबाईची तरी लोकांत फटूफजिती होईल ! सुनेचा असा छळ–

पद.

**काय सासवा या असल्या ।**
**नष्ट दुष्ट निर्दय कसल्या ।**
**प्राण घ्यावयाला बसल्या ।**
**दीन सुनांचा हो ॥ १ ॥**
**वाघिणीच गमती बाई ।**
**सुशील सुना केवळ गाई ।**
**खाति तया तुडवुनि पायीं ।**
**फाडफाडुनी हो ॥ २ ॥**

ती जखीण सासू सखुला ।
जाच पहा करिते कसला ।
प्राण घ्यावयाचा उरला ।
काय हें बरें हो ॥ ३ ॥

**विश्वंभरबोवाः**— कर काय पाहिजे तें, पण आलं कांहीं अंगावर म्हटलं सरकारदरबारचं, तर तुला करीन पुढें. मग तिची फजिती होते का तुझी होते, तें पाहूं. बरं पण चला आतां. जातों आम्ही आपले देवळांत. घटकाभर देवाच्या द्वारीं जाऊन भजन तरी करूं ! (मोठ्यानें आपल्या टाळकऱ्यांस) चला रे जाऊं जरा भजन करूं. (चिपळ्या व एकतारी वाजवून भजन करूं लागतो.)

अभंग.

नामीं जे जे रतले । ते ते केशवें तारिले ॥ १ ॥
नाम घेतां केशवाचें । पाश तुटती जन्माचे ॥ २ ॥
महापापी अजामेळ । तोही तारीला चांडाळ ॥ ३ ॥
नामें गजेंद्र तारीला । देवें मोक्षपदा नेला ॥ ४ ॥
नाम घेतां ते पांचाळी । धांव उभा वनमाळी ॥ ५ ॥
नामा म्हणे भाविकांसी । नाम घ्यावें अहर्निशीं ॥ ६ ॥

---

## प्रवेश ६ वा.

[ स्थळ — गदाधरपंतांचें घर पहांटेचे चार वाजून गेल्याचा सुमार. सखूबाई जात्यावर बसून दळीत आहे. पंढरीला जाण्याचा निश्चय झाल्याकारणानें एकप्रकारचं समाधान तिच्या मनास झालें आहे. आणि परमानंदानें अश्रु वहात आहेत. त्या परमानंदांत तल्लीन होऊन दळतांना मोठ्यानें पुढील अभंग ओंव्याच्या चालीवर म्हणते. ]

सखूबाई:--

पंढरिये माझें माहेर साजणी ।
ओंवियें कांडणी गाऊं गीत ॥ ध्रु० ॥
राही रखुमाई सत्यभामा माता ।
पांडुरंग पिता माहियेर ॥ १ ॥
उद्धव अक्रूर व्यास अंबऋषी ।
भाई नारदासी गौरवीन ॥ २ ॥
गरुड बंधु लडिवाळ पुंडलीक ।
यांचें कवतुक वाटे मज ॥ ४ ॥
मज बहुगोत संत आणि महंत ।
नित्य आठवीत ओंवियेसी ॥ ४ ॥
निवृत्ति ज्ञानदेव सोपान चांगया ।
जिवलगा माझिया नामदेवा ॥ ५ ॥
आनंदें ओंविया गाईन मी त्यांसी ।
जाती पंढरीसी वारकरी ॥ ६ ॥
तुका म्हणे माझा वळिया बापमाय ।
हर्षें नांदो सये घराचारी ॥ ७ ॥

झालं बाई एकदांचं दळण. आतांपर्यंत सासूबाईनीं जितक्या गोष्टी करायला सांगितलं होतं तितक्या सगळ्या केल्या. आतां रोजच्यासारखं सडासारवण करावं, आणखी गंगेला जायला म्हणून बाहेर पडावं तें पुनः कांहीं येऊं नये. त्या गिरिजाबाईबरोबर चालतं व्हावं. पण देवा, मी करतें हें चांगलंच आहे ना ? ( विचार करून ) हो चांगलंच आहे. पंढरीला जाऊन देवाच्या चरणांवर एकदां लोटांगण घालीन तो केवढा सुदिन ! आजपर्यंत घरांत जी वागणूक केली ती देवा, तुला स्मरून केली. कोणाची अवज्ञा केली नाहीं कोणाचा उपमर्द केला नाहीं. सासूबाईनीं किंवा तिकडे, जें काय सांगितलं तें बरं वाटो, वाईट वाटो, अंगासांगाकडे न बघतां केलं. जी काय अवज्ञा केली ती तुझं नांव घेण्याबद्दल कोणीं राग भरलं तर तेवढ्यापुरती केली. देवा, मला तुझ्याखेरीज कोणाचा आधार ? पंढरीनाथा, आतां पंढरीला जायची संधि तरी तूंच मला आणून दिलीस असं वाटतं; मग

मी जर संधि साधून गेलें तर त्यांत वावगं काय झालं ? वावगं ? वावगं नाहीं झालं असं वाटतं. पण सासूबाईंना, मामंजींना, तिकडे न कळवतां घरांतून जाणं हें वावगं नाहीं का ? मी नाहींशी झालें म्हणजे सगळीं माणसं काय म्हणतील ? पंढरीला गेली म्हणतील का वाईट कल्पना करतील ? सासूबाई काय म्हणतील ? तिकडे काय म्हणायचं होईल ? काय म्हणायचं आहे ? मी दोघांनाही नकोच आहें. सासूबाई तर हजारदां म्हणाल्या आहेत, कीं " तुला पंढरपुराला जायचं आहे ना ? जा. कशाला राहतेस !" खरंच. मी गेलें म्हणजे त्यांना सगळ्यांना सुख होईल. पण आज्ञेवांचून मीं असं जाणं हें सती-धर्माला विपरीत नाहीं का ?—

पद.

पतिवांचुनि दैवत सतीला जगतीं अन्य नाहीं ॥ ध्रु० ॥
पतिवचनांचीं फुलें मस्तकीं ।
सेवाकंकण धरुनि हस्तकीं ।
संतोषें दिन घालविल साध्वी तीच बाई ॥ १ ॥
पतिपद सतिला तीर्थचि काशी ।
तेंचि यान ने वैकुंठासी ।
पतिपद तरणी भवनिधिमधुनी पार नेई ॥ २ ॥
पतिवचविमुखी सती कशाची ।
नरकार्णविंची मगरी साची ।
असिधाराव्रतपालन सतिविण कोण साही ॥ ३ ॥

त्यांनीं जरी नाहीं नीट वागवली, तरी मीं आपली त्या पायांची सेवा करीत राहणं हें माझं काम नाहीं का ? ते पाय सोडून जायचं हें चांगलं का ? नाहीं, चांगलं नाहीं. पण कां नाहीं ? हे पाय सोडून मी देवाचेच—पंढरी-रायाचेच पाय धरणार ना ? काय वाईट झालं ? मी या पायांपासून विठो-बाच्या पायांपाशीं जाणार, या देवाची सेवा सोडून त्या देवाधिदेवाची सेवा करावयाला जाणार, त्यांत वावगं काय ? पतिव्रतेच्या धर्माच्या विरुद्ध होतं आहे. पण मी काय करूं ? माझे हे देव माझी सेवा घेत नाहींत. नको म्हणतात. माझा द्वेष करितात. तूं मला माझ्या दृष्टीसमोर नकोस म्हणतात.

देवाधिदेव तसं म्हणत नाहीं. तूं दृष्टीसमोर नकोस असं हे म्हणतात, हीच त्यांची आज्ञा समजून जो तसं म्हणत नाहीं, जो सगळे अपराध पोटांत घालतो, त्याच्या चरणांपाशीं मी गेलें तर त्यांत काय वावगं आहे ? नाहीं, कांहीं वावगं नाहीं. पांडुरंगा, मी तुझ्या चरणांजवळ येणार. झाला हाच निश्चय ठीक आहे. पण एकदां त्या पायांचं शेवटलं दर्शन घेऊं नको का ? हो. एकदां दर्शन घ्यावं आणखी मग जावं. ( असें म्हणून आपल्या पतीच्या खोलीकडे जाऊं लागते. वाटेंत सासूसासऱ्यांची खोली लागते. तेथें थबकते. ) ही मामंजींची खोली. हीं दोघंही मला अत्यंत वंद्य आहेत. यांनाही शेवटला नमस्कार करतें.

[ त्या खोलीकडे नमस्कार करून पतीच्या खोलीकडे जाते व दार लोटून आंत जाते. कडी लावायला विसरते. दिगंबरपंत आंथरुणावर निजला आहे; त्याच्या चरणांपाशीं जाते. दिगंबरपंत गाढ झोंपेंत आहे. ]

सखूबाईः—( आपल्याशींच ) पांडुरंगा, हे चरण सोडून मी जाऊं ना ? तुझ्या चरणांपाशीं येऊं ना ? पण इथून निघण्यापूर्वी एकवार या चरणांचं वंदन तरी करूं. ( दिगंबरपंताच्या चरणांवर मस्तक ठेवते. ) काय, इकडल्या आज्ञेवांचून मी या पायांपासून दूर जाणार आहें ? छे ! छे ! छे ! हें पतिव्रतेचं ब्रीद नव्हे. नाहीं, पांडुरंगा, नाहीं मी तुझ्याकडे येत. इथेंच राहीन. या चरणांनीं मला किती जरी ताडण केलं तरी इथेंच राहीन आणखी सेवा करीन. इकडे गाढ झोंप लागली आहे, तेव्हां पाय चुरूं लागलें तर झोंपमोड होईल. पण नाहीं. सेवा केलीच पाहिजे. ( दिगंबरपंतांचा एक पाय मांडीवर घेते व आपल्याशींच गुणगुणते. )—

## अभंग.

**तुझे पाय माझी काशी । कोण जाय माझें काशी ॥ ध्रु० ॥**
**तुझें रूप तेंचि ध्यान । तेंचि माझें अनुष्ठान ॥ १ ॥**
**तुझे चरण तेचि गया । जालें गयावर्जन देहा ॥ २ ॥**
**तुका म्हणे सकळ तीर्थ । तुझे पायीं वसती येथ ॥ ३ ॥**

या पायांना सोडून कशाला पंढरपूर न् कशाला काशी ? ( पतीचे पाय चुरूं लागते. इतक्यांत म्हाळसाकाकू बाहेरून मोठ्यानें ओरडते. )



सखूबाई:— या पायांना सोडून कशाला पंढरपूर न् कशाला काशी ! [ पृष्ठ २८.

**म्हाळसाकाकूः**— दिग्या, ए दिग्या, कोण रे शिरलं आहे तुझ्या खोलींत ? मेलीनं लाजा सोडल्या, लाजा. दळायचं थांबलं तेव्हांच मला वाटलं कीं ही कारटी असलं कांहीं तरी करणार. दिग्या, दार उघड. उघड दार. ( दाराला धक्का मारते. दाराला कडी नसल्यामुळें दार उघडतें. ती आंत येते. सखू घाबरून उभी राहते. म्हाळसाबाईच्या ओरडण्यानें दिगंबरपंत घाबरून उठतो. ) आणखी दार उघडंच ? शुद्ध वेसवा दिसते आहेस वेसवा. कोणाच्या परवानगीनं आलीस ग तूं याच्या खोलींत ? यानं का बोलावली तुला ? ( दिगंबरपंताकडे संतप्त मुद्रेनें पहाते. )

**दिगंबरपंतः**—नाहीं, आई, मीं-मीं-मीं-मीं-ना-ना-नाहीं बोलावली. के-के-केव्हां आली, मला ठाऊकसुद्धां नाहीं.

**म्हाळसाकाकूः**— तूं नाहींच माझी आज्ञा मोडायचास, मला ठाऊक आहे. पण ही आहेना वेसवा. मोठा भक्तीचा दिमाख करते. हो चालती माझ्या घरांतून. असले चावटपणाचे प्रकार माझ्या घरांत नाहीं मी चालूं द्यायची. नीघ, नीघ बाहेर. दिग्या, दिग्या, दंडाला धरून एक लाथ मारून घालवून दे खोलीच्या बाहेर. तर मी खरं म्हणेन. नाहीं तर तुझी फूस आहे असंच समजेन.

**दिगंबरपंतः**— नाहीं, तसं नाहीं. पण आई त्यांत काय झालं ?

**म्हाळसाकाकूः**— त्यांत काय झालं ? अरे मेल्या ! त्यांत काय झालं म्हणून मला विचारतोस का ? दम धर तुला सांगतें त्यांत काय झालं तें. मीच हिला घालवून देतें. ( असें म्हणून सखूच्या अंगावर धांवते व तिला फराफर ओढीत अगदीं थोरल्या दाराबाहेर मारून घालवते आणि दरवाजा लावन घेते. )

## प्रवेश ७ वा.

[ स्थळः—गदाधरपंताचा वाडा. मागील दाराचे आंतले बाजूस दिगंबरपंत आपल्याशींच विचार करीत येरझारा घालीत आहे. ]

**दिगंबरपंतः—** पद.

**लेशमात्र सुख न मला भवनीं होतसे ॥ ध्रु० ॥**
**रात्रंदिन मद्गृहिणी ।**
**गृहकार्यी दक्ष असुनि ।**
**अप्रिय का होय सदनिं ।**
**कळत हें मुळीं नसे ॥ १ ॥**
**प्रिय जननी तेविं भगिनी ।**
**छळिती तिज कटु वचनीं ॥**
**अनुदिनिं हें मी बघुनी ।**
**भ्रांतचित्त होतसे ॥ २ ॥**

आज मात्र अगदीं कडेलोट झाला. अपराध काय, आणखी शिक्षा काय ? माझ्या खोलींत ती आली हा केवढा अपराध ! पण आपण तरी आतां आईच्या आज्ञेबाहेर जायचं नाहीं हें व्रत पाळायचं कुठपर्यंत ? त्याला कांहीं मर्यादा ! आजपर्यंत जो तिचा छळ होत होता तो घरांतल्या घरांत चालला होता. पण घरांतल्या घरांत कसला ! सगळा गांव तर त्याबद्दल हंसतो आहे आणखी टीका करतो आहे ! आपण मात्र डोळे मिटून दूध पिणाऱ्या मांजराप्रमाणें कोणाला कांहीं दिसत नाहीं असं धरून चाललों आहोंत ! बस्स ! तें कांहीं नाहीं. आतां यापुढें या बाबतींत कोणाचं ऐकायचं म्हणून नाहीं, असा निश्चय केला पाहिजे. पण हा काय आपण पहिल्यानंच निश्चय करतों आहों ? आईसाहेबांनीं अमुक कर म्हटलं कीं मनांतला निश्चय मनांतच राहतो. आणखी हातपाय आपले त्यांच्या आज्ञेप्रमाणें करायला धांवतील. ( थोडा थांबून ) बरं, हिनं तरी आपला हट्ट धरून कां बसावं हो ! आईचं—

जर ह्मणणं कीं, विठोबा आपल्या घरांत धार्जिणा नाहीं, तर ही तरी तो फेंकून कां देत नाहीं? वारकरी आणखी त्यांची पताका पाहिली कीं, आईच्या मस्तकांत जर तिडीक उठते, तर ही तरी त्या तसल्या लोकांशीं बोलते कशाला? आणखी त्या विठोबाच्या देवळांत भजन ऐकायला उभी राहते कशाला? उगीच नाहीं आई छळीत! तरी पण इतका छळ कांहीं चांगला नाहीं:-

पद.

**छळित जननि बहुत तिजसि कठिण वच वदोनी॥**
**म्लान वदन बघुनि तिचें कींव येइ मन्मनीं॥ ध्रु० ॥**
**एकांती भेटुनि तिज बोध तरि करावा॥**
**इष्ट गमे परि नच ये सहज समय तोहि जुळुनि॥ १॥**

छे! छे बोवा, फार कठीण! रात्रीं आपल्याजवळ रकटं टाकून त्याच्यावर तिला निजवते, आणखी दाराला कडी लावून घेते! आमची काय तिथें जाण्याची प्राज्ञा आहे! दोन प्रहर रात्र उलटली नाहीं. तोंच बाहेरच्या बाजूला तिला दळायला बसवते! तेव्हां पाळथीवर बसून तरी उपयोग काय? परवां दळतां दळतां बिचारीला झोंप येऊन ती तिथल्या तिथेंच लवंडली! हलकेच उठून पाऊल न वाजवतां तिच्याजवळ गेलों, तिला उठवन खोलींत आणण्याचा विचार केला. आईसाहेबांचाही डोळा लागला होता. संधि बरी होती. पण काय? आमची स्वारी जवळ जाऊन ओणवून तिला उठवायला हात लावणार, तोंच "दळायचं कां थांबलं? येऊं का बाहेर?" हे आईसाहेबांचे शब्द कानावर आदळले! मग कोण त्रेधा! खोलींत जाऊन आंथरूण कसं गांठतों असं मला झालं. ते दिवशींची ती तऱ्हा! आणखी आज ती आली तर आमच्या नशिबानं झोंप घेतली! पण तें कांहीं नाहीं. आतां यापुढें आईसाहेबांचं ऐकायचं नाहीं. आत्तांच जाऊन तिला घरांत घेऊन येतों कसा! मला वाटतं, ती अजून दाराशींच बसली असेल. तेव्हां......पण आईच्या अंगावरून जाऊन थोरलं दार उघडून कशाला जावं? या मागल्या दारानं जाऊन इकडूनच तिला घेऊन यावं. आपल्या अशा करण्यानं जो कडाका उडेल, तो निदान पुढच्या

दारीं नको ! इकडेच काय उडेल तो पाहूं ! ( दार उघडतो तों भिमी आंत येते. ) कोण भिमे, इतक्या सकाळीं ग कोणीकडे:-

**भीमाः**— इकडेच. आज पहांटेसच काय कडाका उडाला त्याचा शोध करायला आलें.

**दिगंबरः**— कडाका ? कसला कडाका ? आमच्या घरांत पहांटे काय झालं, ह्याची तुमच्या घरापर्यंत गेली का बातमी ?

**भीमाः**— बातमी ? बातमी न जायला काय झालं ? तुमच्या घराशेजारींच आहे कीं एक सांडणीस्वार ! अनसूयेनं आतांच चंद्रभागेला आणखी तिच्या सासूला सांगितलंन् आणखी तिच्या सासूनं लागलीच येऊन आमच्या सासूबाईंना सांगितलं. मग पुढचं दार लावलेलं पाहिलं, तेव्हां मागल्या दाराशीं आलें. तों तूं आयतंच दार उघडलंस.

**दिगंबरः**— पण तुला पुढल्या दाराशीं नाहीं का कोणी दिसलं ?

**भीमाः**—( मुद्दाम कळलें नाहींसें करून ) पुढल्या दाराशीं ! पुढल्या दाराशीं कोण दिसणार ! सकाळच्या प्रहरीं तुम्हीं सगळीं मागल्या दाराशीं असाल म्हणून मी इकडे आलें.

**दिगंबरः**— ती नाहीं का दिसली दारांत ?

**भीमाः**— ( आपल्याशींच हंसून व भिंवया उडवून ) ती ? ती कोण ?

**दिगंबरः**— अग, ती कोण काय विचारतेस ? ती ?

**भीमाः**— ( पुनः चेष्टेनें हंसून ) हं ! हं ! ती म्हणजे सखूवहिनी का ? नाहीं बाई दिसली !

**दिगंबरः**— मग कुठं बरं गेली असेल ?

**भीमाः**— गेली असेल आपल्या विठोबाचा धांवा करायला ! तिला दुसरं काय सुचतं आहे ! कांहीं म्हाळसाकाकूंच्या पायां पडून ' चुकलें, पुन्हां करणार नाहीं ' असं म्हणून क्षमाबिमा मागायची नाहीं ! सासूची गाऱ्हाणीं देत आतां सगळ्या गांवभर हिंडायची ! उगीच का जें तें सून चांगली, आणखी नवरान् सासू वाईट म्हणून म्हणतं तें ! एवढंसं कांहीं घरांत झालं, कीं गांवांत आधीं जाऊन सांगायची ! त्या दोघी आहेत ना तिच्या

**दिगंबरः**– पण तुला पुढल्या दाराशीं नाहीं का कोणीं दिसलं ?

**भीमाः**–( मुद्दाम कळलें नाहींसें करून ) पुढल्या दाराशीं ? पुढल्या दाराशीं कोण दिसणार ? सकाळच्या प्रहरीं तुम्हीं सगळीं मागल्या दाराशीं असाल म्हणून मी इकडे आलें.

**दिगंबरः**– ती नाहीं का दिसली दारांत ?

**भीमाः**– ( आपल्याशींच हंसून व भिंवया उडवून ) ती ? ती कोण ?

**दिगंबरः**– अग, ती कोण काय विचारतेस ? ती ?

**भीमाः**–(पुनः चेष्टेनें हंसून ) ह ! हं ! ती म्हणजे सखूवहिनी का ? नाहीं बाई दिसली !

**दिगंबरः**– मग कुठें बर गेली असेल ?

**भीमाः**– गेली असेल आपल्या विठोबाचा धांवा करायला ! तिला दुसर काय सुचतं आहे ? कांहीं म्हाळसाकाकूंच्या पायां पडून ' चुकलें, पुन्हां करणार नाहीं ' असं म्हणून क्षमाबिमा मागायची नाहीं ! सासूचीं गाऱ्हाणीं देत आतां सगळ्या गांवभर हिंडायची ! उगीच का जें तें सून चांगली, आणखी नवरीनू सासू वाईट म्हणून म्हणतं तें ! एवढंसं कांहीं घरांत झालं, कीं गांवांत आधीं जाऊन सांगायची ! त्या दोघी आहेत ना तिच्या जिवाच्या मैत्रिणी ! त्यांना हिनं जाऊन सांगायचं, आणखी त्यांनीं गांवभर त्याचीं वाणं वांटायचीं ! पुन्हां ही आपली...

**दिगंबरः**-- पण भिमे, ही कुठें बरं गेली असेल ! कांहीं जिवाचं बरंवाईट करून......

**भीमाः**-- अग बाई ! दिगूतात्या ! आज फारशी काळजी वाटते आहे बायकोचा ?

**दिगंबरः**– काळजी कसली म्हणा ! पण भिमे, ती कुठें गेली, काय करते आहे, तें पाहून येतेस का ? मीं तुला पाहिलो सांगितलं म्हणून आईला मात्र नको हो सांगूं ?

**भीमाः**– ( हंसून ) हं ! एकून आज कांहीं तरी चमत्कार घडला आहे म्हणायचा ! आईच्या न कळत बायकोची चौकशी करून तला सांगं का?

**दिगंबरः**– आणखी समजूत करून घरीं परत आणलीस तर फारच चांगलं ! मीं तुला पाठविली, आणखी मींच तिला परत बोलावली आहे असं सांग हवं तर !

**भीमाः**--( मोठ्यानें ) वाहवा ! वाहवा ! मला वाटतं सखूवहिनीला आज विठोबाच पावला ! नाहीं तर म्हाळसाकाकूंच्या न कळत… ..

**दिगंबरः**-- अग भिमे, भिमे, इतक्या मोठ्यानं ओरडूं नको. आई ऐकेल ना ? जा, जा. तिला घेऊन ये. अन् नसलं जायचं तर जाऊं नको. पण तूं कुठली ऐकायला ? मीच आपला आंत जाऊन बसतों कसा ! ( लगबगीनें निघून जातो. )

**भीमाः**– याच्या मनाची कांहीं तरा चलबिचल झाली आहे खास. बरोबरच आहे ! तरणाताठा मुलगा, अशा बाबतींत किती दिवस आई-च्या धाकांत राहील ? पण हें असं कांहीं होऊं देतां उपयोग नाहीं ! भडका सारखा जोरानं चालू रहावा म्हणून आपण तेल ओतीत राह्यलं पाहिजे. ती बहुतकरून ( विचार करून ) तिकडेच गेली असेल. आपण-ही तिकडेच जाऊं. आपल्या तर्काप्रमाणेंच असलं, तर चांगलाच वणवा पेटवून देऊं ?

---

## प्रवेश ८ वा.

[ **स्थळ**—नदीच्या कांठीं देवालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील एका पारावर सखू सचिंत बसली आहे. ]

**सखूबाईः**– पांडुरंगा !—

पद.

मज आतां जूरला त्राता । देवा पंढरीनाथा ॥ ध्रु० ॥
ममतेचे तेही गेले ।
दुर्दैवें जननीजनिता ॥ १
पाळें माझें दैवत तेही ।
विटले पारि सेवा घेतां ॥ २ ॥

सदनांतुनि हांकुनि दिधलें ।
मजला मारुनियां लाथा ॥ ३ ॥
मग कोणा शरण मी जाऊं ।
तुजविण शिणली ही दुहिता ॥ ४ ॥

मला दोहींकडून कीं रे अडचण आली आहे. काय करावं कांहीं समजत नाहीं. पंढरीला जाऊन तुझ्या चरणापाशीं रहावं असा निश्चय केला; पण तिकडचे पाय पाहिल्याबरोबर पतिव्रतेच्या धर्माला आपण चुकतों आहोंत असं वाटून तो डळमळला, पतिचरणांची सेवा करीत रहावं यांत पंढरपूर आलं, काशी आली, सगळीं क्षेत्रं आलीं असा मनाला बोध केला, पण सासूबाईंना त्यांत पाप वाटून त्यांनीं मला घरांतून घालवून दिलं. बरं आहे. देवा, मीं भलताच निश्चय केला, तुझे चरण सोडले म्हणूनच ही शिक्षा असेल. आतां दुसरा तिसरा विचार नाहीं. आतां एक तुझेच पाय.

( इतक्यांत चंद्रभागा व अनुसूया तिला शोधीत शोधीत येतात. )

**चंद्रभागा:**— सखू, तुझं आम्हीं समाधान करावं तरी कोणत्या शब्दांनीं ? आज पहांटे काय प्रकार झाला, तो अनसूयेनं ऐकला, आणखी लागलीच ती माझ्याकडे सांगायला आली. तेव्हां आम्हीं आमच्या घरची मंडळी काय म्हणतील काय नाहीं, याचा विचार न करतां आधीं तूं कुठें गेलीस तें पाहण्यासाठीं आलों.

**सखूबाई:**— चंद्रे, अनसूये, माझ्यावर तुमचे किती उपकार आहेत ! तुम्ही माझ्या मैत्रिणी जर मला नसतां तर मला तोंड उघडायलासुद्धां कुठें जागा नव्हती. या वेळीं तुमचीन् माझी शेवटची भेट तरी झाली हे देवाचे केवढे उपकार !

**अनसूया:**— शेवटची ? शेवटची असं कां म्हणतेस ?

**सखूबाई:**— मैत्रिणींनो, मी आतां तुम्हांला सोडून जाणार. सासूबाईंनीं आज मला घरांतन घालवून दिलं, आणखी पुनः आमचा उंबरठा आपल्या सावलीनं विटाळूं नकोस असं सांगितलं. तेव्हां आज कितीक दिवसांचा पंढरीला जाण्याचा माझा बेत पार पाडण्याचा मीं निश्चय केला.

आहे. ( इतक्यांत भिमी गुपचुप येऊन त्यांच्या मागें उभी राहते व त्यांच्या न कळत त्यांचीं बोलणीं काय चाललीं आहेत तीं ऐकते. )चंद्रे, अनसूये, तुमचा निरोप घ्यायला मला सांपडेल असं कांहीं मला वाटलं नव्हतं. पण योग यायचा असला, म्हणजे असा येतो. एकदां मला कडकडून भेटा कशा. ( दोघींच्याही गळ्यांत ती हात घालून त्यांस जवळ ओढते. ) मी आतां आज पंढरपूरला जाणार. ते, त्या झाडाखालीं उतरले आहेत ते विश्वंभरबोआ, त्यांची आणखी माझ्या बाबांची फार मैत्री होती. त्यांना आणखी त्यांची बायको गिरजाबाई यांनीं मला आपल्याबरोबर नेण्याचं कबूल केलं आहे. माझी आठवण असूं द्या. पंढरपूरला गेल्यावर देवानं गाऱ्हाणं ऐकन माझ्या आईबापांप्रमाणेंच जर मला आपल्या पायांपाशीं लौकर नेलं, तर बरंच झालं. नाहीं तर जीव आहे तोंपर्यंत मी विठोबाची सेवा करून तिथेंच दिवस काढणार. आणखी अर्ध्या घटकेंत निघणारच.

**भीमाः**–(आनंदून आपल्याशीं ) वाहवा ! हवा ! आज तर आपलं फारच चांगलं काम झालं. आतां आधीं म्हाळसाकाकूंकडे जाऊन हें सांगू दे. इतका वेळ यांच्या पाळथीवर राह्यल्याचं सार्थक झालं. (झटूकन् जाते. )

**अनसूयाः**– सखू, तुला सुदैवी म्हणावं का दुर्दैवी म्हणावं, सुखी म्हणावं का दुःखी म्हणावं, आम्हांला कांहीं समजत नाहीं. एवढ्याशा वयांत संसार सोडून वैराग्य घ्यायची पाळी यावी अन ती सोन्यासारखा नवरा, घरदार सगळं कांहीं ठीकठाक असतांना–म्हणजे काय म्हणावं ? पण बाई तुझी तरी किती धैर्य आहे ! आमच्यासारख्या तर कधींच आपल्या जिवाचं कांहीं तरी करत्या.

**सखूबाईः**– अनसूये, चंद्रे, तुमच्यासारख्या मैत्रिणींना तर काय पण शत्रूंनासुद्धां माझ्या दुःखाचं वारं लागूं देऊं नको, एवढं मागणं मी त्या पंढरीनाथाजवळ पहिल्या प्रथम मागेन. बाकी माझं म्हणाल, तर मला या दुःखाचं कांहींच वाटत नाहीं. मला अगदीं पूर्ण समाधान आहे. हें सगळं हें विठोबाच्याच इच्छेनं घडतं. मग असमाधान तरी कां

करून घ्यावं ? जा आतां तुम्ही. कुठें गेलां म्हणून तुम्हांला शोधायला मंडळी येईल आणखी माझा बेत दुसऱ्यांना कळेल.—

**अभंग.**

पंढरीसी जावें ऐसें माझे मनीं ।
विठाई जननी केव्हां भेटे ॥ ध्रु० ॥
नलगे त्यावीण सुखाचा सोहळा ।
लागे मज ज्वाळा अग्नीचीया ॥ १ ॥
तुका म्हणे त्याचे पाहिलिया पाय ।
मग दुःख जाय सर्व माझें ॥ २ ॥

चला, मी त्या झाडाखालीं त्या मंडळीकडे जातें, आणखी तुम्ही आपापल्या घरीं जा. तुम्ही भेटलां तशा भिमावन्संही भेटत्या, तर त्यांचाही निरोप घेतला असता. पण त्यांना हें माझं करणं कुठलं आवडायला ?

( इतक्यांत गिरिजाबाई येते. )

गिरिजाबाई:– सखू, आम्हीं किती वेळ तुझी वाट पाहिली. शेवटीं म्हटलं आतां कांहीं ही येत नाहीं, तेव्हां निघावं म्हणून दर्शनासाठीं आलों. चल, तूं येणार ना ?

सखूबाई:– हो. हो. येणार म्हणजे अगदीं खचित येणार. आतां माझं मन बदलायला कांहीं कारण उरलं नाहीं, हा माझा विठोबा आणखी ही मी, तुमच्यापुढें दोन पावलं.

गिरिजाबाई:– बरं आहे. चल तर देवदर्शन घेऊन. आतां भजन करून चालूं लागायचं.

सखूबाई:–ठीक आहे. अनसये, चंद्रे, मी आतां तुमचा निरोप घेतें.

**पद.**

येतें मी स्मरण द्या ।
या दीना सखीचें बाई ॥
आठवुं किती उपकृति तुमची ।
[illegible] ॥

जा सुख तुम्ही निजसदनीं ।
परि दक्ष असा हरिभजनीं ।
रक्षील तुम्हां निजसदनीं ।
होईल तोाच सुखदायी ॥ १ ॥

अनसूया:–

दाटला कंठ वदवेना ।
ये अश्रूपूर बहु नयना ।
तव वियोग मुळिं साहेना ।
सखि आम्हां तुजसम नाहीं ॥ २ ॥

**सखूबाई:**–मैत्रिणींनो. जा तुम्ही. तुम्हांला विठोबारायांनं जसं आतां पयत सुखांत ठेविलं आहे तसंच पुढेंही तो ठेवील. मात्र त्याला अगदीं सुद्धां विसरूं नका, एकांतीं असो कीं लोकांतीं असो, त्याचं नामस्मरण करीत जा, आणखी पंढरीला कधीं आलांत अन् मी जिवंत असलें तर माझी आठवण करून मला भेटा. भिमावन्सं भेटल्या नाहींत. जातांना मी त्यांची आठवण काढली होती म्हणून त्यांना सांगा.

**चंद्रभागा:**– सख, आमचे कंठ दाटून आले, आम्हांला बोलवत नाहीं.

**अनसूया:**–गिरजाबाई, सखूला सांभाळा बरं. तिनें जितकीं दुःखं भोगिलीं आहेत, इतकीं त्रिभुवनांत कोणीं भोगलीं नसतील. सखू, आतां तुला एकदां कडकडून भेटतों. आणखी आम्ही जातों.

[ त्या दोघी सखूला कडकडून भेटतात. आणि ओक्साबोक्शीं रडूं लागतात. नंतर हळूच मंद पावलांनीं चालत व वळून वळून तिच्याकडे पहात पहात जातात. गिरिजाबाई व सखूही जातात. ]



म्हाळसाबाई:- (वारकऱ्यांस) मेल्यांनो, पंढरपूरच्या वाऱ्या करतां, त्या अशा दुसऱ्याच्या पोरी फुसलावून नेण्याकरितां का ?

[ पृष्ठ ३९.

# प्रवेश ९ वा.

[ स्थळ--कऱ्हाड गांवापासून पंढरीचा रस्ता. विश्वंभरबोआ व वारकरी कडाक्याचें भजन करीत आहेत, सखू या मंडळींतच उभी आहे.

अभग.

बहुतां जन्मा अंतीं । जन्मलासी नरा ।
देव हा सोयरा । करीं आतां ॥
करी आतां बापा । स्वहिताचा स्वार्थ ।
अनर्थाचा अर्थ । सांडीं आतां ॥
सांडीं आतां कुडी । कल्पनेची वाट ।
मार्ग आहे नीट । पंढरीचा ॥
पंढरीस जावें । सव सुख घ्यावें ।
रूप तें पहावें । विटेवरी ॥
विटेवरी नीट । आनंदाचा कंद ।
तुका नाचे छंद । नामघोषें ॥

[ इतक्यांत मागून अतिशय कर्कश आवाजानें पुढील शब्द सर्व मंडळीच्या कानीं पडतात व लागलींच म्हाळसाबाई, दिगंबरपंत व भिमी बाहेर येतात. सखूबाई थरथर कांपूं लागते. ]

**म्हाळसाबाई:**–पहातोस काय षंढा ! कमरेंत लाथ मारून पाड खालीं आणखी वेणी धरून फरफरां ओढीत ने घरीं. कुठलं नेभळं पोरटं झालं मला कुणाला ठाऊक ! धडधडीत या बंड्या वारकऱ्याचा हात धरून बायको चालली तरी हा बावळटासारखा पहातोच आहे. ( ती आपणच सखूचा पदर धरून ओढते. दिगंबरपंत तिच्या वेणीला हिसका देऊन ओढितो.)

**म्हाळसाबाई:**— ( वारकऱ्यांस) मेल्यांनो, पंढरीच्या वाऱ्या करितां त्या अशा दुसऱ्याच्या पोरी फुसलावून नेण्याकरितां का ? लाजा नाहीं वाटत तुम्हांला !

**विश्वंभरबोवा:**– बाई, आम्हांला कां उगीच पुष्पांजली वाहतां ?

आमच्या सोबतीनं ही जायला निघाली, आम्हीं तिला चल म्हटलं, यांत आमचा काय दोष ?

**म्हाळसाबाई:**– पहा, पहा कसा मानभव आहे तो। दिग्या, याच्याच मेल्याच्या डोक्यांत काठी घाल रे एक. तुम्हीं हिला फुसलावली नसती, तर काय ती तुमच्या पाठीस लागली असती ? आज तिनें दिवस एकसारखी तुम्ही तिला वाटेंत गांठून तिचं मन वळवलंत. या थेरड्या कुंटिणीनं तर......

**गिरिजाबाई:**—विठ्ठल ! विठ्ठल ! विठ्ठल ? काय बाई हें बोलतेस हें ?

**म्हाळसाबाई:**– हों, आतां विठ्ठल आठवेल तर काय झालं ? माझ्या भिमीनं जर वेळींच येऊन मला सांगितलं नसतं तर आज ही कारटी नेतच होतां कीं नाहीं फुसलावून तुम्ही ! ( दिगंबरपंताकेड वळून ) मेल्या, मजा कसली पहातोस ? दोन लाथा मारून घरीं घेऊन जा. आतां तिला कोंडून ठेवण्याखेरीज दुसरा उपाय नाहीं. चांगली दोरखंडांनीं बांधून जेरबंदांनीं सडकला पाहिजे. ( सखूजवळ जाऊन जोरानें तिच गालगुचे घेऊन ) चल, चल हो पुढें. (विश्वभंरबोआकडे व त्याच्या मंडळीकडे वळून ) सोद मेले हुच्चभाई ! सगळेंच तुकाराम बनतात तुकाराम ! पण माझ्यासारख्या जिजाबाई आहेत ना तमच्या डोक्यांवर मिरीं वांटायला ! उठतो तो मेला टाळ कुटतो ! मेल्यांना कामधंदा करायला नको. आयता लोंदा पडायला पाहिजे तोंडांत. लाजा वांटून प्यायले आहेत लाजा ! आपल्या रांडापोरांना तळमळायला लावतात, आणखी दुसऱ्यांच्या पोरी फुसलावून नेतात. दम धरा, आतां सरकारांतच वर्दी देतें म्हणजे तुमचं निघतंय् पंढरपूर.

[ सखूला मारीत पुढें घालून दिगंबरपंत जातो. म्हाळसाबाई व भिमीही जातात. ]

**विश्वंभरबोआ:**–( झालेला प्रकार पाहून घावरून गेलेल्या गिरिजाबाईस ) पाह्यलंस ! मीं सांगितल्याचा आला पडताळा ? आतां इथून पाय काढूं या कशीं ? हं विठ्ठल, विठ्ठल, विठ्ठल, विठ्ठल, उचला पाय. [ जातात.

अंक पहिला समाप्त

# अंक २ रा.

## प्रवेश १ ला.

स्थळः-कऱ्हाड. गदाधरपंताच्या वाड्यांतील एक अंधारी खो[illegible]-
बारा घटका रात्रीचा सुमार. अर्थात् त्या खोलींत फार अंधा[illegible]
एका खांबाशीं सखूला जेरबंदांनीं बांधली आहे. ती
अत्यंत दुःखी होऊन आपल्याशींच झाल्या गोष्टी-
बद्दल विचार करीत आहे. ]

सखूबाइः— देवा, पांडुरंगा, तुझ्या मनांत माझी फजितीच करायची होती का रे? नाहीं तर पंढरीला जाण्याचा निश्चय माझ्याकडून कां करवलास? माझा छळ तुला दिसत नाहीं का?

पद.

झणिं धांव सख्या यदुराया ।
कशि हांक नये माझी ऐकाया ॥ ध्रु० ॥
तुजविण कोण अन्य असे बा ।
जनिं दीनाचा कैवारी ।
साहेना मज हें दृढबंधन ।
झाली व्याकुळ काया ॥ १ ॥
पतिसहवास आस दिसेना ।
मग देवा कोठें जावें ।
थारा दे मज तव पदकमलीं ।
ही आशा पुरवाया ॥ २ ॥

त्या बिचाऱ्या गिरिजाबाईनं आणखी विश्वंभरबोआंनीं मला सुखरूप घेऊन

त्यांना सासूबाईच्या शिव्या खाव्या लागल्या. अयाई ! दोर मासांत रुतले आहेत; आणखी सगळं अंग कसं झालं आहे, जसं कांहीं कोणीं त्याला कांट्यांनीं बोंचबोंचून घेतं आहे. आतां मला हे अशी किती वेळ बांधून ठेवणार ? पण देवा, स्त्रीला पति हेंच दैवत हें जाणत असून मीं तसंच डोकं खुपसून दाराबाहेर तर दाराबाहेर बसून राह्यचं. तें न राहतां आपली बेधडक चाउती झालें; आपलं खरं कर्तव्य विसरलें; म्हणून तर नाहीं ना तूं मला हें शासन केलंस ? आजपर्यंत काय जें होत होतं तें आपलं घरां-तल्या घरांतच होत होतं. पण आज सगळ्या गांवभर फजिती झाली. धिंडवडे निघाले. परपुरुषाचा हात धरून चालली होती असं लोकं म्हणा-यला लागलीं. शेवटीं ज्या बंधनांतून सुटायला पहात होतें त्याच्यापेक्षां सहस्रपट कठिण अशा बंधनांत येऊन पडलें. पण लोकांकडे तरी काय बोल ? त्यांना जें दिसतं त्याप्रमाणें त्यांचं मत बनतं, आणखी मत बनलं कीं तसं ते बोलतात. मी ज्या परपुरुषाची चरणसेवा करायला जात होतें, तो मला मिळता अन् मग लोकं किती जरी बोलतीं तरी मला कांहीं त्याचं वाटलं नसतं. पण तो लाभला नाहीं. परपुरुष जो तूं पांडुरंग, त्या तूं मला नाहीं आपल्यावळ येऊं दिलंस. माझा फजितवाडा केलास. पण मीं तुला आपल्या ओंचांत घालून ठेवला आहे. हाय हाय ! तिथून तुला बाहेर काढून दृष्टीसमोर धरायलासुद्धां कीं रे मला शक्ति नाहीं ! कां तूं असं केलंस? पांडुरंगा, पंढरीनाथा, तूं असं कां केलंस मला सांग. देवा, तुझी कीर्ति काय आणखी तूं करतोस काय ?

अभंग.

**पडतां जडभारी । दासीं आठवावा हरी ॥ ध्रु० ॥**<br>
**मग तो होऊं नेदी शीण । आड घाली सुदर्शन ॥१॥**<br>
**नामाच्या चिंतनें । बारा वाटा पळती विघ्नें ॥ २ ॥**<br>
**तुका म्हणे प्राण । करा देवासी अर्पण ॥ ३ ॥**

पण देवा, आमचं संचित सरल्यावांचून तूं तरी काय करणार ? माझं

[ सखूबाई अशा प्रकारें आपल्याशीं गुणगुणत आहे तों म्हाळसाबाई हातांत लामण दिवा घेऊन कर्कशपणानें ओरडत येते. तिच्या मागें दिगंबरपंत आहे. ]

म्हाळसाबाईः– अरे, ती महामायावी आहे. कांहीं तरी चेटूक करून या खोलींतून सुद्धां पळून जायची. तीनतीनदां पाह्यलंच पाहिजे. काय बाई पण आतांच्या या धाडसी कारटचा ! आपली घराच्या जरा बाहेर घातली, तर गेली दुसऱ्याचा हात धरून. आम्हांला कांहीं बाई असला अगोचरपणा कधीं ठाऊक नाहीं. अन् आधीं कधीं आम्हीं असले हे कथापुराणांचे वेडे वेडे चार केलेच नाहींत. आपलं घरन् आपला कामधंदा यांच्याखेरीज दुसरीकडे पहायला आम्हांला उसंत तरी कुठें असते ! या पोरींना कामंच नाहींत. दिग्या, मी तुला बजावीत होतें ना कीं हा तुझा लाडीकपणा चांगला नाहीं म्हणून ! पण तुला तेवढी कठें अक्कल ? अगदीं मीं भविष्य केलं होतं तसं झालं कीं नाहीं ? मला आपलं वाटे, का ही एखाद्या दिवशीं आम्हांला अपेश देऊन कोणा तरी लङनिरंजन वारकऱ्याचा हात धरून जायची, कधीं चुकायची नाहीं. आतां तरी शहाणा हो. दिग्या, धर रे हा दिवा, पण पाडूंबिडूं नकोस हो आज सणाचा ! तूं एक आचरटच आहेस.

दिगंबरः– आई, तें दिवा धरायचं नाहीं बोआ जमायचं आपल्याला! किल्ली दे इकडे, मी कुलूप उघडतों.

म्हाळसाबाईः– अरे मेल्या, किल्ली पाहिजे का तुला ! धर दिवा ! ( दिगंबरपंत दिवा धरतो. म्हाळसाबाई कुलूप काढून खोलींत जाते व दिगंबरपंतासही बोलावते. तो आंत जाऊन सखूकडे दयार्द्र दृष्टीनें पहातो; पाहून ) पहातो आहेस काय असा कींव आल्यासारखा तिच्याकडे ! ती का कींव करण्यासारखी का बायको आहे ! नसतं बांधून ठेवलं आहे तेवढ्यानं काय होतं आहे. चांगला असा नाकाला डाग दिला पाहिजे. ( दिवा आपल्या हातीं घेऊन त्याची ज्योत सखूच्या नाकाला लावते. भाजल्यामुळें सखू " हाय हाय " करून ओरडते. ) आमच्या नाकाला चुना लावून पळून

फासलंस ना ? तुझं तोंड जाळून काळं करतें. आतां कर, कर तुझ्या त्या पंढरीच्या विठोबाचं स्मरण. येऊं दे तो तुला सोडवायला. पहातें कसा येतो तो. माझ्यासारखी पुढें तुझ्या देवाचं तर काय, पण त्या देवाच्या देवाचं सुद्धां कांही चालायचं नाहीं. कमरेवर हातच ठेवून उभा रहायचा तो. दिग्या, बघरे नीट सगळे दोर आंवळले आहेत का नाहीं ते. मला नीट दिसत नाहीं म्हणून तर तुला आणला. बघ मेल्या. तिच्या तोंडाकडे पहातो आहे दोर बघायला सांगितलं ते. ( दिगंबरपंत नीट पाहतो, आणखी सखूबाईची स्थिति पाहून त्याच्या अंगावर शहारे येतात, तें जाणून ) दुसऱ्याचा हात धरून बायको गेली तरी तूं तिची कींवच करतोस ? तूं बाइल्याच आहेस. आधीं आतां दोन लाथा मार, दोन चपराकी मार; तेव्हां मी इथून हलेन. मार. तुला माझं ऐकायचं आहे का नाहीं ? त्या भिमीच्या नवऱ्यासारखा तुला बाहेरचा नाद लागला तरी मला आतां कांहीं वाईट वाटायचं नाहीं. पण हिच्याकडे असं पहात जाऊं नको. जा. माझी तुला मुभा आहे. पण हिला मार, मार, हो पुढें. ( दिगंबरपंत पुढें होऊन सखूला हळूच लाथ व चपराक मारतो. त्याला जोरानें मारवत नाहीं. हें पाहून, ) हा मेल्या नेभळ्या, तुझ्या हातपायांत जोरच नाहीं, असा कसा माझ्या पोटीं जल्माला आलास ? पण तूं तरी काय करशील? ते एक सांगत असत कीं नाहीं मला ' सुनेला छळूं नये. ' पहिल्या पहिल्यानं रोज त्यांनीं हिचा कैवार घ्यायचा. पण जेव्हां का एकदां खाकरवांसा घातला आणखी बसलें कपाळ फोडायला, तेव्हांपासून अगदा नांव सोडलं. पाहा ऐकते आहे कशी ! अरे, ही मोठी मायावी ! त्यांच्या पुढें पुढें करायची, त्यांचीं कामं करायला धांवायची, पूजेचं करायची, धोतरं धुवायची आणखी सारा दिवस त्यांच्यापुढून इकडून तिकडे तिकडून इकडे फलकावे मारीत असायची. तेव्हांपासून मीं हिचं लक्षण पाहून ठेवलं. दम धर आतां वैशाखांत तुझं दुसरंच लग्न करून टाकतें. ही असूं दे आपली बटकीसारखी. पण बाई हिच्योबरोबर आपल्याला कां म्हणून जाग्रणाची शिक्षा करून घ्यावी ? रात्र झाली आतां. जा, जाऊन नीज जा. आणखी

मीही निजते. पाहूं सकाळीं. ( सखूच्या जवळ जाऊन दांतओठ खाऊन तिचे गालगुचे घेऊन ) येऊं दे आतां तुझा विठोबा तुला सोडवायलान् पंढरपूरला पोंचवायला. पाहूं त्याचं काय सामर्थ्य आहे आणखी तुझी काय भक्ति आहे ती !

[ पुनः दिगंबरपंताच्या हातांत दिवा देऊन दाराला कुलूप लावते. किल्ली नीट पोटकळीस ठेवते आणि दिगंबरपंतास पुढें घालून जाते. सखू आपल्याशींच पुढील अभंग गुणगुणते. ]

अभंग.

आलिया भोगासी असावें सादर ।
देवावरी भार घालूनियां ॥ ध्रु० ॥
मग तो कृपासिंधू निवारी सांकडें ।
येर ते वापुडे काय रंक ॥ १ ॥
भयाचिये पोटीं दुःखाचिया राशी ।
शरण देवासी जातां भलें ॥ २ ॥
तुका म्हणे नव्हे काय त्या करितां ।
चिंतावा तो आतां विश्वंभर ॥ ३ ॥

( ती विठ्ठल विठ्ठल गोविंद गोविंद करीत डोळे मिटून परमेश्वराच्या ध्यानांत निमग्न होते. इतक्यांत गरुडावर बसलेले श्रीविठोबा खालीं उतरतात. )

विठोबा:– गरुडा, जा, आणि सांगितल्याप्रमाणें रूप बदलून नेमल्या जागीं उभा रहा. ( गरुड आल्या मार्गानें जातो. )

विठोबा:–( सखूकडे पाहून ) अहाहा ! माझ्या भक्तानं अशा दुःखाच्या स्थितींतसुद्धां दृढ निष्ठेनं माझ्या नांवाचा जप चालवला आहे. आतां सत्त्व किती पहाणार !

पद.

भक्तजन सदा ।
म्हणति दया सिंधु मला ॥ ध्रु० ॥
जेवीं भ्रमर, सेवि कमल, तेविं मम पदा ॥

**परि सुजन सत्व-अवन करित अदय हृदय करुनी ।**
**होतों छलक, घेतों पारख, नेतां निजपदा ॥ १ ॥**

आतां ठरवल्याप्रमाणें पुढच्या उद्योगाला लागावं. आमच्या चिरंजीवांनीं हें जग उत्पन्न केल्यापासून त्यांतल्या आमच्या भक्तांचीं संकटं निवारण करण्यासाठीं जें वाटेल तें रूप घ्यायचं, हा तर आपला बाणाच आहे. आमचे मोठे दहा अवतार हे आमच्या नाटकाचे दहा अंकच. आणखी त्या प्रत्येक अंकांत हजारों प्रवेश ! तेव्हां त्यांतलाच आजचा हा एक छोटासा प्रवेश आहे. पूर्वीं एकदां मोहिनीचं रूप घेतलं, तेव्हां बायको बनायची लाज धरायचं कारणच नाहीं. तर मग ( विचार करून ) ज्या म्हाताऱ्या गिरिजाबाईनं हिला पंढरपुरला नेण्याचं वचन दिलं होतं तिचंच रूप घेऊन आपण हिची सुटका करून गरुडाबरोबर पंढरपुराला पाठवावी म्हणजे झालं. ती गिरिजाबाई तशी आपली भक्तच आहे. तेव्हां तिचा शब्द राखणं हेंही आपलं कामच हं बरं तर आतां गिरिजाबाई. ( विठोबा अदृश्य होतो. आणि गिरिजाबाईचे रूप घेऊन पुनः दृश्य होतो. )

**गिरिजाबाईः**– गिरिजाबाईचं रूप तर अगदीं बरोबर बनलं. आतां आधीं हिला सोडवावी आणखी गरुडाच्या बरोबर लावून द्यावी. ( दाराजवळ जाऊं लागते. )

**सखूबाईः**– ( एकदम डोळे उघडून इकडून तिकडे पाहून ) कसलं बरं मला एवढं तेज दिसलं ? अन् तें आतां कुठं गेलं ? अहाहा ! काय विलक्षण तेज तें ! पण डोळे उघडल्याबरोबर अंधार ! अन् हीं पावलं कोणाचीं वाजताहेत ? कोण बरं येतं आहे ? सासूबाईची स्वारीच आली वाटतं. आपण आपले डोळे मिटून पुनः मघांचाच सुखानुभव घ्यावा. ( पुनः डोळे मिटते. )

**गिरिजाबाईः**– ( कुलूप काढून आंत शिरून सखूजवळ जाते. प्रेमानें ) सखू, सखू, माझ्याकडे बघ.

**सखूबाईः**– ( त्यांच्याकडे पाहते व एकदम आश्चर्यचकित होऊन ) कोण, गिरिजाबाई ? अन् तुम्ही इथें कुठून आलां ? तुम्ही पंढरपुरला गेलां

नाहीं ? अरेरे ! एकूण शेवटीं सासूबाईनीं सरकारांत कळवायची तजवीज करून तुम्हांला धरून आणलं ना ? देवा, देवा, माझ्यामुळें कितीकांना असा ताप होणार ? त्यापेक्षां मी एकदांची मेलें कां नाहीं ? अन् विश्वंभरबोआंना कैदखान्यांत का टाकलं ?

**गिरिजाबाई:**— आधीं मला तुझे हे दोरखंड सोडूं दे. काय मेल्यांनीं करकाचून बांधली आहे ! (सोडवते.)

**सखूबाई:**— गिरिजाबाई, खरेंच सांगा, विश्वंभरबोआ कुठें आहेत ? त्यांना कैदखान्यांत का टाकलं ?

**गिरिजाबाई:**— अग, तूं उगीच भलताच आपल्या जिवाला त्रास करून घेऊं नको. आम्हांला कोणीं धरलं नाहीं आणखी कांहीं नाहीं. आम्हीं इथून जवळच मुक्काम केला आणखी तिथून मी आलें. तुला घेऊन जाईन असं त्या तुझ्याजवळच्या विठोबासमक्ष मीं कबूल केलं ना ? ते आपले शब्द पार पाडायला आलें हो.

**सखूबाई:**— म्हणजे ?

**गिरिजाबाई:**— म्हणजे काय ? तुला पंढरपुराला जायचं ना ? तेव्हां इथून तुला सोडवून पंढरपुरला पोंचवावयाची तजवीज करून आलें आहें. मीं जें एकदां म्हटलं तें कधीं पुरं केल्याखेरीज राहायची नाहीं.

**सखूबाई:**— आधीं तुम्ही इथें कशा आलां मला सांगा.

**गिरिजाबाई:**— कां बरं ? त्याच्याशीं तुला काय करायचं आहे ? सांगेन फुरसती अंतीं. आतां त्या हकीकती सांगण्यांत का वेळ घालवायचा आहे ? काय ही तुझी स्थिति सखू ! तुझी आई जर असती, तर तिला हें पाहून किती तरी दुःख झालं असतं ! तुला तिच्याकडे पंढरपुराला जायचं ना ? चल, तुला नेऊन पोंचवतें.

**सखूबाई:**— तुम्हीं आपल्या जिवाला कां इतका त्रास करून घेतां ? मला आतां कसलं आलं आहे पंढरपूर ? नाहीं माझं तितकं भाग्य. विठोबाच्या मनांत नाहीं मीं त्याच्या चरणांपाशीं जावं असं.

गिरिजाबाईः— असं वेड्यासारखें बोलूं नकोस. विठोबाच्या मनांत आहे म्हणून तर मी सगळ्या अडचणी दूर करून इथें तुला कोंडून बांधून घातलेल्या जागेंत आलें. पण तूं आतां असा बोलण्यांत का वेळ घालव-णार! बाहेर एक आमच्या दिंडींतलाच माणूस उभा केला आहे. त्याच्या-पर्यंत तुला नेऊन पोंचवतें. तूं आपली त्याच्याबरोबर जा. तो आमच्या चांगला विश्वासांतला आहे. जवळच्या वाटेनं.तो तुला अगदीं लवकर पंढरपूरला नेऊन पोंचवील.

सखूबाईः— तें खरें, पण एवढ्या रात्रीं या आमच्या घरांत तुमचा प्रवेश कसा झाला सांगा.

गिरिजाबाईः– काय ग तीनतीनदां तेंच तेंच तेंच तेंच विचारतेस! तें मीं फुरसतीनं सांगेन म्हणुन सांगितलं ना! आतां ही वेळ कांहीं गोष्टी बोलायची का आहे? आतां एकदां तूं आपली वाटेला लाग. ताबडतोब गेलीस तर......

सखूबाईः— मला बाई तुम्हांला पाहून कांहीं सुचेनासंच झालं आहे. गिरिजाबाई, तुम्ही माझ्याकरितां इतके कष्ट करून आलां या उपकारांची फेड माझ्या हातून होणार तरी कशी?

गिरिजाबाईः— आतां उगीच बोलण्यांत वेळ घालवूं नको म्हणून कितीदां सांगूं? तूं झटकन् निघून गेलीस म्हणजे फेड झालीच.

सखूबाईः— पण मी कशी जाऊं?

गिरिजाबाईः—(त्रासून जरा मोठ्या आवाजानें) कशी जाऊं म्हणजे! मी चांगली आलें, तुला मोकळी केली आहे. बाहेर आमचा माणस उभा केला आहे, तो अगदीं जवळच्या वाटेनं नेईल म्हणून सांगतें आहें, तरी कशी जाऊंच म्हणतेस?

सखूबाईः— अहो–अहो पण एवढ्या मोठ्यानं नका बोलूं. तुमच बोलणं ऐकलं तर सासूबाई आतां चवताळून येतील मला सोडवायला कोणी आलं आहे का काय तें पहायला. अन् मग तुमचं काय करतील

तें करतील. तें कांहीं नाहीं. आतां पंढरपूरला जायचं मी नांव काढायची नाहीं. मीं जाऊं नये म्हणून सासूबाईनीं आणखी तिकडे आपल्या पाठोपाठ येऊन मला धरून आणून इथें बांधून ठेविलें. आतां असं पळून जाणं चांगलं नाहीं. शिवाय मी तुम्हांला सांगतें गिरिजाबाई, विठोबाच्या मनांतून मीं पंढरपूरला जावं असं नाहीं. तसं त्याच्या मनांत असतं तर माझी सगळ्या गांवांतून मारहाण करीत धिंड कां त्यानं काढून दिली असती ?

**गिरिजाबाईः**—तें जसं तूं म्हणतेस, तसंच हें नाहीं का ! विठोबाच्या मनांत जर तुला न्यायचं नसतं तर मी कशाला आलें असतें ! माझं एक, तूं आतां माझ्यावर भरंवसा ठेव आणखी मीं सांगेन तसं कर. माझ्या तोंडून विठोबाच सांगतो आहे असं समज.

**सखूबाईः**— विठोबारायानं मला येऊन कांहीं सांगावं इतकं कुठें माझं नशीब आहे ? तें कांहीं नाहीं. गिरिजाबाई, मीं तुमच्याबरोबर जायचा निश्चय केला, तुमच्याबरोबर निघालें, मी पातिव्रत्यधर्मांत चुकलें, सासूबाईंची अवज्ञा करून पळून जात होतें हें विठोबाला आवडलं नाहीं, म्हणूनच माझी त्यानं अशी स्थिति होऊं दिली. तेव्हां आतां मी कांहीं इथून हलायची नाहीं.

**गिरिजाबाईः**— अन् जन्मभर असंच बांधलेलं राहून दुःख भोगशील?

**सखूबाईः**— हो ! भोग असेल तोंपर्यंत भोगलंच पाहिजे. माझा भोग सरला म्हणजे विठोबा सासूबाईंना, तिकडे—साऱ्या माणसांना चांगली बुद्धि देईल.

**गिरिजाबाईः**— अग वेडे, तुझी भक्ति, तुझी निष्ठा, किती दृढ आहे, तुला पंढरीला जायची किती आतुरता आहे, हें पाहण्यासाठीं विठोबानं तुला कसोटीला लावून पाहिली, आणखी आतां त्याची जेव्हां खात्री झाली तेव्हां मला त्यांच्या न कळत इकडे तुझ्याकडे येऊन तुला सोडवण्याची त्यानं बुद्धि दिली, असं कां नाहीं तुझ्या मनांत येत ? जा, आतां पंढर-

सासू नाहीं तर नवरा कोणी जरी कानोसा घ्यायला आलं रात्रीं, तरी आहे बोआ असं त्यांना वाटेल.

सखूबाइः– काय ? तुम्ही आपल्या स्वतःला माझ्या जागीं बांधून घेणार ! भलतंच एखादं. मग तर मी मुळींच जायची नाहीं. त्यांनीं तुम्हांला माझ्या जागीं पाहिलं, म्हणजे तुमचा किती छळ करतील त्याची तुम्हांला कल्पना नाहीं. पण गिरिजाबाई, हा काय चमत्कार आहे बरं ?

पद.

किरणें विकसवी रविपंकजाला ।
कीं चंद्र टवटवित करि नीलकमला ॥ ध्रु० ॥
तसा तुम्हीं हा चमत्कार केला ।
कुरवाळितां अंग ये शक्ति मजला ॥ १ ॥
दिन दोन मजला उपवास घडला ।
परि भूक हरुनि थकवाही गेला ॥ २ ॥

गिरिजाबाईः– बरं पण आतां तूं अशी बोलत बसून का वेळ घालवणार ! बोलतां बोलतां पटकन् उजाडेल. आणखी मग सगळाच बेत फसेल. सखू, मी नाहीं, माझ्या रूपानं तुला विठोबा मदत करायला आला आहे असं समज !

सखूबाईः– इतकं माझं भाग्य आहे का ! पण बाई, तुम्ही माझ्या ठिकाणीं बांधून घेणार म्हणतां तें मी कसं कबूल करूं ? आमच्या सासूबाई कशा आहेत त्या तुम्हांला ठाऊक नाहीं ?

गिरिजाबाईः– सगळं मला ठाऊक आहे. मला नाहीं वाटलं तूं इतके आढेवेढे घेशील असं. तसं जर वाटतं तर मी आलेंच नसतें. तुझी आई तुला काल दिसली, आणखी तुला तिनं पंढरपुरला बोलावलं ना ?

सखूबाईः– पण तुम्ही बांधून घेऊन तुमचं कसं होईल ! हीं माणसं तुमचा छळ करतील.

गिरिजाबाईः– करूं देत. मी आपखुशी सोसायला तयार आहें. मी हजार गळ्या करून तुला सोडवायला आलें, ती त्या छळांतच सुटायला

मला युक्ति करतां येणार नाहीं का काय? आतां जास्ती विचार करूं नको. माझी कर्तबगारी तर पहा. पंढरपुरावरली आणखी विठोबावरली तुझी भक्ति या सासूच्या छळानं पार उडाली का? उडाली असली तर तसं सांग, मी आपली जातें.

**सखूबाई:—** विठ्ठल! विठ्ठल! विठ्ठल! गिरिजाबाई, हें काय विचारतां! ज्याला मीं आपलं तनमनधन अर्पण केलं, ज्याच्या चरणावर मी आपले प्राणसुद्धां वाहायला तयार आहें, ज्याच्यासाठीं आज इतकीं वर्स एकसारखा छळ सोसला, त्या विठोबारायावरली माझी भक्ति उडाली का, असं मला विचारतां? पंढरपूर आज नाहीं उद्यां आपल्या दृष्टीस पडेल या आशेनं तर मी आज इतकीं वर्स आपल्या जिवाला इतका त्रास भोगला; पण अगदीं जायला निघाल्या वेळीं अशीं संकटं आलेलीं पाहून असं वाटलं कीं नाहीं देवाच्या मनांत आपल्याला दर्शन द्यावं असं.

**गिरिजाबाई:—** हेंच तें. देवाची करणी आणखी त्याचे हेतु हीं जर माणसांना समजतीं तर मग काय पाहिजे होतं!

### पद.

कळति जरी ईशकृती मानवास या।
तरि मग याहून काय पाहिजे तया ॥ ध्रु० ॥
मानुनि मम वचन करीं एकनिश्चया।
सिद्ध होइं पंढरीस शीघ्र जावया ॥
आला तव हरिच समज तुजसि न्यावया।
चिंता मम न करिं आतां सोड गे भया ॥ १ ॥

आतां एक निर्धार कर. मीं सगळी तुझी तजवीज केली आहे. तूं माझ्यावर भरंवसा ठेव आणखी नीघ. माझी काळजी तुला नको. अग, मला म्हातारीला सकाळीं पहातील, चार शिव्या देतील, उन् घालवून देतील. मग मी तुझ्या पाठोपाठ आहेंच पंढरपुरांत ठेवलेली! चल, चल. मी नाहीं, प्रत्यक्ष विठोबा तुला न्यायला आला आहे असं समज म्हणून तुला सांगितलं ना?

**सखूबाई:—** (हंसून) ठीक आहे तर मग. ही मी निघालें. गिरिजा-

बाई, खरंच का हो मी आज पाडव्याच्या दिवशीं पंढरपुरला जायला निघणार ? आणखी मी एकादशीला तिथें जाऊन पोंचेन का हो ?

**गिरिजाबाईः**—अग हो ! अगदीं जाशील. देवाच्या मनांत आलं तर तो आजच्या आज दिखील नाहीं का पोंचवणार ! मीं जो टाङ्या तुझ्यासाठीं आणला आहे तो तुला एकादशीच्या आंत पोंचवील नेऊन. तूं चल आतां.

**सखूबाईः**— अहाहा ! एकूण आज——

**अभंग.**

माझे जिवींची आवडी ।
पंढरपुरा नेईन गुढी ॥ १ ॥
पंढरपुरीं मन रंगलें ।
गोविंदाचे गुणीं वेधलें ॥ २ ॥
जागृति स्वप्न सुषप्ति नाठवे ।
पाहतां रूप आनंद सांठवे ॥ ३ ॥
बाप रखुमादेवीवरु सगुण निर्गुण ।
रूप विटेवरी दाविली खूण ॥ ४ ॥

[गिरिजाबाई सखूला घेऊन रस्त्यावर जाते.

---

## प्रवेश २ रा.

[**स्थळ**—कऱ्हाड—रस्ता.]

**गिरिजाबाईः**— गरुडा ( एकीकडे ) अरे पण मी हें काय करतें ? अशानं सगळंच भांडवल बाहेर पडेल.( सखूकडे वळून )हा वाटाड्या मोठा चांगला आहे. अगदीं श्रम पडायचे नाहींत अशा वाटेनें झटकन् पोंचवतो म्हणून याला आपली आमची मंडळी गरुड म्हणते. गरुडा, ही म्हणजे माझ्या गळ्यांतला ताईत आहे. हिला अगदीं संभाळून ने. एकादशीच्या दिवशीं तरी जाऊन पोंचाल अशी वाट काढ. मी हजार युक्त्या करीन आणखी उद्यां इथून निसटेन. पण सखू, एक विसरलें. मी तिकडे यांतलं कांहीं एक न कळवतां आलें आहें. तेव्हां मला तूं वाटेंत किंवा पंढरपुरास कुठेंही भेट-

लीस, तरी मी तुला सोडवायला आलें होतें, आणखी अशा प्रकारानें वाटाड्या देऊन सोडवली, वगैरे अगदीं ओळख देऊं नकोस हो! मीं तुला बरोबर घ्यायचं कबूल केलं अन् मग रस्त्यांत तसा प्रकार झाला त्यामुळें ते मला फार बोलले. तेव्हां त्या दिवसापासून आपण दोघी अगदीं अगदीं भेटलोंच नाहीं असं दाखवायचं बरं कां? कुठें तूं भेटलीस तर मीच अगदीं आश्चर्य दाखवून तुला विचारीन, कीं तूं पंढरपूरला आलीस कशी? तर तूं सांग 'आलें बिठोबाच्या कृपेनें.'

**सखूबाई:**— पण गिरिजाबाई तुम्हांला सकाळीं पहिल्यावर सासूबाईंनीं माझ्या पाठीमागें मला पकडायला माणसं पाठविलीं तर?

**गिरिजाबाई:**— सखू, तुझं मन मोठं भित्रं झालं आहे. पण ती भीति तुला आतां नको. हा आमचा गरुड तुला अशा वाटेनं नेईल कीं तुझा पाठलाग करणारांना कांहीं पत्ता लागायचा नाहीं.

**सखूबाई:**— मग बरं आहे. एकूण मी त्या पंढरीच्या परब्रह्माजवळ एकादशीला जाणार? अहाहा!

**गिरिजाबाई:**— ( तिच्या सर्वांगावरु हात फिरवून ) बाळ खुशाल जा. आपली खरी भक्ति असली म्हणजे तो पंढरीनाथ कधीं आपला त्याग करणार नाहीं. संकटं, छळ हीं काय आहेत? आपल्या निष्ठेच्या कसोट्या आहेत. जा, इकडली तुला काळजी नको. मी आपली पंढरपुरास तुझ्या मागोमाग ठेवलेली. मात्र मघांशीं सांगितलेलं ध्यानांत धर हो! मला भेटलीस तर आज रात्रीं काय झालंन् कसं झालं, त्याची मुळींसुद्धां ओळख मला देऊं नको. जा आतां. गरुडा, जा घेऊन हिला आणखी आडमार्गानं पण नेऊन पंढरपुरास घाल.

**गरुड:**— ठीक आहे. अगदीं सुखरूप नेऊन पोंचवतों. आडमार्गानं कशाला? चांगल्या धोपट मार्गानं जाईन. येऊं द्या कोण हिला धरून न्यावयाला येतो आहे तो. पंखाचे दोन तडाखे ( ओंठ चावून आपल्याशीं ) अस्सं माझं कांहीं तरी चुकतं. ( मोठ्यानें ) म्हटलं या काठीचे दोन तडाखे लगावून...... ..

**गिरिजाबाई:—** ( हंसून रागाचा आविर्भाव दाखवून ) पुरे, पुरे. सुखरूप पोंचव हिला, आणखी मग वढाया मार.

**सखूबाई:—** ( आपल्याशीच ) काय या गिरिजाबाईच्या हातांत आणखी वाणींत गुण आहे विठोबा जाणे, पण यांनीं माझ्या मस्तकावर हात ठेवला आणखी अंगावरून फिरवला तेव्हांपासून माझ्या वृत्तीला कांहीं विलक्षण उल्हास आला आहे. शीणभाग तर पार गेला. मी पंढरपूरला गेलें म्हणजे तो विठोबाराय—

अभंग.

उचलोनि सीस पुशील आदरें।
मुख पीतांबरें पुसील माझें ॥
धरोनि हनुवटी उठवील हस्तकीं।
ठेविल मस्तकीं अभय कर ॥

असं वाटत होतं. तो अनुभव मला इथेंच आल्यासारख वाटूं लागलं आहे. मग तिथें गेल्यावर काय होईल बरं ? ( गिरिजाबाईकडे मोठ्या कौतुकानें पाहते व तिला कडकडून भेटून अत्यंत सद्गदित कंठानें )

पद.

तूं माझी जननी काय गे साजणी।
विठ्ठले धांवोनि भेट देसी ॥
मी तुझें पाडस गुंतलें भवपाशीं।
माते धीर तुजशी कैसा धरवला ॥
तूं माझी गाउली मी तुझें ओरस।
पुढती पुढती वास पाहतसें ॥
नामा म्हणे विठ्ठले, आस पुरली माझी।
ओरसे वेळा पाजीं प्रेमपान्हा ॥

**गरुडः—** चला, चला बाई मग उशीर होतो. गिरिजाबाई तुम्हांला पुनः भेटतील. चला आतां चला.

**गिरिजाबाई:–** (आपल्याशीं हंसून) इथपर्यंत तर ठीक झालं. पण तोतया गिरिजाबाई, आतां हें म्हातारं रूप टाकून दुसरं लहानसं, तरुण अठरा वर्षांच्या वयाचं रूप घ्या. सखूबाई बना. नुसतं गिरिजाबाईचं रूप घेऊन सखूला इथून लावून दिल्यानं कसं निभणार? आपण तिला बांधून ठेवली पण ती पळून गेली, असं पाहिल्याबरोबर, आपल्यापुढची कोंवळी लुसलुशीत हरणी ओढून नेली म्हणून चिडलेल्या वाघिणीसारखी ती म्हाळसाबाई तिला परत आणण्यासाठीं आकाशपाताळ एक करील ना! त्याची काय तजवीज? त्याची तजवीज आपण योजली आहे तीच. आतां सखूबाई बनायच आणखी त्या रूपांत जें भोगावं लागेल तें सगळं भोगायचं! गिरिजाबाई बनलोंच आहों. आतां सखूचं रूप घ्यायला काय हरकत आहे? आमच्या आईसाहेबांनीं उखळाशीं दोऱ्यांनीं बांधून ठेवल्यामुळें आम्हांला बांधन राहण्याचं बाळकडूच आहे. तेव्हां बांधून घेण्यांत विशेष नाहीं. आपल्याला पाणी भरायची संवय आहे. तें नाथांच्या घरीं शिकलों. लुगडीं धुवायची संवय आहे. दळणकांडणाची संवय आहे. त्यांत जनाबाईनीं कुशल बनवलं. तेव्हां आतां सखूबाईच्या सोंगाची बतावणी करायला कांहीं अडचण उरली नाहीं. ठीक आहे! मग चला. ते दोरन् जेरबंद आपली वाटच पाहाताहेत. बरं पण, आतां मार खावा लागणार तो? अं: ? लाथा खायचं हें कांहीं आपल्याला नवीन नाहीं. आपल्या छातीवर त्या लाथांचं भूषण बांधलं आहे. पण आजपर्यंत कधीं कोणीं गालगुच्चे घेतले नाहींत, तेव्हां गालांचीच काय स्थिति होईल ती खरी ? चला आतां नाहीं तर सगळंच तिरपगडं होऊन बसायचं. आपलं रूप बदलून घरांतल्या खांबाशीं जाऊन बांधून घेऊन बसावं त चांगलं. आतां आठपंधरा दिवस इथेंच आपली अशा रूपानें वस्ती. त्यांत काय मोठंसं ? [जातात

## प्रवेश ३ रा.

—:०:—

[ **स्थळ**— कऱ्हाड गांवाबाहेरील एक रस्ता. श्रीपतराव, महिपतराव व दिगंबरपंत येतात. ]

**दिगंबरपंतः**— श्रीपतराव, ए महिपतराव, मघांपासून तुम्हांला एक विचारावंसं वाटतं आहे. विचारूं का ?

**श्रीपतरावः**— हो. हो. विचारूं का म्हणून परवानगी कशाला पाहिजे?

**दिगंबरपंतः**— परवानगीचा प्रश्न नाहीं; पण मघांशीं आपण त्या आंबराईंत मंडळींत खेळत होतों तेव्हां तुम्ही माझ्याकडे पाहून एकमेकांना कसल्या रे खुणा करीत होतां ? माझी कांहीं चेष्टा करायची होती वाटतं ? बराच वेळ तुम्ही आपसांत कुजबुजत होतां.

**महिपतरावः**— छे ! छे ! छे ! छे ! दिगंबरपंत, चेष्टाबिष्टा कांहीं नाहीं हो. पण आज कित्येक दिवस कांहीं एका बाबतींत तुझ्याशीं मन मोकळं करून बोलावं असं आपलं आमच्या दोघांत घाटत होतं, आणखी आपण आज आंबराईंत जमलों कीं तुला बोलायचं असा आमचा निश्चय ठरला होता. त्याची आठवण मला श्रीपतीनं दिली. पण तिथें मंडळींत नको, कोण कसा असतो, कोण कसा असतो, म्हणून तुला आपलं एकीकडे नेऊं आणखी बोलूं, असं मी श्रीपतीला सांगून आतां तुला आम्हीं दोघांनीं मुद्दाम या आडरस्त्याला आणलं आहे.

**श्रीपतरावः**— आड रस्त्याला आणलं आहे ते चोपायठोकायला नव्हे हो ! आपलं मित्राचं कर्तव्य असं आम्हांला वाटतं म्हणून एकदां बोलणार आहों. तूं रागावूं मात्र नकोस.

**दिगंबरपंतः**— महिपतराव, श्रीपतराव, माझा स्वभाव तुम्हांला ठाऊक नाहीं का ? मी आपला भित्रा माणूस आहें. तुम्हांला काय बोलायचं असेल तें बेलाशक बोला. मीं तर्क केला आहे तुम्ही काय बोलणार असाल त्याचा—

**श्रीपतरावः**— सांग बरं पाहूं तुझा तर्क.

**दिगंबरपंतः**— मी नाहीं सांगणार. तुमचं होऊं द्या आधीं बोलणं मग सांगेन माझा तर्क खरा होता कीं खोटा तें.

**श्रीपतरावः**— बरं तर. पण तुला आमचं बोलणं रुचलं नाहीं तर रागावूं नको म्हणजे झालं. दिगंबरपंत, तुझी बायको खरी साध्वी आहे. तिचा तुम्ही छळ कां करतां! आजपर्यंत तुम्हीं नानाप्रकारांनीं तिला छळ-ल्याचं ऐकलं, पण बोललों नाहीं. कां ? तर खाजगी गोष्टींत बोलून उगीच आपल्या स्नेहांत वाईटपणा यायचा! माझी बायको तर 'तुम्ही एकदां दिगंबरपंतांजवळ बोला,' 'दिगंबरपंतांजवळ बोला' असं मला रोज म्हणते.

**महिपतरावः**— माझीही पण मला याबद्दल आग्रह करीत असते. आमच्या बायका तुझ्या बायकोला प्रत्यक्ष कोणा तरी देवीचा, नाहीं तर मागल्या पतिव्रतेचा अवतार आहे असं समजतात. आणखी कालपासून तुम्हीं तिला तळघरांत कोंडून ठेवलं आहे म्हणे. हें काय हें ? काय तिचा अपराध ?

**दिगंबरपंतः**— तिचा अपराध सगळया गांवभर झाला आहे, आणखी तुम्हांला कळला नाहीं ?

**श्रीपतरावः**— सगळा कळला आहे. तिच्या बापाचे स्नेही म्हातारे वारकरी आणखी त्यांची बायको भेटली आणखी त्यांच्याबरोबर ती पंढर-पूरला जायला निघाली हाच अपराध ?

**दिगंबरपंतः**— मग हा लहानच का अपराध ?

**महिपतरावः**— दिगंबरपंत, ती कां जायला निघाली याचा विचार कर. ती तुझ्या खोलींत पहांटे आली, हा तिचा केवढा अपराध! आणखी त्याबद्दल तुझ्या आईनं तिला घराच्या बाहेर घालवून घराचं दार लावून घेतलं, तर तिनं काय करावं ? अशा स्थितींत ती जर पंढरीला जायला निघाली तर तो तिचा अपराध झाला बरं ? तिची विठोबावर भक्ति, तेव्हां आपल्यावर आलेल्या संकटांत तिनं जर विठोबाच्या चरणांशीं जायला

निघूं नये, तर काय तुमच्या नांवावर गांवांतल्या गांवांत भिक्षा मागावी ? दिगंबरपंत, थोडा स्पष्टपणानं बोलतों याबद्दल क्षमा कर, पण तूं आपल्या मनांत विचार कर. त्यांतून तूं फार विचारी आहेस, शहाणा आहेस म्हणून तुला बोलायचं. त्या तुझ्या चुलत चुलत बहिणीच्या नवऱ्यासारखा मरळया शोधीत गांवभर हिंडणार असतास, तर तुझ्याजवळ एक अक्षरसुद्धां बोललों नसतों; पण तूं आमचा लहानपणापासून स्नेही आणखी विचारी माणूस म्हणून बोलतों.

**दिगंबरपंतः**— मी खरं सांगूं का महिपतराव ? तुम्ही म्हणतां हें माझ्या मनांत येत नाहीं असं नाहीं. पण आईच्या पुढें कांहीं आपलं चालत नाहीं. ती सांगते तें अगदीं गैर आहे, अन्यायाचं आहे असं मला वाटतं, दिसतं, पण तिनं 'अमुक कर' म्हटलं कीं 'हें अगदीं गैर आहे, मी नाहीं करीत' असं म्हणायची कांहीं छाती होत नाहीं. 'मार' म्हटलं कीं मनांत नसतांना मारावं लागतं. पाठीमागून वाईट वाटतं. एखाद् वेळ आईच्या उलट बोलावंसं वाटतं, पण तिनं एकदां कां डोळे वटारले, कीं मग कांहीं चालत नाहीं. तोंडांतून ब्र काढण्याची सोय नाहीं. आमचे वडील तर या भयानं आपला बहुतेक काळ तिकडे शेतावर काढतात. कंटाळले आहेत ते या घरांतल्या कचकचीला.

**श्रीपतरावः**— बरं ! मग आतां याला पुढें उपाय ? का असंच चालवणार ? अन् तिला कोंडून बांधून ठेवून उपासमारीनं मारणार ?

**दिगंबरपंतः**— कसं करावं ! कालपासून पन्नास वेळां माझ्या मनांत आलं कीं एकदां तिथें घरांत जावं अन् तिला सोडवावी, आणखी उपदेश करावा कीं आईच्या म्हणण्याप्रमाणें कां वागेनास ?

**महिपतरावः**— पण हें मनांतलं अमलांत केव्हां येणार ? तिचं बरं वाईट झाल्यावर ? तें कांहीं नाहीं. आज आतां घरीं जाऊन तिला मोकळी तर कर. दिगंबरपंत, तूं तिला एक मायेचा शब्द बोल, तिच्या वृत्तींत एकदम फरक पडतो कीं नाहीं पहा. वेड्या, बायका इतर सर्व गोष्टींपेक्षां प्रेमाच्या फार भुकेल्या असतात. तें त्यांना जिथें मिळेल तिथें त्या दासी–बटकी

बनतात; त्यांची प्रेमाची आकांक्षा इतकी अनावर असते, कीं पुष्कळ वेळां त्यांना खरं प्रेम कोणतं, आणखी खोटं कोणतं, याची निवडसुद्धां करतां येत नाहीं. आणखी लबाड लोकांच्या ढोंगी प्रेमपाशांत सांपडून फसतात. मला ठाऊक आहे, कीं तुझ्या मनांत तुझ्या बायकोबद्दल प्रेम आहे, पण तें बाहेर दाखविण्याची तुला छाती नाहीं. काय हें ? आपल्या पत्नीवर प्रेम करणं, तिच्याशीं गोड बोलणं हें काय पाप करणं आहे तर त्याच्याबद्दल लाज वाटावी ? एकदोन वेळां आपलं आपल्या बायकोवर खरं प्रेम आहे, आणखी आपण कांहीं आतां तिचा छळ करायला किंवा कोणाला तिचा छळ करूं द्यायला तयार नाहीं, असं दाखव, म्हणजे हीच तुझी आई तिच्यावर प्रेम करूं लागेल कीं नाहीं पहा. निदान छळ तरी खचित करणार नाहीं.

**श्रीपतराव:**— माहिपतराव म्हणतो, तें अगदीं अक्षरशः खर आहे. त्यांतून तुझी बायको तर खरोखरच फार प्रेमळ असली पाहिजे. विठोबाच्या मूर्तीवर जिचं इतकं प्रेम, ती काय आपल्या नवऱ्याबद्दल विरक्त असेल ? तुम्हीं तिला अधिक अधिक विरक्त केलीत. तुझ्या खोलींत ती आली, आणखी त्याबद्दल तिला घरांतून घालवली, हें आहे काय ?

**दिगंबरपंत:**— हें झालं खरं बोआ असं.

**श्रीपतराव:**— मग आतां पुढें तरी आमच्या सांगण्याप्रमाणें करणार का ? आई घरांत असतांना तुला धैर्य नसलं होत तर मी तुझ्या आईला आपल्या घरीं बोलावून गुंतवून ठेवतों.

**दिगंबरपंत:**—ठीक आहे. तिला न्या बोलावून तुमच्या घरीं म्हणजे मी हिला बांधलेली सोडून देतों. अन् मग आई परत आल्यावर काय वाटेल तें म्हणाली तरी तिचं मी ऐकणार नाहीं. आतां तुम्हांला फार काय सांगूं ?

पद.

छलविगत तिज खचित करीन मी ।

[illegible]

मम जननी जरि छळिल मजसि तरि
न मानिं मीं तया मुळिंच ॥ १ ॥

**महिपतराव:**– मग ठीक आहे. तें माझं काम. मी आतां घरीं जातों, आणि आईला सांगून तुझ्या आईला आमच्या घरीं बोलावून आणून त्या दोघीही श्रीपतरावाच्या आईकडे जाऊन पुष्कळ वेळ बसतील अशी तजवीज करतों. मग पहातों काय काय चमत्कार तूं करतोस तो, आणखी पुढें काय धीटपणा दाखवतोस तो! चला तर जाऊं जातां. सूर्यास्त होत आला. तेव्हां ही संधि आईनं बाहेर जायलाही बरी आहे.

**श्रीपतराव:**–– }
**महिपतराव** } :–– चला, चला.

[ तिघेही जातात.

---

## प्रवेश ४ था.

[*स्थळ:*––गदाधरपंताचें घर. म्हाळसा व भीमा एकमेकींशीं बोलत आहेत.]

**म्हाळसाबाई:**––पण मी म्हणतें भिमे लोकांना हें तरी बोलायचं काय कारण न् तें तरी बोलायचं काय कारण?

**भीमा:**––हें काय ग काकू? लोकं अगदीं वेडीं का आहेत? अग त्यांना आतां खरं काय तें कळून आलं. आतां गांवांत कोणी तुला नांव ठेवीत नाहींत हो! जें तें तुला चांगलं म्हणतं आहे! जें तें म्हणत आहे इतके दिवस आम्हांला या पोरीचा अगोचरपणा माहीत नव्हता. आतां चांगला समजला. अशा सुनेला छळूं नये तर काय करावं? आज दोन दिवस घाटावर ज्याच्या त्याच्या तोंडीं हेंच.

**म्हाळसाबाई:**––(अगदीं संतुष्ट मुद्रा करून) बरं बाई शेवटीं तरी पण माझा माथा उजळ झाला. पण भिमे, तुझं कसं काय आहे? आमचं हें असं आणखी तुझं तें तसं. नवरा कधीं घरीं येतो तरी का?

**भीमाः**— माझं काय काकू तुला सांगूं ! परवांपासून तर आतां मारहाणीला सुरुवात होते का काय असं वाटूं लागलं आहे. म्हणून सासूबाई मला चार दिवस तुझ्याकडे नाहीं तर दुसऱ्या कुठें रहायला पाठविणार आहेत.

**म्हाळसाबाईः**— हं ? मारहाणीपर्यंत आली का मजल ? यायचीच ती. ये बापडी इथें आलीस तर. इथें येऊन कांहीं तो धिंगाणा घालणार नाहीं. त्याला ठाऊक आहे मी कशी आहें ती. एकदां कुठें तरी गांठून मी त्याला सडकून शिव्या देणार आहें.

**भीमाः**— नको. नको. नको. काकू, एवढं मात्र करूं नकोस. तसं केलंस तर उद्यांचं मरण आजच यायचं. परवां नुसतं कानीं गेलं वाटतं कीं, मी देवरुषी पाहून त्या चांडाळणीला चेटुक करतें आहें. तर तेवढ्यावरून केवढं तरी तारांगण झालं. सासूबाईंना शिव्या, मला शिव्या, आणखी मला ...( रडूं लागते. )

**म्हाळसाबाईः**— उगी बाळ, उगी. तूं आपली इथें येऊन रहा कशी चार दिवस.

**भीमाः**— पण काकू, काय चमत्कार आहे पहा बरं. मी चांगली आहें, चांगली वागतें, तरी तिकडे हा असा नाद. आणखी दिगूतात्याला ही अशी सखू मिळाली आहे पण त्याचं आपलं......

**म्हाळसाबाईः**— त्याचं आपलं काय ?

**भीमाः**— त्याचं आपलं मन तिच्याच ठिकाणीं आहे. दुसरीकडे जात नाहीं. परवां आपली तुझ्याजवळ बोललें नाहीं, पण पहांटे तू तिला दाराबाहेर घालवून दिलीस कीं नाहीं, तेव्हां मागील दारीं तो मग चुळबुळ चुळबुळ करीत होता. मग का त्याच्या मनांत मागल्या दारानं जाऊन तिला पुनः घरांत घेऊन यायचं होतं का काय कोणाला ठाऊक. तितक्यांत मी तिकडून आलें तर मला म्हणतो ' बाहेर दाराशीं कोणी आहे का ग ? ' मीं आपलं मुद्दामच वेड पांघरलं अन्......

**म्हाळसाबाईः**— काय ? असं विचारलंन ?

**भीमाः**— अग विचारलंन् इतकंच नाहीं पण, ' तिची समजूत करून कशी तरी तिला परत घरीं घेऊन ये ' म्हणून माझ्या पाठीस लागला

मग मी जेव्हां थोडी चेष्टा करूं लागलें, आणखी मोठ्यानं बोलूं लागलें तेव्हां तुझ्या भीतीनं पळाला.

म्हाळसाकाकूः— काय, म्हणतेस काय भिमे तूं?

भीमाः—सांगितलं तें अगदीं खरं आहे. आणखी माझी अशी समजूत आहे कीं, तो महिपति आणखी तो श्रीपति त्याला कांहीं तरी सांगत शिकवीत असावेत. त्यांच्या बरोबर तो फार असतो आतांशा. ते दोघे आहेत कीं नाहीं बाईलवेडे. दोघांनीं बायका डोक्यावर बसवून ठेवल्या आहेत. अन् त्या तर अशा झाल्या आहेत!

म्हाळसाकाकूः— अस्सं म्हणतेस? करतील बाई ते दोघे तसं कांहीं. पण मी एकदां त्यांच्या घरीं जाऊन, अश्शी खाल काढीन त्या आनंदीची! तिचा तो महिपति मोठा कुचाळ्या आहे.

[ इतक्यांत वारी घाइघाईनें येते. ]

वारीः—म्हाळसाकाकू, अहो म्हाळसाकाकू, तुम्हांला आनंदी आत्याबाईनीं आत्तांच्या आतां बोलावलं आहे. असाल तशा या, असं सांगितलं आहे.

म्हाळसाकाकूः— काय ग वारे, इतकं काय काम आहे?

वारीः—मला नाहीं बाई ठाऊक. दुसऱ्या कोणी बाई आल्या आहेत. आणखी त्यांचं त्यांचं बोलणें चाललं असतांना एकदम मला हांक मारून तुमच्याकडे पाठवली. आणखी म्हणाल्या कीं त्यांना घेऊन ये.

म्हाळसाबाईः— बरं झालं. कधीं तरी खाल काढीन म्हटलं ती आतांच काढीन म्हणजे झालं. चल भिमे जाऊं. दिग्या, ए दिग्या, त्या आनंदीनं कशाला घाईघाईनं बोलावलं आहे ती मी जाऊन येतें. अरे एकलंस का? ( दिगंबर घाईघाईनें येतो. ) मी थोडी बाहेर जाऊन येतें. नीट संभाळ. आणखी त्या खोलीकडे अगदीं जाऊं नको. गेलास तर माझ्याशीं गांठ आहे. पण किल्ली माझ्याजवळ आहे म्हणा. मीं आलें म्हणजे मग तुला जेवायला वाढीन.

[ दिगंबरपंत संतोषानं मान डोलवतो. त्या दोघी जातात. ]

---

## प्रवेश ५ वा.

[ स्थळः—सखूस कोंडून ठेवलेल्या खोलीच्या बाहेरील जागा. दिगंबरपंत येतो. ]

सखू:—( आपल्याशीं ) आमचा हा नवीन नाटकप्रयोग आमच्या पट्टराण्या रुक्मिणी आणखी सत्यभामा पाहात नसल्या म्हणजे बरें ! बाकी आपण द्वापारयुगांत नाटक केलं तेव्हां पुष्कळ तरुण यादवांनीं बायकांचीं सोंगं घेतलीं आणखी त्यांच्या बायका आपल्या नवऱ्यांना बायकांचे हावभाव आणखी बोलणीं हीं कशीं काय साधतात हें पाहात होत्या. त्यांतलाच हा एक प्रकार मी भक्तांसाठीं करतों आहें. जें सोंग घेतलें तें अगदीं शेवटपर्यंत झालं पाहिजे. तेव्हां इथपर्यंत तर ठीक झालं. पण पुढें ? पुढें काय ? मला वाटतं त्या भीमीनं सकाळीं, जी गुरुकिल्ली सांगितली ती जर आपण उचलली तर काय वाईट होणार आहे बोआ ! ठीक आहे. तिनं काय सांगितलं कीं हा भजनन् पूजनन् नामस्मरण यांचा आचरट नाद सोडून दे. खरंच तें, भक्त देवाचं नांव घेतात, त्याचं पूजन करितात, त्याचं भजन करतात; पण आम्हीं जर तें केलं तर केवढा दोष येईल ? काय आपण आपली पूजा करावी ? आपणच आपलं भजन करावं ? आपणच आपलं नाम जपीत बसावं ? ठीक आहे. तर मग या तोतया सखूनं आतां पंढरपूरच्या देवाचं नांव टाकलं पाहिजे. एक झालं. तेव्हां आतां एक मोठी अडचण तर पार पडली. पण हें आतां या मंडळीला समजण्याला काय करावं ! आपण मुकाट्यानं बसतां, नामस्मरण करीत नाहीं हें समजलं म्हणजे मग आमची सुटका व्हायची. बरं करूं प्रेरणा इकडे येण्याची कोणाला तरी. आणखी कोणी आलं कीं त्याला पहिल्यानं सांगायचं कीं आम्हीं देवाचं नांव सोडलें. अन् तवढ्यावर भरंवसा ठेऊन त्यांनीं आपल्याला मोकळं केलं कीं, ही जपमाळ आणखी हीं आमचीच मूर्ति ही फेंकून द्यायची. हां फेंकून दिली कीं त्यांना सखू शुद्धीवर आली असं खात्रीनं वाटेल. ठीक आहे तर तसंच करायचं. ( निरखून पाहून ) हूं, पण

सासूबाई आल्या वाटतं. नाहीं पतिराज आले! पतिराज! मला वाटलं सासूबाई आल्या वाटतं गालगुच्च्यांचा अनुभव द्यायला. ही स्वारी आतां काय करणार? लाथाबुक्या देणार असेल. पण नाहीं तशांतला कांहीं प्रकार दिसत नाहीं.

दिगंबरपंतः–( पुढें येऊन ) ठीक. महिपतरावानं काम तर छान केलं. आई गेली त्यांच्या घरीं. आणखी त्यांची आई तिला घेऊन कुठें तरी बाहेर गेल्या. आतां घटकाभर तरी कांहीं येत नाहीं. त्याच्या आंत आपला कारभार उरकला पाहिजे. ( सखूकडे पाहून अत्यंत आश्चर्यानें ) काय? ही माझी पत्नी? आणखी हिचा मी आजपर्यंत छळ करीत होतों?

पद.

**मम ललनाछल हा नयनां पाहवेना ।**
**असूनि नयन अंध मीं मंदमति छळिली ।**
**गाय विमल काय अजवरि वृथाहि कोमल सुंदर ।**
**सुमति कांता पतिव्रता सुजनि वदावी तथापि ।**
**मज तशी न दिसली कारी भ्रांति होय स्वमना ॥ १ ॥**

( दाराजवळ जाऊन ) अरे पण इथें कुलूप लागलं आहे. अन् किल्ली? अर्थात्च आईसाहेबांनीं बरोबर नेली असणार. बरं आहे. कांहीं वावगं नाहीं. आतां पक्काच झोंडपणा करायचा. कुलुपाला किल्ली नाहीं ना? आपला छानसा दगड त्याच्या कपाळांत घालून त्याचा मोक्ष करायला काय हरकत आहे? ( इतक्यांत बाहेर कोठें कांहीं वाजतें. तेव्हां दचकून ) अं? आली का काय? ती अतिशय संशयी आहे. ती यायची. मी घरांत एकटा आहें म्हणूनच तिला संशय यायचा. पाहूं आली का? (सभोंवार पाहून कोणी नाहीं अशी खात्री करून घेतल्यावर पुनः कुलपाकडे पाहून) आतां धोंडा आणलाच पाहिजे. ( जाऊन धोंडा व दिवा आणतो. ) या आतां धोंडाय कुलुपाय स्वाहा! ( असें म्हणून एकदम कुलपावर धोंडा घालून कुलूप फोडतो व दार सताड उघडतो. आंत डोकावून पहातो तों त्याच्या पुढें कांहीं विशेष प्रकारचें तेज दिसतें. आणि तो सखूकडे एकसारखी टक लावून आश्चर्यानें पहात राहतो. )

मी आजपर्यंत आंधळा होतों काय ! का कांहीं भयंकर तऱ्हेचं मद्य मला कोणीं पाजलं होतं ? आईच्या सांगण्यावरून मीं ज्या पत्नीला अनेकवार पशुसारखी माराहाण केली, सकाळीं भररस्त्यांत जिची वेणी धरून विटंबना केली, ती माझी पत्नी हीं ? मला वाटतं आजपर्यंत माझ्या डोळ्यांवर माझ्या नकळत माझ्या आईनं कांहीं तरी पडदा घालून ठेविला होता, तो आज एकाएकीं गळून पडला. आतां मला हिचं खरं स्वरूप दिसायला लागलं. काय चमत्कार आहे ! माझ्या स्नेह्यांना, त्रयस्थ लोकांना हिची खरी पारख व्हावी, आणि मला होऊं नये. मीं आतांपर्यंत चांडाळपणाच केला. आतां त्याबद्दल प्रायश्चित्त म्हणजे यापुढें तसलं कांहीं होऊं देऊं नये इतकंच. (आणखी थोडा सखूजवळ जाऊन तिला उद्देशून ) जें काय आजपर्यंत झालं याबद्दल क्षमा कर. अरे पण मी हें एवढं म्हणूनच काय उभा राहातों आहें ? हे दुष्ट दोरखंड याच दुष्ट हातांनीं बांधले ते आधीं सोडूं दे.

[ असें बोलून तो तिच्या देहाला जखडून बांधलेले दोर सोडूं लागतो. दिगंबरपंत इतका वेळ सर्व दोर सोडण्याच्या व कांहीं कापून काढण्याच्या उद्योगांत होता. 'बांधतांना फार जखडून बांधल्याकारणानें आतां लवकर सुटत नाहींत' म्हणून मधून मधून उद्गार काढी व आपला हा उद्योग करतांना सखूला त्रास होऊं नये म्हणून जपे. पुढें सर्व दोर सोडून झाल्यानंतर ते जोरानें दूर फेंकून सखूचा हात धरून तिला हळूच बाहेर आणतो. ]

दिगंबरपंतः— चल. पण मी तुला हें काय सांगतों ? दोन दिवसांचा उपास आणखी अशा तऱ्हेनं जखडून बांधून टाकलेलं. तेव्हां तुला चालण्याची शक्ति तरी कशी असणार ? कांहीं हरकत नाहीं. मी तुला उचलून खांद्यावर घेऊन ज्या खोलींतून आईनं तुला हांकून दिलं तिथें नेऊन निजवतों, आणखी प्रथम थोडं दूध देतों तें पी. मग काय बोलायचं तें बोल. आतांपर्यंत मी चांडाळपणा केला त्याच्याबद्दल क्षमा मागतों. तूं अगदीं स्वस्थ अस मीं तुला अगदीं अलगत उचलतों आणखी नेतों.

सखूबाईः—( लाजून ) हें काय हें, आपण करूलं उचलायचं मला ? आपल्या या मायच्या अंगांनि माझं सगळंच दुखणं आणखी [illegible]

हीं पार गेलीं. मी येतें चालत. पण बाई सासूबाई काय म्हणतील मला आपल्या खोलींत पाहिलं तर ! बाकी मीं आतां अगदीं निर्धार केला आहे कीं जें आपल्याला आणखी सासूबाईंना नको, तें करायचं नाहीं. देवाचं नांव घ्यायला नको ना ? नाहीं घ्यायची. माझ्या मूर्तीचा सासूबाईंना राग येतो ना ? ही पहा ती फेंकून देतें. ( विठोबाची मूर्ति काढून फेंकून देते. ) देवनू धर्म कशाला ? ज्याचं प्रेम आपल्याला पाहिजे तें मिळवायला. तें तर आज इतके दिवसांच्या तपश्चर्येनं मिळालं.

**दिगंबरपंत**:– अहाहाहाहा ! किती मधुर हें भाषण ! पण आतां बोलून तूं आपल्याला थकवूं नकोस. मी तुला चालूं देणार नाहीं. मी तुला उचलून नेणार.

[ सखूबाई नको नको म्हणते, परंतु दिगंबरपंत तिला अलद उचलून नेतो. ]

---

## प्रवेश ६ वा.

[ **स्थळ**– गदाधरपंतांच्या घराचें दार. भीमा व म्हाळसाबाई बोलत बोलत येतात. ]

**भीमा**:– काकू, खरं पुसशील तर, मला कांहीं बाई तूं इतक त्या आनंदी मामीला बोलशील असं वाटलं नव्हतं.

**म्हाळसाबाई**:– कां ? न बोलायला काय झालं ? मी अशी गरीब दिसतें म्हणून सगळ्याच ठिकाणीं तशी आहें असं नको हो समजूं ? मी म्हणजे सजलं तर सत नाहीं तर भूत आहें.

**भीमा**:– ( आपल्याशींच ) नाहीं कोण म्हणतं ? पण सूत कधीं पाहिलं नाहीं. भत मात्र रोज दिसतं आहे

म्हाळसाबाई:– अन् भिमे, माझ्या मनांत हें फार दिवस डांचतच होतं. ती आज आयतीच संधि आली जशी वाटत होती तशी ! आज तिची खाल काढली ! पण ती कशी ऐकून घेत होती ! जशी कांहीं तिला अगदीं ऐकायला येतच नव्हती. महामख्ख आहे ती !

भीमा:– खरंच बाई, अगदीं अक्षर बोलली नाहीं. आपली सगळं हंसण्यावारी न्यायला पहात होती. अन् जाण्याची गोष्ट तूं काढलीस, तर पुनः आग्रह करून बसवायची. जसं कांहीं तूं जें बोललीस त्याचं तिल कांहीं सुद्धां वाटलं नाहीं. उलटी म्हणते कशी ? ‘ म्हाळसाकाकू, तुम्ही बोलल्याचा मला कधीं राग यायचा नाहीं. अहो तुमच्यासारखीं स्पष्ट बोलणारीं माणसं आतां राहिलीं आहेत कुठें ? तुमचा अधिकारच तसा आहे. ’

म्हाळसाबाई:– अग ती मोठी मानभावी आहे.

भीमा:– खरंच काकू, तूं इतक्यांदां विचारलंस पण तिनं तुला इतक्या तांतडीनं कां बोलावलं याचं सरळ उत्तर दिलंन् का ? एकदां म्हणाली, शेतावर गुऱ्हाळ लागलं आहे, त्यांतला ताजा रस आला तो वाटला तुम्हांला द्यावा अन् बरेच दिवस झाले भेटलां नव्हतां तेव्हां चार घटका बोलत बसावं. दुसऱ्यांदां म्हणाली, तुमचं हें असं बोलणं मला ऐकावंसं वाटलं......पण काकू, आतां मी जातें. सासूबाईना तूं विचारून आणलीस खरी मला, पण जर कां घरीं यायचं झालं आणखी मी दिसलें नाहीं तर माझी कांहीं धडगत नाहीं.

म्हाळसाबाई:– म्हणजे ? मारतो बिरतो का काय आतांशा ?

भीमा:– हं. तें सुद्धां व्हायला लागलं आहे. तेव्हां मी आपली जातें.

म्हाळसाबाई:– नाहीं, नाहीं. मी नाहीं आतां आज जाऊं द्यायची. इथें येऊं दे त्याला तुला मारायला म्हणजे पहातें त्याचं काय आहे तें ! पण बाई आपण दारांतच काय उभ्या राहिलों बोलत. मला मेलं असं कांहीं झालं कीं भानच रहात नाहीं. दिग्या, अरे दिगंबर, दार उघड रे.

झोंप्या निजला आहेस का काय ? याला झोंप म्हणजे कशी येते पण, आतां किती हांका माराव्या लागतील कोणास ठाऊक. भिमे, दाराला धक्के देऊन कडी तरी वाजव.

**भीमा:**— ( कडी मोठ्यानें वाजवून दार जोरानें ढकलते तों तें सताड उघडतें. )

**म्हाळसाबाई:**— अग बाई ! अन् दार उघडंच ! छे, छे, छे, बाई ! शिकस्त झाली या पोरापुढें. मला वाटतं त्याला आपण जातांना हांका मारल्या तेव्हां तो कांहीं तरी नादांत होता, आणखी दार नुसतं ढकलून गेला. कडी लावायची विसरला. काय करावं आतां ? कोणी जर याचा काका आंत शिरून बसला असला, तर—चल बाई आधीं आतां त्याला हांका मारून निजला असला तर उठवून सगळं घर शोधूं दे. त्याचा कांहीं नेम नाहीं. सध्यां हे पंढरपूरच्या वारकऱ्यांचे जाण्याचे दिवस आहेत. शिरायचा एखादा घरांतन् मारायचा उपट्या. ते मोठे लबाड असतात. दार लाव तें. अगदीं कडी लाव.

[ भीमा कडी लावते आणि दोघी जातात.

---

## प्रवेश ७ वा.

[ स्थळ— दिगंबरपंताची खोली. सखू आंथरुणावर निजली आहे; तिच्या पाठीशीं दिगंबरपंत बसून तिचें अंग चेपतो आहे. ]

**दिगंबरपंत:**— अरेरे ! काय मीं दुष्टानं त्या खाष्ट आईच्या नादीं लागून तुझी दशा केली:—

**पद.**

अंधपणं अभिमानं ।
यानें ; अज्ञानें ; अधमानें ।

मृदु तनुवरतीं बंधनरेखा।
बघुनि तळमळे अंतर हें दुःखानें ॥ १ ॥
दुर्दिन तव ते सर्वहि सरले।
सतत यापुढें ठेविन मी सन्मानें ॥ २ ॥

काम्य हे दोरांचे करकोंचे ! पण प्रिये, आतां तुझे ते मागले नष्टचर्याचे दिवस गेले. आतां तुला या घरांत मारण्याचं तर लांबच राहिलं, पण कोण बोलेल तें मी पाहीन ! ( सखूचें अंग चेपूं लागतो. )

[ इतक्यांत म्हाळसाबाई पुढें व मागून भिमी अशा दोघी येतात. म्हाळसाबाई तो प्रकार पाहून दचकल्यासारखी होते व संतापानें लाल होऊन दांतओंठ खाऊं लागते. ]

**म्हाळसाबाई:**— काय ? मी हें पहातें आहें तरी काय ? ती आनंदी मला बोलावून नेऊन रसाचा आग्रह करीत होती, त्यांत कांहीं भांगबिंग तर नाहींना घातलीन् ? माझ्या डोळ्यांसमोर हें दिसतं आहे तरी काय ? हा दिग्याच का हा ? आणखी ही सटवी सखूच का ही ?

[ सासूला पाहून सखू उठण्यासाठीं खटपट करिते, परंतु तिला दिगंबरपंत कांहीं केल्या उठूं देत नाहीं.

**दिगंबरपंत:**— तूं अगदीं उठूं नकोस.—हलूं नकोस. तुझ्या अंगांत इकडचा हात तिकडे करायचं त्राण नाहींन् उठतेस कसली ? वडिलांचा मान राखायचा पण तो......

**म्हाळसाबाई:**— भिमे, हा दिग्याच का माझा ? सांग तरी बाई मी पहातें आहें हें काय आहे तें ! आणखी हा.........

**भिमा:**— काकू, हा दिगूतात्याच हो. आणखी हा आपल्या बायकोचे पाय चेपीत बसला आहे !

**दिगंबरपंत:**— ( सखूबाईला ) तूं अगदीं संकोच करूं नकोस. हें थोडं दूध घे म्हणजे थोडा तुला तकवा येईल.

**सखूबाई:**— हें काय असलं ? मला उठूं द्या. वडील माणसांच्या देखत.........

दिगंबरपंतः– तूं चांगली बरी झालीस म्हणजे मग वडील माणसांचा मान. सध्यां वडील माणसांबिणसं मी ओळखीत नाहीं.

म्हाळसाबाई:–अरे मेल्या दिग्या ! तूंच का हें बोलतो आहेस ! तूंच का म्हणतो आहेस वडील माणसांना मी ओळखीत नाहीं म्हणून ! आणखी ही सटवी सखूच का इथें माझ्या देखत निजली आहे ती ! ( संतापानें तिच्याजवळ जाऊन तिला ओढायला हात पुढें करते. तों तिचा हात दिगंबरपंत धरतो. )

दिगंबरपंतः–छे ! छे ! छे ! छे ! आई, तिला ओढूंबिढूं नको. दुरून तुला बोलायचं असलं तर बोल. पण आतां अंगाला हात लावायचा तो तिची पाठपोठ रगडायलाच लावलास तर लावायचा.

म्हाळसाबाई:–हो ! हो तर ! तिची चांगली पाठ रगडतें आणखी...

दिगंबरपंत:–आई, तूं मायेनें तिच्याजवळ बसून तिची पाठ रगडा-वीस अशीच तिची स्थिति झाली आहे. ( सखूकडे पाहून ) अग, तूं उठूं नको म्हणून सांगितलं ना ? वाडिलांचा मान. ... झाल्यानंतर. आतां नीज, नीज, अगदीं निजून रहा.

म्हाळसाबाई:–निजून रहा ! पहातें कशी निजून रहाते ती. एक लाथ मारतें आणखी...( असें म्हणत लाथ मारायला धांवते. दिगंबरपंत तिचा उगारलेला पाय धरून त्याच्यावर आपलें मस्तक ठेवितो. )

दिगंबरपंतः–आईसाहेब, आजपासून हे पाय नुसते आम्ही दोघांनीं पायां पडायला. लाथा खायला नाहींत. ते दिवस गेले !

म्हाळसाबाई:–अरे कारट्या, इतका तूं आज शिरजोर झालास ? मी तिला ओढायला गेलें तर माझा हात धरतोस, लाथ मारायला धांवलें तर पाय धरतोस ! तुला कांहींतरी हिनं चेटूक केलंन् चेटूक. कांहीं तरी चेटूक केल्याखेरीज नाहीं तुझ्यांत हा इतका फरक पडला. कारट्या, असा जो तूं इतका एकाएकीं बाईलवेडा झालास त्यापेक्षां मेला कां नाहींस...

सखूबाई:– ( अंथरुणावरून किंचित् उठून म्हाळसाबाईच्या पायांजवळ जाऊन ) नका–नका–नका. सासूबाई, असं अभद्र बोलूं नका. असे



दिगंबरपंतः— छे ! छे ! छे ! छे ! आई, तिला ओढूंबिढूं नकोस. दुरून तुला बोलायचं असलं तर बोल. [ पृष्ठ ७०.

[illegible]

[illegible]



म्हाळसाबाई:—काय ? माझं हिला लाथेनं झुगारून देण्याचं अवसान गेलं कुठं ?

[ पृष्ठ ७१

शिव्याशाप देऊं नका. मी थोडी बरी झालें म्हणजे आपल्या आज्ञे-बाहेर वागणार नाहीं. मी आतां त्या विठोबाचं नांव घेणार नाहीं. ती माझी मूर्ति, जिचा आपल्याला इतका राग, ती मीं फेंकून दिली. पुनः पंढरपूरचं नांव घेणार नाहीं. पण आपण आपला माझ्यावरचा राग सोडून द्या. मी आपल्या पायां पडतें. ( सखू तिच्या पायां पडण्यासाठीं तिच्या पायां-जवळ जाते. म्हाळसाबाई लाथेनें तिला झुगारून देण्याचा आविर्भाव करेते, इत-क्यांत सखू तिचे पायाला हात लावून मस्तक नमविते. )

**म्हाळसाबाईः**–( एकदम दचकून मागें सरते व आपल्याशींच ) काय ? माझं हिला लाथेनं झुगारून देण्याचं अवसान गेलं कुठें ? हिचा हात लागल्याबरोबर पायांतली शक्ति गेली कुठें ? हिचं मला प्रेम कां वाटायला लागलं ? कांहीं तरी चेटूक–खचित हिनं कांहीं तरी चेटूक केलं आहे ! हिचे हे डोळेच कांहीं निराळे दिसतात. पण आपली ही स्थिति यांना समजूं देतां उपयोगीं नाहीं. ( भिमीस ) भीमे, आतां बाई या घरांत राहण्याची आपली सोय नाहीं. हीं दोघं एक झालीं. आतां आपली वाट धरावी. चल आपली कशी. रात्र कुठें तरी काढीन आणखी सकाळीं आपली चालती होईन. तूं आपल्या सासरीं जा. तो पहा, तो पहा तिला कसा पुनः माझ्या डोळ्यांदेखत सांवरून निजवितो आहे.

**भीमाः**– म्हाळसाकाकू, मीं नाहीं का तुला मघांशीं सांगितलं, कीं दिगूतात्या अगदीं बाईलवेडा होत चालला आहे म्हणून !

**दिगंबरपंतः**–भिमाताई, थोडा भात करून आणून घालतेस काग हिला ? पोटांत अन्न नाहीं त्यानं हिला वारंवार ग्लानि येते आहे.

**भीमाः**–कोण, मी भात करून आणूं ?

**म्हाळसाबाईः**–तिचा अडला आहे खेटर भात करून आणायला.

**दिगंबरपंतः**–नाहीं तर मी स्वतः जाऊन करून आणीन.

**म्हाळसाबाईः**–कोण तूं करणार ? या बायकोला तूं भात करून घालणार ? मेल्या, बायल्या, आज तुला झालं आहे तरी काय ? देवा !

हें असलं पाहण्यापेक्षां, हा असला अपमान सहन करण्यापेक्षां आतां माझे डोळे मिटतील तर बरं होईल. भिमे, चल बाई, हा आतां मलाच तिची चटीक बनवणार. माझ्यानं नाहीं आतां इथें उभं राहवत, नी असलीं हीं थेरं पहावत ! ( संतापानें भिमीस घेऊन जाते. )

दिगंबरपंतः–प्रिये, तुला फार फार कष्ट झाले. पण हें एकदां केव्हां तरी व्हायचंच होतं. आतां आईबाप आपल्या वाटेस जाणार नाहींत. तूंही आतां निश्चय केल्याप्रमाणें जर वागलीस तर न जाणों तिचं मनसुद्धां बदलेल. ती कांहीं इतकी वाईट...नाहीं. पण त्याचं आतांच काय आहे. आतां हें थोडंसं दूध राह्यलं आहे तें घे. म्हणजे तुझा डोळा लागेल. ( तिला दूध पाजितो. )

सखूबाई:–( दूध घेऊन ) मी त्यांचं प्रेम आपल्याकडे वळवून घ्यायचा यत्न करीन. आपण सांगाल तशी वागेन. मग तर झालं ? पण आतां काय मी अशीच पडून राहूं आणखी आपण...

दिगंबरपंतः–तुला झोंप लागेपर्यंत मी असाच बसेन. तुला झोंप लागली कीं मग झोंपीं जाईन. तूं माझी आज्ञा आजपासून पाळणार ना ?

सखूबाई:–( हंसून ) हो.

दिगंबरपंतः–मग मुकाट्यानं झोंप घे कशा ? ( तिच्याकडे पहात ) अहाहाहा ! काय चमत्कार आहे ! जिला पाहिलं कीं मारण्याखेरीज मला दुसरा उद्योग नव्हता, त्याच मला आज हिची सेवा कशी करूं आणखी काय करूं असं झालं आहे ! हिचा डोळा लागला वाटतं. आतां आपण आईसाहेबांचं काय चाललं आहे तें पहायला जावं. मला कुठून इतकं धैर्य आलं बोआ ! कुठून कां येईना, पण आलं खरं; आतां कांहीं मी हिचा छळ या घरांत होऊं देणार नाहीं इतकं खास. तिला प्रेम पाहिजे होतं हीच गोष्ट खरी. तें मिळाल्याबरोबर किती तिच्या वृत्तींत फरक पडला.

दिंडी

प्रेमदानें तद्वृत्ति मुदित झाली ।<br>
जशी उदकें टवटवित दिसे वेली ॥

स्कंधिं घेतां ती देवताचि वाटे ।
पूज्य प्रेमा तिजविषयिं मनीं दाटे ॥ १ ॥

---

## प्रवेश ८ वा.

[ स्थळ—कऱ्हाड, गंगाधरपंतांच्या घरावरून जाणारा रस्ता.
श्रीपतराव आणि महिपतराव बोलत बोलत येतात. ]

**श्रीपतराव:**— आमच्या वहिनींनं सांगितलेली ही हकीकत जर खरी असेल तर फारच बहार झाली बुआ ! आतां दिगंबराची गांठ घेतली पाहिजे.

**महिपतराव:**—आणि त्याची गांठ घेऊन आपण दोघे मिळून त्याला शाबासकी दिली पाहिजे. एकूण दिगंबर कांहीं अगदींच नादान नाहीं.

**श्रीपतराव:**—अलबत्. अलबत्. त्याला शाबासकी द्यायला आपण गेलंच पाहिजे. अरे वाघिणीच्या तोंडांतून हरिणी ज्यानं सोडवली, त्याला शाबासकी द्यायची नाहीं तर द्यायची कोणाला ? बरं पण आमच्या वहिनींना ही अगदीं इत्थंभूत बातमी कळली कशी ?

**महिपतराव:**—अरे ती एक आहे ना भिमी. आमचं कुटुंब तिला गजघंटावन्सं म्हणतं, त्या वन्संनीं तिला सांगितली.

**श्रीपतराव:**—वा: ! अगदीं अस्सलांतूनच आली बातमी. पण ही त्या भिमीच्या तोंडून तुझ्या बायकोकडे आली. तुझ्या बायकोकडून तुझ्याकडे आली आणि तुझ्या तोंडून मीं ऐकली. अशी शिळी बातमी ऐकण्यापेक्षां आपण त्याच्याकडे जाऊन त्यालाच विचारूं या. चला.

**महिपतराव:**—चला जाऊं या. त्या म्हाळसाकाकची कशी काय स्थिति झाली आहे तीही पाहूं या !

**श्रीपतराव:**—खरोखर सखूवहिनीला सुखांत पाहिली तर आपल्याला मोठा आनंद होईल बुआ.

महिपतराव:- आणखी त्या म्हाळसाकाकूला तोंडांत मारल्यासारखी हिरमुसलेली पाहून मला दुप्पट आनंद होईल.

[ चालत चालत दिगंबरपंताच्या घराशीं येतात तों आंतून गदाधरपंत व म्हाळसाबाई भांडत येतात. ]

गदाधरपंत:–मला कुठली बुद्धि झाली, पाडव्यासाठीं इथें यायची आणखी दोन दिवस राहण्याची.

म्हाळसाबाई:–तुमच्या येण्यानं न् राहण्यानंच तर पोराला फूस मिळाली. तुम्हींच येऊन त्याला असा माझा अपमान करायला शिकवलं. तुमच्या शिकवणीखेरीज नाहीं असं माझा पोरगा करायचा ! आतां मी कशाला इथें राहतें आहें ? आतां तुमच्या–

गदाधरपंत:–काय शिंची ब्याद आहे हो ! आतां आपली माझ्यामागें लागली.

म्हाळसाबाई:–नुसती मागें लागली कां म्हणतां ? चांगली हात धुवून मागें लागली समजा. आतां मी घरांत रहायची नाहीं. कारट्यानं फार चांगली शोभा केलीन् माझी !

गदाधरपंत:–म्हणून तूं माझी करणार का काय !

श्रीपतराव:–(महिपतरावास) हें काय रे झोंबट हें ! पोरगा हातचा सुटलासा वाटतांच नवऱ्याच्या मागें लागली वाटतं !

महिपतराव:–दम धर रे. इथें उभें राहून ऐकूं तर खरं.

गदाधरपंत:–जा, जा; तूं, तुझी सून, तुझा मुलगा काय हवा तो गोंधळ घाला. माझ्यामागें तिथें आणखी कटकट नको.

म्हाळसाबाई– माझी कटकट ? माझी तुम्हांला कटकट झाली का ?

गदाधरपंत:--अग, एक कटकट नाहीं, सात कटकट. या कटकटीला कंटाळून तर मी हें घर सोडून रानांत राहिलों.

म्हाळसाबाई:–माझ्या कटकटीनं तुम्ही रानांत राहिलां ? माझ्या कटकटीनं ? असं असलं तर मी जाऊन जीव देतें, म्हणजे कोणालाच माझी कटकट नको. ( असें म्हणून चवताळून दुसरीकडे जाऊं लागते तों



गदाधरपंत- काय शिंची ब्याद आहे ही ! आतां आपली माझ्यामागें लागली !

[ पृष्ठ ७४.

तिचा धक्का महिपतरावास लागतो. ) कोण रे मेले हे सोळभोक उभे ! माहिपती, श्रीपती !

**महिपतराव व श्रीपतराव:**—कांहीं नाहीं आपले उगीच उभे होतों म्हाळसाकाकू. दिगंबर आहे का घरांत ?

**म्हाळसाबाई:**--कशाला रे मेल्यांनो तुम्हांला पाहिजे दिगंबर ? मेल्यांनो, माझ्या घराचं वाटोळं करून पुन्हां मौजा पाह्यला का आलां इथें ? तुमच्या—तुमच्या संगतीनं माझा कारटा बिघडला.

**श्रीपतराव:**— ( एकीकडे महिपतरावास ) महिपतराव, घ्या आनंद ! मघांशीं हवा होता ना दुप्पट आनंद ! !

**महिपतराव:**— म्हाळसाकाकू, हें काय हें ! रस्त्यांत का असं हें..

**गदाधरपंत:**— अस्सं ! अस्सं—शिकवा तिला दोन गोष्टी.

**म्हाळसाबाई:**— मेल्यांनो, मला का तुम्ही शहाणपणा शिकवतां ? कानापाठीमागून आलांन् तिखट झालां. तुम्हीं—तुम्हीं माझ्या कारट्याला बिघडवलात. माहिपती, आतां तूं मोठा झालास नाहीं तर तुझ्या कानफटांत दिली असती.

**श्रीपतराव:**— ( एकीकडे महिपतरावास ) हं ! घ्या हिरमुसलं तोंड पाहण्याचा दुप्पट आनंद ! (उघड) काकू तें कांहीं असो; आधीं आंत जा कशा.

**म्हाळसाबाई:**— नाहीं मी आतां जाणार आंत. या घरांत मी पाऊल घालायची नाहीं.

**गदाधरपंत:**— अन् मी आपल्याबरोबर येऊं द्यायचा नाहीं.

**महिपतराव:**— मग काकू, तुम्ही आपल्या माझ्या घरीं चला कशा !

**म्हाळसाबाई:**— ( त्याच्या अंगावर जाऊन ) केवढा मेला साळसूद ! म्हणे माझ्या घरीं चला. मला माझं घर नाहीं का काय ? मी आत्तां आंत जाऊन दार लावून टाकतें. रानांत जा नाहीं तर मसणांत.....
( आंत जाऊन धाडकन् दार लावते. )

**गदाधरपंत**:- गेली बाबा ब्याद एकदांची ! मी आपला सुखाचा तिकडे राहिलों आहें. अरे श्रीपती, मला त्या तुझ्या घरापलीकडे अड्डा आहे, तिथें पोंचव रे. मी हिच्या त्रासाला भिऊन आपली गाडी तिथेंच सोडून आलों. जातों तिथें आतां आणखी शेजारच्या त्या लक्ष्मीनारायणाच्या देवळांत निजतों. जरा उतरत्या रात्रीं निघलों कीं सकाळाला जाईन आपल्या शेतांत—

**महिपतराव**:- नाहीं तर गदुकाका, आमच्या घरीं का चला ना ?

**गदाधरपंत**- नको, नको. मला आपला तिकडे पोंचवा म्हणजे झालं. रात्रीचं जरा न्याहळत नाहीं. तिथें देवाच्या दारींच बरं.

**श्रीपतराव**:—
**महिपतराव**:— } बरं तर चला.

[ म्हाताऱ्याला मोठ्या आदरानें घेऊन जातात.

---

## प्रवेश ९ वा.

[ **स्थळ**—कृष्णेच्या काठचा एक बाग. चंद्रभागा, अनसूया आणखी वस्त्रभूषणांनीं अधिक शोभणारी अशी सखू फुलें वेंचीत वेंचीत येतात. ]

**अनसूया**:—सखू, तूं या वेषांत प्रत्यक्ष महालक्ष्मी दिसतेस.

पद

**इंद्राणी जणुं काय गमसि तूं गड आम्हांतें ।**
**रमाउमा-प्रतिमा आम्हां दिससी नयनांते ॥ ध्रु० ॥**
**नंदनवनदेवता येसि तूं का भूलोकातें ।**
**पाहुनि तव रूप हें होय विस्मय चित्तातें ॥ १ ॥**

**सखूबाई**:- मीं आतां कालपासून भिमावन्संचा गुरूपदेश घेतला आहे. त्यांनीं मला किति कदां सांगितलं कीं नटत मुरडत जा. मीं तसं करायचा निर्धार केला आणखी बोलाफुलास गांठ, आज तिकडून पेटींतून वाग-

दागिने काढून माझ्यापुढें आणून ठेवायचं झालं ! एक बुट्टीदार शालू आणून घडी मोडून माझ्या हातांत दिला. मीं एकदां दोनदां नको म्हणून पाहिलं. पण आग्रहच दिसला तेव्हां पटकन् आपला शालू नेसलें आणखी दागिने चढवले. आपल्या ठिकाणीं इतकं प्रेम एकदम करूं लागल्यावर मग आपल्याला इतकंसुद्धां का करवेना ? आतां माझी अशी खात्री आहे कीं मी सासूबाईचासुद्धां राग घालवीन.

अनसूया:– मग मुसळालाच पल्लव फुटतील म्हणायचे !

सखूबाई:– देवाच्या प्रभावानं ते सुद्धां कुठें कुठें फुटल्याचीं उदाहरणं आहेत ना ?

अनसूया:– सखू, हें तुझं ऐश्वर्य पाहून तुझ्या भिमावन्संच्या अंगाचा अगदीं तिळपापड उडायचा ! त्यांना अजून सगळ्या हकीकती कळल्या नाहींत वाटतं ?

सखूबाई:– परवां तेरवांपर्यंतच्या माहिती आहेतच. पण कालपासून मात्र या आमच्या घरीं आल्याच नाहींत बाई. हकीकती कळल्याच असतील. त्या तरी बातमी काढणाऱ्या अशा जबर आहेत ! ( दूर पाहिलेसं करून ) अग बाई ! अनसूये, तें कोण दूर दिसत आहे तें ?

अनसूया:–अग बाई सखू, तुझ्या मागोमागच स्वारी होती वाटतं !

सखूबाई:– अन् ती दुसरी स्वारी आहे तिकडच्या बरोबर, ती तुझ्या मागोमाग होती ना ? आणखी तिसरी दिसते आहे ती चंद्रभागेच्या मागें आली म्हणायची !

चंद्रभागा:— सखू, आतां मात्र तुझ्या नवऱ्याला तूं पक्कं वेड लावलेलं दिसतं आहे. आपण कुठें गेलों आहोंत याचा तपास परस्पर काढून स्वारींनीं सगळ्यांनाच इकडे आणलं.

सखूबाई:– मग त्यांत काय वाईट झालं !

अनसूया:– वाईट काय व्हायचं आहे ? पण एका दिवसांत इतका फरक पडलेला पाहून मनाला आपला फार विषाद वाटतो.

**चंद्रभागा**— विस्मय करण्यासारखी गोष्ट तर खरी. बरं पण आतां चल, उशीर नाहीं का झाला ?

**सखूबाई**:— चला.

[त्या तिघी बागेंत फिरतात तों समोरून भीमा येते आणि सखूस पाहतांच ' आपण पाहातों आहोंत हें आहे तरी काय ' असें मनांत येऊन अगदीं चकित होऊन स्तब्ध उभी राहते व सखूकडे अगदीं टक लावून पाहाते. ]

**सखूबाई**:— ( हंसून ) भिमावन्सं, अशा कां पाहतां माझ्याकडे ? मी चार दागिने अंगावर घालून झुळझुळीतसा शालू नेसलें आहें म्हणून का ? आपलाच गुरुमंत्र हा मीं घेतला हो. वेळोवेळीं नाहीं का आपण दिलांत ?

**भीमा**— अन् बाई म्हाळसाकाकूनं का हें सगळं काढून दिलं तुला घालायला ?

**सखूबाई**:— माझ्यापुढं येऊन पडलं, मीं आपलं घातलं. तुम्हीं सांगितलंत देवाचं नांव घेऊं नये, नाहीं घेत. माझी मूर्ति होती नेहमींची पूजेची तिचा तुम्हां सगळ्यांना भारी राग येत होता ती सुद्धां फेंकून दिली. आणखी आतां........

**भीमा**:— आतां काय ?

**सखूबाई**:— तुमचा गुरुमंत्र घेतला आहे त्याप्रमाणें वागायचा निश्चय केला आहे. दुसरं काय ! गुरूची शिकवणी एकपट तर शिष्याची करणी दसपट. तुम्ही गुरु, पण तुमच्यानं जें होत नाहीं तें मीं केलं आहे अन् आणखी करीन.

**भीमा**:— कां अनसूयाबाई, चंद्रभागाबाई, पाहिलंत का कसा आहे प्रभाव चवदाव्या रत्नाचा तो ! हीं जर मीं त्या वेळीं तुमचीं बोलणीं आडून ऐकून हिच्या सासूला जाऊन सांगितलीं नसतीं, तर आजला ही एखाद्या वारकऱ्याबरोबर पंढरपूरच्या वाटेवर तुकडे मागत भटकली असती ! पण आज [illegible] म्हाळसाकाकूनं

खरे दागिने काढून दिले हिला घालायला. हे माझे उपकार बरं, हे माझे उपकार ! नाहीं तर तुमची मैत्रीण पडली असती......पण आतां कशाला बोलूं. तें संकट टळलं सगळं झालं. इतक्या लवकर काकूनं हिला मोकळी सोडली हें मात्र आश्चर्य आहे !

**सखूबाई:**–हेंचसं काय–आणखी कितीक आश्चर्यं दिसतील तुम्हांला!

**भीमाः**– हं ! इतक्यांत इतका अभिमान आला का ?

**सखूबाई:**–पण भिमावन्सं, तुमचे उपकार मी जन्मभर विसरणार नाहीं. तुम्ही तसाच लोभ ठेवा म्हणजे झालं. कालच्या सगळ्या दिवसांत तुम्ही आलां नाहीं. उद्यां तरी याल काय ?

**भीमाः**– हो, न यायला काय झालं ? पण हा आपला आजचा थाट दिगूतात्याच्या नजरेस पडला का ?

**अनसूयाः**– हें काय विचारतेस भिमे ! त्यांनींच तर दागिने आपल्या हातानं पेटींतून काढून आणून दिले हिला घालायला ! आणखी त्यांनींच तर बाजारांतून हा अगदीं कोरा शालू आणून दिला.

**भीमाः**– ( मत्सरपूर्ण आवाजानें ) काय ?

**अनसूया**– अन् त्यांनींच तर आई घरीं नसतांना अंधाऱ्या खोलीचं कुलूप धोंडा घालून फोडून हिला सोडवून, आपल्या खांद्यावर घेऊन आपल्या खोलींत नेऊन आपल्या आंथरुणावर निजविली !

**भीमाः**– काय, खांद्यावर घेऊन नेली ? अग म्हणतेस तरी काय ? कांहीं तरी सांगते आहेस झालं.

**अनसूयाः**– अन् जे तुझे दिगूतात्या हिच्याकडून पाय चुरून घ्यायला संतापायचे, इतकंच नाहीं पण हिला वाऱ्याला सुद्धां उभी राहूं देत नसत, त्यांनींच हिचं आंग चेपलं, पाय रगडले, भात करून हिला जेवायला घातली !

**सखूबाई:**– अग अनसूये, त्यांना का ठाऊक नाहीं सांगते आहेस ती?

चंद्रभागाः– कां ? गुरूची शिकवणी एकपट तर शिष्याची करणी दसपट झाली का नाहीं ? भिमाबाई, आपल्याला कांहीं आपल्या यजमानांची.........

भीमाः– ( भीमा संतापानें लाल होते व कपाळास आंठ्या घालते. मग लागलीच मत्सरानें ) बाई बाई बाई बाई ! आतां शर्थ झाली. मग तर आतां मला म्हाळसाकाकूंकडे गेलंच पाहिजे. कालच्या सगळ्या दिवसांत मी कशी गेलें नाहीं ! ( झटकन् जाते. )

चंद्रभागाः– अनसूये, तूं तरी बरीच आहेस ! अगदीं असं एकंदर तिखटमीठ लावून तिला सांगितलंस कीं तिच्या अंगाचा खरोखर भडकाच उडला. बाकी सखू, तुझ्या कुर्तीत इतका फेर पडेल, आणखी दिगंबरपंतही इतके निवळतील, ही कल्पना आम्हांलासुद्धां नव्हती हो ! आतां हे तुमचे सुखाचे दिवस चिरकाल राहोत एवढंच आम्ही देवाजवळ मागतों.

सखूबाईः– ( आपल्याशींच. ) देवाजवळ म्हणजे आमच्याजवळ या काय मागणार, तर आम्ही आपल्या बायका रुक्मिणी, सत्यभामा यांना टाकून या दिगंबराची बायको चिरकाल व्हावं ! मैत्रिणींची खाशी इच्छा ! ( उघड ) मैत्रिणींनो, आतां जाऊं या. घरीं वाट पहातील. हा पाहिलांत का संध्याकाळ मनाला किती आनंद देतो आहे.

पद.

सविता जाई अस्ताचालिं हा ।
आक्रमुनियां गगनपथाला ।
संध्यादेवी प्रेम निरखित ॥ धु० ॥
रक्तांबरि ही संध्यासुंदरि ।
प्रफुल्लवदनें मंदस्मित करी ॥
उत्सुक होउनि मानासिं भारा ।
पतिसुख वांछिते ज्या कुलनारी ॥
करी अंतरीं तयांसि प्रमुदा ॥

[ सर्वजणी जातात.

## प्रवेश १० वा.

[ स्थळ— दिगंबरपंताची निजावयाची खोली. पलंगावर सुंदर बिछाना घातला आहे; समई तेवत आहे; चौरंगावर विड्याचें सामान,— तबक, अत्तरदाणी, गुलाबदाणी, वगैरे—आहे. पलीकडे एक मोठा थोरला सुंदर आरसा आहे. कांहीं सुंदर स्त्रियांच्या वगैरे तसबिरी आहेत. अगदीं आतुर झालेला दिगंबरपंत इकडून तिकडे येरझारा घालतो आहे. ]

**दिगंबरपंतः**–( आपल्याशीं ) अजून काय बरं ही घरांत करते आहे ? हा असा वेळ लागायला नको म्हणून मीं आज रात्रीं कांहीं जेवायचं नाहीं म्हणून सांगितलं. आणखी सुंदर आटीव दूध आणखी पेढेबर्फी इथें आणून ठेवली आहे. आइसाहेब तिच्या हातचं नाहींच खात. तेव्हां त्यांच्याकरितां कांहीं करायचंच नाहीं. पण आईच्या अंगावरून कसं यावं म्हणून बसली असेल घोंटाळून. आईनं आजपर्यंत इतकं छळलं पण तिची अवज्ञा करायची नाहीं म्हणते. तें सगळं ठीक, पण आम्हीं काय करावं ? आजपर्यंत जो सुखानुभव कधीं अनुभवला नाहीं, तो आज अनुभवायचा, म्हणून दुपारपासूनचा निश्चय. अहाहा ! त्या रमणबागेंत तिची मूर्ति तर मला किती किती रम्य दिसली !

पद.

प्रेमकुसुम- सुमनोहर कलिका ।
   काय जणूं फुलली ॥
कीं अवतरली रमणोद्यानीं ।
   रतिच दुजी ती मजला गमली ॥ १ ॥
ती स्मरलतिका दृष्टिस पडतां ।
   भ्रांति मना पडली ॥
वस्त्राभरणें तनू सजविली ।

कामुकसम तिज टकमक बघतां ।
चंचल मति झाली ॥
आलिंगावी सहसा वाटे ।
कीं चुंबावी कोमल गालीं ॥ ६ ॥

जसा कामुक मनुष्य सहज कोणी तरी अत्यंत सुंदर स्त्री पाहून निलाजऱ्यासारखा तिच्याकडेच पहात उभा राहतो तशीच माझी स्थिति झाली. ही माझीच बायको, हें मला खरं वाटेना. आणखी मग शेवटीं तर असं वाटलं कीं, आपल्याबरोबर लोक आहेत, तिच्याबरोबर तिच्या मैत्रिणी आहेत हें मनांत न आणतां जाऊन एकदम आलिंगन द्यावें ! पण विवेक केला कीं आहेच आतां........

[ असा विचार करीत करीत तो आरशाजवळ येतो, तों [illegible] ..न्या त्याच्या पत्नीचें प्रतिबिंब त्याला दिसतें. तें पाहण्यांतच तो गर्क होतो. ]

**सखूबाई:–** ( दिगंबरपंताचें प्रतिबिंब आरशांत पाहून आपल्याशीं. ) येथवर सगळं ठीक झालं. पण आतां हा प्रसंग मात्र कठिण. हा तर अत्यंत आतुर झाला आहे. आणखी......आणखी काय ? भक्तांकरितां जें सोंग घेतलं, त्याची संपादणी अगदीं पुरी केलीच पाहिजे. भक्तांना संकटांतून सोडवायला आजपर्यंत आपल्यावर आपण अनेक संकटं ओढून घेतलीं, त्यांतलंच हें. पण हें संकट फारच विलक्षण. तरी आतां नुसतं संकट संकट म्हणून कसं चालणार ? अस्सलपेक्षां नक्कल विशेष खुबीदार असते. स्त्रीनंच स्त्रीचं सोंग घेऊन होणाऱ्या हावभावापेक्षां, पुरुषानं स्त्रीचं सोंग घेतलं कीं हावभाव होतात ते विशेष आनंद देतात. तसंच आतां. आतां लाजबीज गुंडाळून ठेविली पाहिजे. ( दिगंबरपंताजवळ जाऊन मोठ्यानें त्यांस ) आपलंच रूप आपणच पाहण्यांत काय एवढं गढून जायचं बाई !

**दिगंबरपंत:–** ( सखूबाईकडे वळून ) आपलंच म्हणजे आपल्या सत्तेचं रूप; आणखी इतके दिवस या आंधळ्या डोळ्यांनीं तें पाहिलं नाहीं म्हणून खेद वाटून पाहात होतों. (तिच्या खांद्यावर हात ठेवून ) हें तसं ...

हे तुझे गुण, तूं इतके दिवस कां झांकून ठेविले होतेस ? आमच्या स्वाधीन करायच्या गोष्टी आम्हांला न देतां देवाला दिल्या होत्या; यामुळें आम्हांला दिसल्या नाहींत. आज बागेंत तर हें रूप पाहून मी अगदीं निर्लज्ज बनायच्या बेतांत होतों. सगळ्यांच्या देखत आलिंगन देणार होतों. ( तिच्या हनुवटीला हात लावून ) माझी हृदयदेवता तूं. त्या तुझी पूजा करण्याकरितां मीं आज मुद्दाम वसंतऋतूंतल्या पुष्पांचे गजरे आणले आहेत. एक एक तुझ्या हातांत घे आणखी ही वेणी तुझ्या वेणींत घालतों. आणखी नैवेद्यालाही कांहीं आणलं आहे तें तूं सेवन करून प्रसाद म्हणून मला दे. तूं माझी हृदयदेवता, आणखी मी तुझं दास्य करूं इच्छिणारा भक्त !

**सखूबाई:**— हें काय हें असं बोलावं ?—

पद.

किंकरी स्वपदकमलाची ।
आजि होय सेव्या कैसी ॥
पद्मिनि रविकरीं । कुमुदिनि विधुकरिं ।
कमलिनि भ्रमरीं । तंवि प्रियकरि ॥
शोभली निजकरीं । ना प्रिय दुसरी ।
होय सेव्या कैसी ॥ १ ॥

मी आपल्या चरणांची दासी, मीं आपली सेवा करायची, ती कालपासून आपणच माझी सेवा काय आरंभली आहे ? काल एक मीं आपलं ऐकलं, पण आतां आज नाहीं हो तसलं कांहीं ऐकायची ! आज मी आपल्या चरणांची सेवा करीन, आपले पाय चुरीन, आणखी आपल्याला झोंप लागली म्हणजे मग मी झोंप घेईन. आपण आतां पडायचं होतं !

**दिगंबरपंत:**— प्रिये, तुला खरं सांगूं का ? काल तुला त्या अंधाऱ्या खोलींत सोडवायला आलों आणखी तुला पाहिली त्या वेळेपासून मला कांहीं चमत्कारिक झालं आहे. तूं माझी सेवा करायची हा विचार कसासाच वाटतो. तूं माझी स्वामिनी, मी तुझा दास. तूं माझी देवता, मी तुझा भक्त.——

पद.

सरस वदनाविधुला वघोनी । खचित भुलें मी ॥
देवत मम तूं तव किंकर मी ।
तूं सुकमलिनि मधुकर असें मी हे मम स्वामिनि ॥ ध्रु० ॥
सौख्यपूर्ण तुज करोनि । पूज्य गणूनि ।
सदा चुरिन करांनीं । या चरणां ।
तव मधुर मधुरशा वचनांनीं श्रवण सुखवुंदे ॥ १ ॥

तूं आणखी मीं एकजीव व्हावं, तुला दुःखाचं वारंसुद्धां लागूं नये, तुला चौरंगावर बसवून ठेवून कानांनीं तुझे मधुर शब्द ऐकत रहावं, नेत्रांनीं तुझं सुंदर रूप पहात बसावं असं आपलं वाटतं. तेव्हां तूं मला माझ्या इच्छेप्रमाणें करूं दे. तूं अशी मंचकावर बस. ( तिला धरून मंचकावर नेऊन बसवितो, ती लाजेनं ' हें काय, ' ' हें काय ' असें करते. ) अश्शी ! माझ्या देवतेची प्रतिष्ठापना तर झाली. आतां हे गजरे हातांत देतों, ही वेणी वेणीवर घालतों. हें दूध आणलं आहे, आणखी हे पेढे मुद्दाम स्वतः जाऊन बसून तयार करून आणले आहेत, हा नैवेद्य. ( तिची हनुवटी धरून वर करून ) हा देवतेनं सगळाच नाहीं हो घ्यायचा. फक्त उष्टावयाचा आणखी भक्ताला प्रसाद म्हणून द्यायचा. हं घ्या.

**सखूबाई**:– ( फार मनोहर असें लाजून ) हें काय हें ! माझी थट्टा का चालवली आहे आपण ? असं असेल तर मी इथें बसायचीच नाहीं. ( उठून दूर जाऊन उभी राहते )

**दिगंबरपंत**:– हं ! समजलों, तूं कां तिथें बसायची नांहीं म्हणतेस ती. तुझ्यासारख्या हृदयदेवतेचा चौरंग तो नव्हे, पतीचा अंक होय. खरं तें. मग आपण आपल्या जागीं येऊन बसावं. मी कुठें नाहीं म्हणतों आहें!

**सखूबाई**:– ( आपल्याशीं ) अर्जुनासाठीं सुभद्रा होऊन जें नाटक करायची एकदां पाळी आली होती त्याचाच भक्तलोकाग्रहास्तव हा दुसरा प्रयोग करण्याची पाळी आली आहे. पण हा शेवटचाच होवो म्हणजे झालं. ( मोठ्यानें ) माझी कुठें ना आहे ! पण देवतेला भक्तांनीं नेऊन

**दिगंबरपंतः**— वा ! ठीक आहे. भक्तजन तयारच आहेत. ( तिला पुनः नेऊन बसवून आणि पेढ्याचा एक तुकडा तिच्या तोंडाजवळ नेऊन ) हा भक्त नुसता दुरून नैवेद्य नाहीं दाखवायचा. तोंडांत घालील.

**सखूबाई:**— आणखी ही देवता जागृत आहे, तेव्हां तो खाईल. प्रसाद म्हणून भक्तालाही पण देईल. ( तुकडा घेऊन त्याच्या तोंडांत घालते. )

**दिगंबरपंतः**— आणखी हा दुधाचा नैवेद्य ! त्याचंही नैवेद्यसमर्पण आणखी प्रसादग्रहण तसंच झालं पाहिजे ! ( दुधाची वाटी तिच्या तोंडाशीं नेतो, ती अर्धी पिऊन त्याला अर्धी देते. तो पितो. )

**सखूबाईः**— बरं पण, आतां तांबूलाचं काम बरीक माझं बरं कां. तो मी तयार करीन आणखी आपल्याला देईन. तेवढ्या बाबतींत आतां अगदीं ऐकायची नाहीं. मी आतां तयार करतें. ( उठून पानदाना-जवळ जाते. )

**दिगंबरपंतः**— ( तिच्याकडे पहात ) हें काय गौडबंगाल आहे म्हा.—

पद

**देविच भासे खास मनाला ।**
**खास मनाला । खास मनाला ।**
**स्पर्शतांच ये पुलक तनूला ॥ ध्रु० ॥**
**पूर्विंच ऐसी कां न दिसावी ।**
**अप्रिय ती आजि प्रिय कां व्हावी ।**
**भ्रांति पडे ही साच मनाला ॥ १ ॥**

हिच्यासंबंधानं मला देवतेसारखी पूज्य बुद्धि वाटते. हिला आतां अंकावर घेतली, तेव्हां सगळं शरीर कसं रोमांचित झालं, पण त्यांत दुसऱ्यातिसऱ्या विचारांचा गंधसुद्धां नाहीं. हिनं दिलेला पेढ्याचा तुकडा मला अमृतखंड वाटला. दूध अमृतरस वाटलं. हें सगळं याच्यापूर्वी कुठं होतं ? आतां प्रेमाचे, भक्तीचे नुसते कल्लोळ उठताहेत, आणखी तेव्हां कां तसा खडखडाट ! काय, त्या वेळीं माझ्या दृष्टीचाच दोष होता ! असो. चला, आपल्या नशिबीं तें सुख आजपर्यंत नव्हतें. आजपासून मिळायचा नेमानेम

होता, असं समजायचं; दुसरं काय ? पण आतां तरी पूर्णपणानं घ्यावं. असं आणखी तसं कां याचा विचार करीत वेळ घालवूं नये. नाहीं तर उजाडून जायचं. ( सखूकडे अगदीं तादात्म्यानें पहात रहातो, इतक्यांत सखू विडा करून त्याच्या जवळ येते. )

सखूबाई:— हा घ्यायचा—

पद

तांबुल हा घ्यावा । प्रियनाथा ।
भरिले गुण विविध यात ।
वदनीं रंग खुले नवा ॥ ध्रु० ॥
आजवरि ना मानियलें ।
मज आतां सुबोधिलें ॥
प्रेमदान अजि दिधलें ।
सुखकर या जीवा ॥

दोहा.

आजवरी दुर्दैवें । दिधलें दुःख अपार ।
नाथकृपें परि लाधलें । सकल सुखांचें सार ॥

दिगंबरपंतः— मीं घेईन म्हणून कबूल केलं, पण असा नाहीं घ्यायचा. त्याचा विधि आहे !

सखूबाई:— तो काय बाई विधि ! विडा घेण्याचा विधि काय असतो?

दिगंबरपंतः— पहिला विधि हा. ( तिला जवळ घेऊन आलिंगन देतो, ती त्याच्याकडे स्मित मुखानें पहाते. ) दुसरा विधि हा. [ तिच्या मुखांत विडा देतो. ] आणखी मग तिसरा विधि तिथून मीं असा असा घ्यायचा !

[ पडदा पडतो.

अंक दुसरा समाप्त.



सखूबाई:—हा घ्यायचा ! [ पृष्ठ ८६

# अंक ३ रा.

## प्रवेश १ ला.

—:०:—

[ स्थळ— पंढरपूर. चंद्रभागेच्या वाळवंटांत वसंतऋतूच्या निमित्त ठिकठिकाणीं भजनी लोकांचे आखाडे पडले आहेत; जिकडे तिकडे आनंदीआनंद चालला आहे; विठ्ठलनामाचा गजर होतो आहे; सखूबाई आनंदानें अगदीं देहभान विसरून गेली आहे. ]

सखूबाई:- ( पुढील अभंग आपल्याशींच म्हणत येते. )

अभंग

अवघी हे पंढरी सुखाची मांदूस ।
माझा स्वप्रकाशरत्न हरि ॥ १ ॥
धन्य संतजन तेथींचे पारखी ।
ज्यां झाली ओळखी विठ्ठलनामीं ॥ २ ॥
अनुभवुनी चित्तीं पाहिलें विवेकें ।
धरिलें पुंडलिकें हृदयकमळीं ॥ ३ ॥
त्रिभुवन खेळण प्रेमाचें कोंदण ।
करोनि भूषण भोगीतसे ॥ ४ ॥
युगें गेलीं परि पालटली नाहीं ।
नित्य शुद्ध पाहीं तेजःपुंज ॥ ५ ॥
पाहतां नित्य नवें ध्यातां चित्त निवें ।
म्हणे नामा जीवें विसंबेना ॥ ६ ॥

या पंढरपुरास येऊन तर मी सुखरूप पोंचलें. गिरिजाबाईनीं आपल्याला सांगितल्याप्रमाणें तो वाटाड्या फार हुशार—फार कामसू खरा. त्यानं मला

का काय असं क्षणोक्षणीं वाटत होतं; पण त्यानं असं सांगितलं कीं, एक तर ज्या वाटेनं मीं तुम्हांला आणलं ती वाट कोणाला माहीत नाहीं; आणखी दुसरं असं कीं, कोणी यदाकदाचित् आलंच तर मी त्याची मात्रा चालूं देणार नाहीं. पण जाऊं द्या कीं, आतां त्या गोष्टींचा विचार तरी कशाला ! आतां आपण ब्रह्मानंदांत पोहायला आलों. मग कालपर्यंत सराटे, गोखरू बोंचले याची आपण आठवण काढा कशाला ! धन्य ! धन्य ! पंढरपूर ! सगळ्या त्रिभुवनांतलं सुख इथें खरोखर एकवटलं आहे. जिकडे पहावं तिकडे टाळ, घोळ, मृदंग, वीणा यांचा घोष, आणखी विठ्ठल या नामाचा गजर ! अहाहा ! रात्रंदिवस विठोबाच्या चिंतनाखेरीज कोणाला कांहीं सुचत नाहीं !

पद.

**भासे वैकुंठपुरी पंढरी दुरोनी ।**
**त्रिभुवन आनंदविभव ऐक्यपूर्ण खाणी ॥ ध्रु० ॥**
**राहुनियां मन्मन हें धन्यतेस मानीं ।**
**मुरजताल वीणारव धुंद येइ कानीं ।**
**ठायिं ठायिं भजन करिति गुंग होति गानीं ॥ १ ॥**

आमच्या वाटाड्योआनीं आतां आम्हांला एकदां पांडुरंगाच्या पायांपाशीं नेऊन घालावं म्हणजे इतकं सगळं केल्याचं सार्थक होईल. पण त्यानं आपलं वेशीवरच कुठें मला सोडलं. कशी चुकामूक झाली कोणाला कळे. तें विठोबाचं सांवळं सुंदर रूप मला एकदां दिसावं म्हणजे माझं हें मस्तक त्याच्या पायांवर ठेवीन. गर्दी फार असते म्हणतात. तेव्हां आपल्याला अगदीं पायांपाशीं कोण पोंचवील ? कोण म्हणजे काय ? ज्यानं आपल्याला इथपर्यंत आणून घातलं तोच पोंचवील. दुसरा कोण पोंचवणार ! आपल्याला ज्या गोष्टी अशक्य वाटतात, त्या साधायला साहाय्य त्याचंच. तापत्रय घालावायला वैद्य तोच. तेव्हां त्याचाच धांवा केला पाहिजे. चंद्रभागेचं स्नान आतां करायचं आणखी दुसरं तिसरं कांहीं नाहीं, त्या वैकुंठनायकाचं दर्शन आधीं घ्यायचं. तें दर्शन होईपर्यंत दुसरा विचार नाहीं.

पद.

तुझे पायीं डोई असो माझि माते ।
विठाबाई देई मला या वरातें ॥ ध्रु० ॥
चरणसेवा तुझी गोड लागे मला ।
मुक्ति नलगे कदा तीं जिवानें ॥ १ ॥
पंढरीवांचुनी स्थल न मज आवडो ।
संतसंगति घडो नित्य मातें ॥ २ ॥
चंद्रभागाजलीं स्नान हो अनुदिनीं ।
पूर्ण करिं या परी वासनेतें ॥ ३ ॥

[ चंद्रभागेकडे जाऊं लागते, तों समोरून विश्वंभरबोआ, गिरिजाबाई वगैरे मंडळी येतात. हिची व त्यांची दृष्टादृष्ट होते. ]

**विश्वंभरबोआः**— अरे, ही पोरगी आली आपल्या पाठोपाठ !

**गिरिजाबाईः**— खरंच. पोरीचा निश्चय मोठा बळकट दिसतो आहे बरं का. नाहीं तर......

**विश्वंभरबोआः**— कसला निश्चयन् कसलं काय ! जरा हट्टीच दिसते आहे. इतकी सासूनंन् नवऱ्यानं फजीत केली तरीही जेव्हां आली. तेव्हां ती सासू छळ करीत असली, तर तिचा कांहीं मोठासा दोष नाहीं. आतां कांहीं हिचं अगदीं वय गेलं असं नाहीं, इतका हट्ट कशाला पाहिजे होता ?

**गिरिजाबाईः**— ( सखूजवळ जाऊन आनंदानें ) सखू, तूं शेवटीं निश्चयानं आलीस ना ? शाबास ! तुझी भक्ति खरी आहे. घरीं नेऊन तुझा फार छळ केला असेल ? कशी सुटलीस त्यांच्या तडाक्यांतून ?

**सखूबाईः**— कशी म्हणजे ? हें काय विचारतां ? ( जीभ चावून आपल्याशीं ) पण खरंच, यांना आपल्याला सोडवल्याची ओळख द्यायची नाहीं. मी आतां वेड्यासारखंच बोलणार होतें. ( उघड ) देवाच्या मनांत असलं म्हणजे सगळं कांहीं नीट जुळून येतं.

**गिरिजाबाई**— बरं पण तूं आलीस केव्हां ?

**सखूबाईः**— ही आतां येतेंच आहें.

**विश्वंभरबोआ:**– ( गिरिजाबाईस ) ए, त्या पोरीशीं बोलूं नको म्हणतों ना? चल, चल लवकर.

**गिरिजाबाई:**– तुला सोबत कोण मिळाली?

**सखूबाई:**– होता एक माहितगार वारकरी. त्यानं जवळच्या वाटेनं आणली मला– पण इथें आल्यावर तो कोणीकडे चुकला का काय झालं कोणास कळे. मी एकटीच पडलें आहें. बरं झालं, तुम्ही भेटलां. आतां तुम्ही मला तेवढं चंद्रभागेचं स्नान आणखी विठोबाचं दर्शन घडावा.

**विश्वंभरबोआ:**–( गिरिजाबाईस) ए, तुला पुन: बजावतों अं! तूं या पोरीच्या नादीं लागूं नकोस. तिला कांहीं कोणीं सुध्यां मतानं येऊं दिलं नसेल. तिच्या मागोमाग धरणं येत असेल. आणखी आपल्याबरोबर ती आहे असं पाहातांच ते हिला करून न्यायला आलेले शिपाई हिच्याबरोबर आपल्यालासुद्धां पकडून न्यायचे. ( सखूकडे वळून ) सखू, तूं इथवर एकटी आलीस तशीच आतां आपलं देवाच दर्शन कर, चंद्रभागेचं स्नान कर, काय वाटेल तें कर. पण आमच्याशीं तुझा संबंध नको. आम्ही आपलीं गरीब माणसं. आम्हांला तें सरकारदरबारचं लचांढ नको. ए, तूं अगदीं हिच्या नादीं लागूं नकोस. चलच मुळीं इथून; म्हणजे तुला हिला बरोबर घेण्याचा मोहच होणार नाहीं. ( चालते होतात. गिरिजाबाई नाइलाजानें त्यांच्या मागें परंतु सखूकडे पहात पाहत जाते. )

**सखूबाई**– काय दुर्दैवाचा जोर पहा.

पद.

**विपरित दैवगती। पहा कशी।**
**आश्रय मजला कोणी न देति।**
**येथें मी जरि। आलें तरि हे।**
**कष्ट मनास किती॥ १**

गिरिजाबाई चांगली, विश्वंभरबोआ चांगले, पण मला आपल्याबरोबर नुसतं देवदर्शनालासुद्धां नेत नाहींत. गिरिजाबाईच्या मनांत होतं आपल्याला बरोबर घ्यायचं; पण नवऱ्यापुढें त्यांचं काय चालणार? विश्वं-

भरवोआंच्याकडे तरी काय बोल ! त्यांना एकदां अद्दल घडली त्यामुळें भितात; पण आपण आतां काय करावं ? काय करावं म्हणजे काय ? हजारों लोक चालले आहेत, त्यांतच आपण जावं. चंद्रभागेवर स्नानाला जाऊन स्नान करून तर येऊं. [ जाते

---

## प्रवेश २ रा.

—:०:—

( स्थळः— विटोबाच्या देवळापुढील पटांगण. खूप लोकांची गर्दी आहे. इतक्यांत सखूबाईचा वाटाड्या व सखूबाई येतात. )

**सखूबाईः**— मी म्हटलं तुझं झालं तरी काय ? कुठें तुझा पत्ता नाहीं. मला इथली कांहीं माहिती नाहीं.

**गरुडः**— मी तिथेंच होतों हो ? आपल्या पारावर जरा टेंकलों होतों. फार थकलों. तुम्हांला बाई शीण भाग कांहीं नाहीं. आपलं पंढरपूर केव्हां येईल, पंढरपूर केव्हां येईल, हें एकसारखं चाललं होतं. बरं पंढरपूर आलं, तर आतां स्नानाचीन् दर्शनाची हुटहूट. जरा दमानं घ्या. ही बघा गर्दी कोण ! या गर्दीतून पुढें सरकत सरकत जायला दोन दोन तीन तीन दिवस लागतात. पण मी युक्तीनं नेऊन तुम्हांला आमच्या यजमानांच्या (जीभ चावून आपल्याशींच) अस्सं चुकून एखादे वेळ होतं ! पण हिला कांहीं समजत नाहीं एवढं बरं आहे त्यांत. ( मोठ्यानें ) आपल्याला विठोबारायाच्या चरणांपाशीं नेऊन बसवतों. अशा युक्तीयुक्तीनं या. मात्र तो आपला अभंग म्हणायचा सपाटा चालूं द्या, म्हणजे शीण वाटायचा नाहीं गर्दीतून जायचा, आणखी वेळ फार लागलासंयू वाटायचं नाहीं. ( सखू त्याच्या मागोमाग आपल्याशींच खालीं दिलेला अभंग म्हणत जाते. )

**अभंग.**

जाऊं म्हणतां पंढरी । यम थोर चिंता करी ॥ १ ॥
धरितां पंढरीची वाट । पापें पळालीं कपाट ॥ २ ॥

कळस देखतां नयनीं । होय पातकांची धुणी ॥ ३ ॥
करितां चंद्रभागे स्नान । सर्व पापां घडे हान ॥ ४ ॥
घेतां विठोबाची भेटी । दोष जाती उठाउठी ॥ ५ ॥
नामा म्हणे रे केशवा । आम्ही करूं तुझी सेवा ॥ ६ ॥

---

## प्रवेश ३ रा.

[ *स्थळ*—पंढरपूर. विठोबाच्या देवळाचा गाभारा. आरती चालली आहे. आरती झाल्यावर लोक खालीं बसतात व आरती फिरते; इतक्यांत गरुड व सखू येतात. सखू ते विठोबाचें रूप पाहून आनंदनिमग्न होऊन देहभान विसरली आहे. तिला कोणीं ढकलूं नये म्हणून गरुड तिच्याजवळ उभा राहून लोकांस दूर ठेवीत आहे. ]

**सखूबाई:**—

अभंग.

**तुझे पाय माझें भाळ । एकत्रता सर्वकाळ ॥**
**हेंचि देईं विठाबाई । पांडुरंग माझे आई ॥**


( गरुड तिला लाटेच्या खालून विठोबाच्या अगदीं चरणांपाशीं नेतो. )

देवा ! या पंढरींत आलें तेव्हांच माझीं दुःखं मी पार विसरून गेलें. आणखी आतां या तुझ्या पायांपाशीं आलें आहे त्यानं तर माझ्या जन्माचं सार्थक झालं. आतां एकच माझी शेवटली विनंति आहे.

अभंग.

**शेवटींची विनंति । ऐका ऐका कमळापती ॥**
**काया वाच मन । चरणीं असे समर्पण ॥**

देवा ! पंढरिनाथा ! या जगांत तुझ्यावेरीज मला कोणी नाहीं. तूंच माझी आई, तूंच माझा बाप. माझी आई तुझ्या चरणांपाशीं गेली आहे



सखूबाई:— मजवरं घालं घण । परि न सांडी चरण ।
मान कापून देईन शिर । पाहें चित्त सारंगधर ॥ [ पृष्ठ ९६

ती पहा ! ती मला दिसते आहे. बोलावते आहे. देवा, मला तिच्याकडे पोंचीव. नाहीं तर तुझ्या चरणांपाशीं ठेव. नाहीं–नाहीं मी तुझे चरण सोडणार !—

अभंग.

**मजवरी घाली घण । परि न सोडीं चरण ॥ १ ॥**
**मान कापुन देइन शिर । पाहें चित्त सारंगधर ॥ २॥**

[ देवाचे चरण दोन्हीं हातांनीं घट्ट धरून व त्यावर मस्तक ठेवून "पंढरीनाथ ! पंढरीनाथ ! पंढरीनाथ !" असें त्रिवार मोठ्यानें म्हणत प्राण सोडते. हें कोणास समजत नाहीं. ]

**एक बडवा:**—ऊठ ए म्हाळसाबाई, किती वेळ बसलीस देवाचे पाय धरून ! तुझ्या एकटीसाठींच विठोबा ठेविला आहे काय इथें ? ऊठ.

**दुसरा बडवा:**—अरे ही बया करती तरी काय ? बायकांची जात हातांनीं ओढून काढतांही येत नाहीं.

**तिसरा बडवा:**—अग ऊठ अव्वा ऊठ. कारे ? काय बहिरीबहिरी आहे कारे ? ( तिच्याजवळ जाऊन अगदीं कानाशीं लागून खूप मोठ्यानें ) अग ऊठ. ए लंका ! लाखो लोक खोळंबले आहेत वंदनासाठीं अन् ही मानच वर करीना !

**पहिला बडवा:**—ओढा एका बाजूलान् काय करतां ? त्या नायकाला सांग. नाहीं तर बायकांच्या अंगाला हात लावला म्हणून आपल्याच उरावर बसायचे लेकाचे !

**दुसरा बडवा:**—अहो नाईक, अहो ही लका. बिठोबाचे पाय धरून पडली ती उठेनाना, आतां काय करावं हो हिला.

**नाईक:**—उठना मंजी ? कोना तरी बाईला सांग कीं हालवून जागी करायला तिला.

**लोकांपैकीं एक:**—अरे ती मेली तर नाहीं ?

**पहिला बडवा:**—कशानं मरती !

[ नाईक एका बाईला बोलावून देवाजवळ नेतात. ही बाई गिरिजाबाईच आहे. ती सखूच्या जवळ जाऊन "सखू, सखूऊ, तूं आहेस कुठें बघ." असें ममतेनें म्हणते. लोक अगदीं शांत आहेत. गिरिजाबाई सखूला हालवून पहाते व "अरे देवा! हें तर अगदीं लांकूड झालं आहे!" असें म्हणून रडूं लागते. रडतां रडतांच "सखू मोठी पुण्यवान् हो पुण्यवान्!" असें ओरडते. त्याबरोबर लोकांतूनही "पुण्यवान्!" "पुण्यवान्!" असे उद्गार निघतात व एकदम "पुंडलीकवरदे हरिविठ्ठल!" "पुंडलीकवरदे हरिविठ्ठल!" असा गजर होतो. पडदा पडतो. ]

## प्रवेश ४ था.

[ स्थळः-चंद्रभागेच्या वाळवंटाचा एक भाग. गिरिजाबाई येते. ]

**गिरिजाबाईः**—काय पुण्य त्या पोरीचं, पण तिला अग्नि द्यायला चार ब्राह्मण मिळेनात! हें जर इतर जातींतलं प्रेत असतं तर हजारों लोक व भजनाच्या दिंड्या बरोबर जाऊन तिचं दहन झालं असतं. तिळा आतां त्या गोष्टीचं काय म्हणा. पण आपण मागें राहिलों आहोंत त्यांनीं प्रेताची व्यवस्था तर लावली पाहिजे. बडवे मंडळी तर तिच्यावर रागावली आहेत. कां? तर म्हणे तिच्या प्रेताचा देवाला विटाळ झाला! काय या मुर्खांना म्हणावं? तिच्या गांवाची मंडळी कांहीं इथें आली आहे, पण कुठें दिसत येत नाहींत. पोरीचं प्रेत आमच्या जागेंत आणून ठेवलं आहे. 'लवकर त्याचा निकाल लावा नाहीं तर आम्ही महारांकडून नेववतों' म्हणून सरकारी अंमलदारांचा तगादा लागला आहे. हे पाहायला गेले आहेत त्या कऱ्हाडच्या ब्राह्मणांना. पण ते भेटून त्यांनीं दया केली तर! आमच्या घरीं म्हणायचं कीं मी एकटा करतों. पण एकटा काय करतों? म्हातारपण झालेलं आणखी एकट्यानं काय होणार? माणसं शोधायला गेले आहेत तेच श्रम होतील ते चार दिवस जाणवतील. ( इतक्यांत विश्वंभरबोआ व त्याच्याबरोबर चंदनभट, गोपाळ दीक्षित, आणि भैरवभट येतात. )

विश्वंभरबोआ:-

पद.

धन्य सती सखुबाई ।
प्रेम जिचें हरिपायीं ॥ ध्रु० ॥
छल आजवरी बहु सोशियले, सार्थक शेवटिं होई ॥
पांडुरंगपदिं तनु अर्पुनियां, वैकुंठाप्रति जाई ॥ १ ॥

हे आले आहेत बोआ तिथे कऱ्हाडकर, आणखी मी चवथा. जायचंय् लांब तेव्हां काय होईल तें खरं.

गिरिजाबाई:-( एके बाजूस ) यांना सांगितलं का परोपकाराच काम आहे म्हणून ? त्यांच्या गांवचीच आहे, आणखी मोठी पुण्यवान होती, असं कांहीं सांगा म्हणजे वळतील.

विश्वंभरबोआ:- हो सांगितलं आणखी ते कबूलही आहेत; मात्र ते म्हणतात कीं हें उरकून तिसरे प्रहरीं कुठें सभा आहे देव विटाळला कीं काय याच्या शास्त्रार्थाची, तेव्हां तिकडे जायला सांपडलं पाहिजे.

चंदनभट:- अरे भैरवभट, आपल्या गांवची मुलगी आहे, फार सत्वशील होती. चला टाकूं फुंकून. पुण्यकर्मच आहे, कांहीं वायां नाहीं जायचं.

भैरवभट:- त्या गदाधरपंताची सून का रे ?

चंदनभट:- अरे हो ती सखू. सुटली बाबा त्या सासूच्यान् नवऱ्याच्या जाचांतून.

गोपाळ दीक्षित:- अरे पण आपल्याला त्या शास्त्रार्थाच्या सभेला जायचं आहेना ! तिथें जरूर गेलं पाहिजे. अन् आरडाओरडा करून देवाला विटाळ झाला असं ठरवलं पाहिजे, म्हणजे कांहीं स्वाहाकार होतील, कांहीं अनुष्ठानं होतील, चार दिवस आपली भिक्षुकांची चंगळ उडेल ?

चंदनभट:- तें खरं, पण हिला फुंकून तर टाकूं. ती किती झालं, तरी आपल्या गांवची आहे. ब्राह्मणाची आहे. सत्वशील होती. कांहीं तरी

परोपकार करीत असावं, वायां नाहीं जायचा. आपल्याला उद्यां असाच मृत्यु आला अन् कोणी अग्नि देईना, तर आपल्याला काय वाटेल ? चल. चल. उगीच मागें पुढें करूं नको. विश्वंभरबोआ आम्हीं येतों. बाकीची तयारी आहे ना ? चला रे, नाहीं नाहीं म्हणायचं. आपल्या ब्राह्मणांत हें मोठं वाईट आहे बोआ !

**गोपाळ दीक्षितः**—अरे नक्षत्रदर्शनापर्यंत बसावं लागतं. उपास घडतो.

**भैरवभटः**— एः ! यात्रांतून न् ह्याच्यांतून कसलं आलं आहे नक्षत्र-दर्शन न् कसला आला आहे उपास ! पंढरपुरांत विठोबाचं नांव घेतलं कीं सगळीं पापं जळून खाक होतात. कांहीं तरी उगीच दीर्घ शंका काढीत बसूं नको. चला.

[ सर्वजण जातात.

---

## प्रवेश ५ वा.

[ **स्थळ**– पंढरपूर. स्मशानाची वाट. गरुड सचिंत असा येतो. ]

गरुडः— वाहवा ! वाहवा ! ही मात्र खूप बहार झाली बोआ ! या पोरीनं इथें आमच्या यजमानांच्या पायांवर जीव दिला ! तिला सगळे लोक पुण्यवान् म्हणूं लागले, पण आमच पाप उभं राहिलं याला काय म्हणावं ? काय लचांड झालं बोआ ! आतां मागें जशी इंद्राशीं लढाई करून अमृत आणलं, तसं पुनः आणून हिला उठवावीन् कऱ्हाडला पोंचवावी का काय ? हो. तेवढाच उपाय दिसतो आहे, दुसरा उपाय काय ? बायकोस बायको मिळाल्याखेरीज तो दिगंबर का आमच्या महाराजांना सोडतो ! त्याला तर देवांनीं शुद्ध वेडच लावून ठेवलं आहे. काय देवांची लीला असते बोआ ! तिचा कांहीं थांगच लागत नाहीं. पण आपण आतां काय करावं ? देवांनाच जाऊन विचारावं काय करायचं तें, दुसरं काय ? पण छे. आतां जर आपण देवाकडे गेलों तर भलतंच लचांड व्हायचं. देव उलटे आपल्यालाच बोलायचे ! या सखूच्या केंसालासुद्धां धक्का लागूं देऊं नको, असं बजावलं असतां हिला जीव का देऊं दिलास ? कशी मेली

तें सांग. असं विचारून आपल्यालाच दोष द्यायचे ! अन् ही सखूबाई तरी काय वस्ताद् हो ! मला आधीं कांहीं कळूं दिलं नाहीं हिनं. ही देवाच्या पायावर जीव देणार असं जर मला कळतं, तर हिला पायांपर्यंत पोंचवलीच नसती. असं कांहीं तरी लचांड होऊन बसतं बोआ. आईला दैत्यांच्या दास्यांतून सोडवण्यासाठीं एकदां अमृत आणलं; आतां यजमानांना त्या दिगंबरपंताच्या दास्यांतून सोडवायला पुनः धडपडत इंद्रलोकाला गेलं पाहिजे. एकंदरींत आमच्या नशिबांत जन्मभर टल्ले खायचे आहेत एवढंच खरं. जाऊं या आतां पुनः अमृतकुंडाकडे. पुनः त्या कुंडाच्या रक्षकाशीं किती युद्ध करावं लागतं आहे कोणाला ठाऊक ! पण यजमानांना सोडविण्यासाठीं प्राणाकडे पाहतां उपयोगीच नाहीं. हं करा उड्डाण ! ( इकडे तिकडे पाहातो. इतक्यांत रुक्मिणीमाता त्याच्या नजरेस पडते, त्याबरोबर ) वा ! या रुक्मिणीआईसाहेबांना आमच्यासारखी काळजी पडलेली दिसते आहे. पडायचीच ती ! न जाणों कदाचित् यांना एका अर्थी मनांतून बरंच् वाटत असेल ! पण आतां पाहूं तर खरं या काय करताहेत त्या ! असे एका बाजूला उभे राहूं या.

[ साचिंत अशी रुक्मिणी येते. ]

**रुक्मिणीः**—वाहावा ! वाहवा ! ही फारच मौज झाली. या सखूवर संकट येऊं नये, तिला पंढरीला जायला सांपडावं म्हणून स्वारींनीं तिचं रूप घेऊन तिच्या पतीची सेवा चालविली आहे ! तें समजतांच माझ्या मनांत आलं होतं कीं आपण तिकडे जाऊन म्हणावं " ही लीला कसली ! आपल्या मनांत सखूला संकटांतून सोडवायची, पंढरीला आणावयाची तर त्या तिच्या दुष्ट सासूच्यान् नवऱ्याच्या मनांत सुबुद्धि कां उत्पन्न करूं नये ? तसं केलं म्हणजे तीं सगळीं माणसं सन्मार्गाला लागतील. " पण बोलून उपयोग काय ? नेहमींचें उत्तर ठरलेलंच. ब्रह्मादिकांलासुद्धां जी आमची लीला अगाध, ती तुम्हांला सांगून तरी काय समजायची आहे ? पण त्या यःकाचित् माणसाची बायको होऊन त्याची सेवा करीत रहायचं याला म्हणावं काय ? ही लीला कसली ? आतांपर्यंत मी आपल्या मनाची

समजूत घालतें आहें कीं, चारदोन दिवसांत ही घरीं परत जाईल आणखी यांची सुटका होईल. पण ही बिचारी छळाला त्रासलेली, ही कशाला परत जाते आहे. हिनं आपला तिकडच्या पायांपाशीं—नव्हे पायांवर जीव दिला. आतां आपण कांहीं तरी व्यवस्था लावल्याखेरीज स्वारी येणार कशी परत ? व्यवस्था लावायची म्हणजे काय ? अमृतसंजीविनीनं तिला उठवायची. दुसरं काय ? उठवलीच पाहिजे. आणखी तिकडे लावून दिली पाहिजे. दुसरा कांहीं उपाय नाहीं. ही गेल्याखेरीज स्वारी कांहीं परत यायची नाहीं हें ठरलेलं. कारण त्या तिच्या नवऱ्याला वेड लावून ठेवलं आहे बायकोचं. पण आतां ही बायको गेली म्हणजे यांच्यासारखी वागेल का ? आणखी हिच्यावर त्याचं प्रेम असंच बसेल का ? नाहीं तर ही गेली कीं पुनः येरे माझ्या मागल्या. कांहीं होवो. आपल्या देवांना तर आपण परत आणलं पाहिजे. अन् तें हिला पुनः उठवून परत पाठवल्याखेरीज कांहीं जुळायचं नाहीं. ठीक आहे तर मग, गरुडाला हांक मारून स्मशानांत जाऊन काढूं या शोधून कोणती तिची चिता ती. आणखी त्यालाच सांगूं हिला कऱ्हाडला पोंचवून ये म्हणून ! ( इकडे तिकडे पाहून ) गरुडा !

**गरुडः**— ( झटकन् पुढें येऊन ) काय आज्ञा आईसाहेब ! 

**रुक्मिणी:**— वा ! हांक मारण्याचा अवकाश, तूं आपला जवळ ठेवलेलाच ना ? पाळंथींवरच होतास वाटतं ?

**गरुडः**—मग काय करावं आईसाहेब, आपण केव्हां बोलवाल याचा कांहीं नेम आहे ! त्यांतून आज तर हा असा प्रसंग !

**रुक्मिणी:**—अरे तूंच तर हा प्रसंग आणलास आणखी...

**गरुडः**—आईसाहेब, माझं कां गरिबाचं नांव घेतां ? मी आपला हुकुमाचा ताबेदार ! देव सांगतील तें करायचं, आपण सांगाल तेंही करायचं. पण आईसाहेब, या पोरीला म्हणावं काय ? हिनं आपला [illegible] देवांच्या पायापाशीं चिरकाल [illegible] म्हणून जीव

दिलान् कीं हो ! तिकडे देवाचं काय होईल. इकडे आपलं काय होईल, याचा कांहीं तरी विचार ? आईसाहेब, आतां आपण तरी कांहीं युक्ति काढा आणखी देवांना परत आणा.

**रुक्मिणीः**—अरे, आपण काय उपाय करायचा आहे ? त्यांच्या मनांत आलं म्हणजेच ते येतील. आपल्या युक्त्यांनीं का येणार आहेत ?

**गरुडः**—आईसाहेब, एकूण आपल्या मनांतून त्यांना पतिसेवा किती कठिण असते त्याचा चांगलाच अनुभव द्यायचा आहे वाटतं ?

**रुक्मिणीः**—अरे हो. तो तरी कां देऊं नये ? किती तरी कठिण असं हें पतिसेवेचं व्रत आम्ही आज अनादिकालापासून करीत आलों आहों, त्याचं सुख तरी समजेल एकदां. बाबा रे, आमची बायकांची स्थिति किती भयंकर असते याचा अनुभव त्या जन्माला गेल्याखेरीज कोणाला समजायचा नाहीं. बरा येतो आहे अनुभव तो.

**गरुडः**— छे. छे. छे. आईसाहेब असं नका करूं. त्यांना एकदां परत आणा. नाहीं तर——

**रुक्मिणीः**—नाहीं तर काय ?

**गरुडः**——अहो आपल्याला कोणाला त्यांची गरज नाहीं असं मनांत येऊन ते कल्पांतापर्यंत तसेच राह्यचे ! त्यांचं काय वाईट चाललं आहे ? पतीची सेवा त्यांनीं करायच्या ऐवजीं पतिच त्यांचं दास्य करतो आहे ! ही आपली बायको नाहीं, देव आहेत, असं त्याला स्पष्ट कळलं असतं तरी सुद्धां इतक्या भक्तीनं सेवा केली नसती हो ! तेव्हां त्यांचं ठीक आहे. पण आपले देव आपल्या घरीं येऊं द्या. त्याच्याबद्दल मी आपली क्षमा मागतों.

**रुक्मिणीः**—अरे वेड्या, आपण काय करणार ? आपण त्यांचंच ध्यान करून त्यांनीं परत येण्याकरितां प्रार्थना करायची. दुसरं काय

पद.

ध्यान करिं हृदिं आधिं सांवळ्या मूर्तिचें ॥ ध्रु० ॥
स्वशिरिं धरि रत्नमय मुकुट भालीं असे ।
केशरी तिलक, मुखिं पाहि मंद स्मित वसे ॥ १ ॥
करिं गदा शंख नवकमल चक्रा धरी ।
कंठिं कौस्तुभ हृदीं वत्सलांछन दिसे ॥ २ ॥
शोभली यत्कटी पीत वसनें अती ।
प्रिय मला सतत जी मूर्ति तूं ध्यायिं ते ॥ ३ ॥

गरुडः—ध्यान झालं तें ठीक झालं आईसाहेब, पण आतां त्या सखूला तेवढी जिवंत करून द्या. तुमच्याजवळचं अमृत संपलं असलं तर मीं आपल्या विनतामातेला दास्यांतून सोडविण्यासाठीं जसं मागें इंद्राच्या लोकांशीं झगडून आणलं, तसं यांना या पतिदास्यांतून सोडविण्यासाठीं पुनः अमृत घेऊन येतों. त्यानं तिला उठवूं आणखी मी तिला कऱ्हाडला पोंचवीन.

रुक्मिणीः—बरं तर, चल, मी त्याच विचारांत होतें. चल स्मशानाकडे.

[ दोघें जातात.

---

## प्रवेश ६ वा.

[ स्थळ—स्मशान, कांहीं जळत्या व कांहीं जळून
गेलेल्या चिता दिसताहेत. ]

रुक्मिणीः—काढ कुठें आहे तिची चिता ती शोधून. अमृतसंजीविनीनं मी तिला उठवतें.

गरुडः—नीट पाहूं द्या मला. नाहीं तर सखूबाईच्या ऐवजीं एखादा म्हातारा सखोबाच जिवंत होऊन पुढें उभा राह्यचा ! ( नीट पाहून ) ही पाहा आईसाहेब.

रुक्मिणीः—ठीक आहे. हीच खरी. ( चितेजवळ जाऊन ) हे—वैकुंठ०

पद.

घे, घे, पुनरपि जीवा या जड देहातें ।
ऐहिक काज न सरलें तव जा संसृतिमार्गातें ।
ये, ये, पुनरपि जीवा या भूलोकातें ॥ ध्रु० ॥
अमृतसिंचनिं या जड देहा पावें क्षणीं या जागृति ।
आत्मचरित तव सरतां जीवा वैकुंठीं जा मागुतीं ॥ १ ॥

[ सखुबाई चितेंतून उठून बसते. ]

गरुडः—वा ! ही तर सदेह आणखी सजीव झाली.

रुक्मिणीः—पण हिला मी इथेंच पूर्ण जागी करीत नाहीं. हिला स्वप्न पडल्यासारखा भास करून त्यांत कांहीं उपदेश करतें. मग हिला तूं एकदम कऱ्हाडाला घेऊन जा. तिथें ही गेली आणखी घरीं जाऊं लागली कीं आपोआप स्वारी इकडे येईल.

गरुडः— ठीक. ठीक. तें माझं काम. ( आपल्याशींच ) अमृतासाठीं इंद्रलोकाला जाण्याच्या हेलपाट्याऐवजीं कऱ्हाडच्या हेलपाट्यावरच भागलं!

[ पडदा पडतो.

---

## प्रवेश ७ वा.

[ स्थळ– कऱ्हाड, नदीतीरचा रस्ता. देवळाच्या जवळच्या रस्त्यावर सखू चालली आहे. तिच्याबरोबर गरुड आहे. ]

सखूबाई:– गरुडा, मला राहून राहून त्या स्वप्नाचं आश्चर्य वाटतं.

गरुडः– खरंच बाई, मलासुद्धां आश्चर्य वाटतं. देवाची तुमच्यावर मोठी कृपा समजा. त्याशिवाय प्रत्यक्ष देवदर्शन—स्वप्नांतच कां होईना !- पण तें देवदर्शनच कीं नाहीं ? तें तरी उगीच कोणाला होणार आहे ?

सखूबाई:– रुक्मिणीमाता मला स्पष्ट दिसली. माझ्याशीं बोलली मला तिचं तें स्वरूप पक्कं आठवतं, मला तिचे सगळे शब्द पक्के आठवतात काय म्हणाली रुक्मिणीमाता सांगूं का ? ( आठवल्यासारखें करून

" मुली ऊठ, तुझी आमच्या ठिकाणची निष्ठा पाहून आम्ही फार संतुष्ट झालों आहों. तुझ्यासारखे भक्त फार थोडे, तूं आपले प्राण त्या चरणांवर समर्पण केलेस, पण तूं अजून लहान आहेस. तुला इतक्यांत वैकुंठाला जाण्याचं कारण नाहीं. तुला पुनर्जन्म दिला आहे. आतां तूं आपल्या घरीं जा. तुझा छळ होणार नाहीं. तुला सुख लागेल. जा. दुराग्रहानं आमची अवज्ञा करून इथें पंढरपुरांत राहूं नकोस. तुझ्या सासूचं, सासऱ्याचं—सगळ्यांचं तुझ्या ठिकाणीं पूर्ण प्रेम राहील. घरीं जा. घरीं जा. घरीं जा. त्रिवार सांगतें जा. " हेच शब्द. ते सगळे अजून मला स्पष्ट ऐकूं येत आहेत.

गरुडः—तुम्हीं दृढ निश्चयानं वारी केलीत त्याचंच हें फळ. बाई, मी आतां जाऊं ? तुम्हांला सुखरूपपणीं पंढरपुरला नेलं, पंढरपुराहून परत आणलं, आतां मी आपला देवाचं दर्शन घेतों. आणखी जातों.

सखूबाईः—गरुडा, मी तुझ्या कामगिरीबद्दल तुला कांहीं तरी दिलं असतं, पण माझ्याजवळ कांहीं नाहीं. घरीं नेऊन जेवायला घालीन म्हटलं तर तेंही माझ्या स्वाधीनचं नाहीं. तेव्हां आतां काय करूं ? कधीं काळीं मला बरे दिवस आले, आणखी तूं इकडून जर गेलास, तर ये आमच्या घरीं. तुझ्या या श्रमाबद्दल कांहीं तरी देईन.

गरुडः—ठीक आहे बाई ! तुम्हांला सुखाचे दिवस येऊं द्या. मी आपली बक्षिशी मागायला अगदीं जरूर येईन. आतां रजा द्या मला.

( जातो ).

सखूबाईः—अहाहा ! पंढरपूरचें वैभव किती मोठं ! तिथले प्राणी किती भाग्यवान् ! तिथें अक्षयीं राहावं असं माझ्या मनांत फार होतं. पण रुक्मिणीमातेनं मला पंढरपुरला राहूं नको, घरीं जा, म्हणून सांगितलं तव्हां काय करायचं ? मला कांहीं विशेष वाईट नाहीं वाटत येथें आल्यानं. रुक्मिणीमातेनें जर मला आशीर्वाद दिला आहे, तर माझा आतां छळ होणार नाहीं. आतां आपण देवाचं दर्शन घ्यावं आणखी घरीं जावं.

[ जाते.

---

# प्रवेश ८ वा.

[ **स्थळः**– कऱ्हाड. नदीतीरचा रस्ता. विठोबा गिरिजाबाईंच्या रूपांत प्रवेश करितात. ]

**गिरिजाबाईः**–सखूला गरुडाबरोबर पंढरपुरला पाठविण्याचं आणखी इथल्या आपल्या तिच्या सोंगाच्या बतावणीचं अशीं दोन्ही कामं अगदीं उत्तम तऱ्हेनं पार पडलीं. पण शेवटीं तिनं निर्धारानं आमच्या पायावर देह ठेवल्यावरही आम्ही स्वस्थ बसल्यामुळें आमच्या रूपांतराचं सगळं भांडवल बाहेर पडलं. तेव्हां रुक्मिणीनं आमची इथून सुटका होण्याकरितां सखूला अमृतसंजीविनीनं पुनः जिवंत करून गरुडाबरोबर इथें परत पाठविली. हें ध्यानांत येतांच आपण पाणी आणायला जातें म्हणून हट्ट धरून शालू नेसलेल्या त्या स्थितींतच घरांतून पाय काढला. इतक्या दिवसांत पतिराजांनीं कधीं पाण्याबिण्यालासुद्धां जाऊं दिलं नाहीं, पण आजच असा आपण कां हट्ट धरला याबद्दल त्यांना आश्चर्य वाटलं असेल. पण तिकडे लक्ष्य देतो कोण ? घरांतून कसा तरी पाय काढला. आणखी रस्त्यांत आल्यावर पुनः तें गिरिजाबाईचं रूप घेतलं. आतां ही सखू आली कीं तिची तिला घागर देऊन घरीं पाठवायची. म्हणजे पाण्याला गेलेली सखू परत आली म्हणतील. हं, गेलेच गरुड राजश्री तिला इथें सोडून. आता आपण तिला भेटावं. ( इतक्यांत सखू येते. ) झाली बाई तुझी यात्रा सफळ ? आलीस तूं परत सुखरूपपणीं ? आम्ही आतां परत जातों आहोंत. आतां तुझ्याशीं बोलायला मात्र मला वेळ नाहीं. आमची मंडळी पुढें जायला निघाली. थोड्या अंतरावर गेली सुद्धां. मला त्यांना जाऊन मिळालं पाहिजे लवकर. तेव्हां आतां मी जातें. मात्र एवढं काम कर, कीं ही घागर तुझ्या घरची मीं आणली होती, ती तेवढी जातांना भरून घरीं घेऊन जा.

**सखूबाईः**– पण गिरिजाबाई, तुमचे किती उपकार........

**गिरिजाबाईः**– बोलूं नको. बोलूं नको. मला वेळ नाहीं. तुझ्याशीं

बोलत उभी राहिलें, तर माझ्या शोधासाठीं आतां ते परत येतील. पुनः भेटूं केव्हां तरी त्या गोष्टी बोलायला ! ( असें म्हणून झटकन् निघून जाते.

सखूबाईः– अं ? या पहातां पहातां गेल्या ! काय चमत्कार आहे ! अन् माझ्या घरची घागर यांना मिळाली कशी ? सासूबाईच्या स्वभावांत कांहीं तरी फरक झाला असला पाहिजे. नाहीं तर गिरिजाबाईला त्या घागर द्यायच्या ! कळेल काय तें. आपण घरीं जावं. [ जाते.

---

## प्रवेश ९ वा.

स्थळ— गदाधरपंतांचा वाडा, गदाधरपंत, महिपतराव व श्रीपतराव यांच्याशीं बोलत आहेत. ]

गदाधरपंतः– ( तपकिरीची चिमूट ओढीत ) व्याप तितका संताप ! ही प्रपंचाची कटकट माझ्या मागची सुटेना एकदांची. सूनबाई पंढरपूरला गेली केव्हां ? वारली कशी ? हा आहे तरी काय घोंटाळा ?

महिपतरावः– पण गदुकाका, ही हकीकत तुम्हांला कळली कशी ?

गदाधरपंतः– पंढरीचे वारकरी शेतावरून परत जात होते, तेव्हां ही बातमी मला कळली. मला संशय येऊन ते भलतंच कांहीं सांगतात असं वाटलं. तरी पण आपण ब्राह्मण, तेव्हां हें खरं असल्यास अशौच पाळलं पाहिजे, म्हणून खरं काय तें काढण्यासाठीं इथें आलों. इथें तर काय साराच घोंटाळा माजलेला दिसतो ! देवा, सोडीव बाबा या संसारचक्रांतून एकदांचा !

श्रीपतरावः– चमत्कार आहे बोआ !

( इतक्यांत दिगंबरपंत, म्हाळसाबाई, भीमा, चंद्रभागा, चंदनभट, गोपाळ दीक्षित, भैरवभट वगैरे मंडळी येतात. )

दिगंबरपंतः– भटजी, बोलण्याचा राग येऊं देऊं नका. पण तुम्ही

कांहीं तरी कैफ केला आहे किंवा तिघांचवघांनीं मिळून आम्हांला फसवून कांहीं तरी उपटायचा घाट घातला आहे खचित !

म्हाळसाबाई:— रांडेच्यांनो, मुलगी धडधडीत आमच्या नजरेसमोर आज पंधरा दिवस वावरते आहे, पहिले आपले सगळे वेडेचार टाकून देऊन कशी गुण्यागोविंदानं राहते आहे, आणखी तुम्ही म्हणतां ती पंढरपुरास गेली अन् देवळांत देवाच्या पायांपाशीं मेली, आणखी तुम्हीं तिला जाळलीत ? ब्राह्मणाला वेडेवांकडे शब्द बोलूं नयेत, पण तुमच्यासारख्यांना आतां काय करावं ?

चंदनभट:— ( संतापून ) आम्हांला शिव्या देतेस म्हातारे ? कैफ केला म्हणतो हा पोरगा ? काय, याचा अर्थ काय ?

भैरवभट:— या भाषणाबद्दल तुमची आम्ही कधीं उपेक्षा करणार नाहीं. तो विश्वंभरबोआ साक्ष आहे. आम्ही तिचं प्रेत जाळायला जात नव्हतों, पण त्यानं आम्हांला आग्रह करून तिला अग्नि देववला.

गोपाळ दीक्षित:— अहो, एकटा विश्वंभरबोआच कशाला ? सगळं पंढरपूर साक्ष आहे. विठोबाच्या पायांवर तुमच्या सुनेनं प्राण दिला. विठोबाला तिच्या प्रेताचा विटाळ झाला कीं नाहीं, याचा निर्णय करण्याकरितां काशीस, रामेश्वरास, शृंगेरीस, द्वारकेस, शंकराचार्यांकडे पत्रंसुद्धां गेलीं आहेत !

भैरवभट:— विश्वंभरबोवा आणखी त्याची बायको हीं आजच आमच्या बरोबर आलीं; आणतों त्यांना बोलावून. इथें माझ्या घरीं आहेत. बरोबरच आलों, तेव्हां म्हटलं माझ्याच घरीं उतरा. ( जातो. )

म्हाळसाबाई:— तो विश्वंभरबोआ ना ? वाहवा ! वाहवा ! साता लबाडांतला लबाड ! त्याचेंच कांहीं तरी कवटाळ असेल हें. अहो, तोच तर तिला फुसलावून नेत होता. आणखी त्याच्याबरोबर असतांनाच आम्हीं तिला धरून आणली. मग कोंडून बांधून ठेवली, आणखी आपले वेडेचार सोडून द्यायचं जेव्हां कबूल केलं तेव्हां तिला मोकळी केली.

आतां चांगली वागते आहे. नको नको म्हटलं तरी आज काय तिच्या मनांत आलं, ती आपली शालू नेसलेली दागिन्यांनीं लहडलेली तश्शी गंगेला पाण्याला गेली आहे. आत्तां येईल. हातच्या कांकणाला आरसा कशाला ?

**गदाधरपंतः**— हो ! येईलच ती आतां. पण हे भटजी जी हकीकत सांगतात आणखी दुसऱ्या वारकऱ्यांच्याही तोंडून तशीच मीं ऐकिली, ती तरी खोटी कसं म्हणावं ! ते का सारे वेडे का आहेत ?

**म्हाळसाबाईः**— ते एक वेडे आणखी तुम्ही सात वेडे ! तुम्हीही आणखी बोला त्यांच्यासारखंच म्हणजे त्यांना आयतंच फावेल.

**महिपतरावः**— हें प्रकरण आहे तरी काय बोआ !

**चंदनभटः**— प्रकरण कसलं हो ! या बाईची सून पंढरीला गेली होती. तिनं देवाच्या पायाला मिठी मारून प्राणसोडला. त्या विश्वंभरबोआचा आग्रह कीं ब्राह्मणाची सवाष्ण तेव्हां ब्राह्मणांनीं अग्नि द्यावा; म्हणून आम्हीं स्मशानांत तिचं प्रेत दहन केलं. यांना कळावं म्हणून सांगायला आलों कीं, अजून दहा दिवस झाले नाहींत, एकादशीच्या दिवशींची गोष्ट, सुतक धरा. तर आम्हांला खोटं ठरवून ही मंडळी शिव्याच देत सुटली आहे, आणखी म्हणताहेत आमची सून कऱ्हाड सोडून गेली नाहीं !

[ इतक्यांत विश्वंभरबोआ आणखी गिरिजाबाई यांना घेऊन भैरवभट येतो. ]

**भैरवभटः**— सांगा बोआ यांना आम्ही सांगतों तें खरं का खोटं.

**विश्वंभरबोआः**— अगदीं अक्षरशः खरं. आतां यांनीं सारं सांगितलंच असेल, तें मी पुनः सगळं सांगत नाहीं; पण आपली सून पुण्यवान्, तिनं विठोबाच्या पायांला मिठी मारून त्यावर डोकं ठेवून प्राण सोडला. आणखी तिला आम्हीं चौघांनीं श्मशानांत नेऊन तिचं प्रेत दहन केलं.

**गिरिजाबाईः**— म्हाळसाबाई, आमच्यावर तुमचा राग आहेच, पण हे सांगताहेत ही गोष्ट अगदीं खरी ! मीं, मीं तिचं प्रेत आमच्या बिऱ्हा-

डाच्या जागीं नेऊन पुढची सगळी व्यवस्था केली. अहाहा, ती खरी पुण्यवान् !

**म्हाळसाबाई:**— गप्प बैस थेरडे ! तूं तिला फुसलावून नेत होतीस, पण आम्हीं तिला ओढून आणून कोंडून बांधून घातली. आणखी दोन दिवसांनीं सोडली ती कशी गुण्यागोविंदानं रहाते आहे. पाण्याला गेली आहे, आतां येईल तुझं नाक कापायला.

**गदाधरपंत:**— अग पण जरा सरळ शब्दांनीं बोल.

**म्हाळसाबाई:**— ( वेडावून दाखवून ) सरळ शब्दांनीं बोल—सरळ शब्दांनीं काय बोलायचं आहे ? चांभाराच्या देवाला खेटराचीच पूजा पाहिजे.

**भीमा:**— सखूवहिनी अजून कशी येईना ! ( दूर पाहिल्यासें करून ) पण हें कोण येतं आहे कडेवर घागर घेऊन ? सखूवहिनीच वाटतं ! काकू आग्यावेताळ आपल्या मूळ स्वरूपावर आलाग आला ! हिचे दागिने काय झाले ? नेसलेला शालू कुठें गेला ? कोणाला देऊन आली का काय सगळंच ? आले मला वाटतं ते पहिले पाढे पढो पंचावन्न. सखूवहिनीच ना ही ? हो. सखूवहिनीच खास.

( सखू आपल्या पूर्ववेषांत कडेवर भरलेली घागर घेऊन येते. सर्वजण पाहतात आणि चकित होतात. )

**भैरवभट:**— ( सखूकडे पाहून घाबरून लटलटां कांपत ) अरे भूऽऽऽत ! भूऽऽऽत !

**चंदनभट:**— ख्—ख्—ख्—खास ही स—स—स—सखू नाहीं तिचं भूत आहे !

**विश्वंभरबोआ:**— तिची कांहीं वासना राहिली वाटतें मागें म्हणून ही आली.

**म्हाळसाबाई:**— पण तुझ्या अंगावरचे दागिने कुठं आहेत ? आणखी ही तुझी जुनी पातळ—चोळी नेसून गेलीस केव्हां ?

गदाधरपंतः– हा काय गोंधळ आहे बोआ परमेश्वर जाणें !

म्हाळसाबाईः–परमेश्वर कशाला ? मी जाणतें आहें सारं. उगीच का तुमच्या कानीं कपाळीं ओरडत होतें, कीं ही सून नाहीं, अवदसा आली आहे आपल्या घरांत म्हणून ! मला त्या दिवसापासूनच वाटत होतं कीं हें कांहीं तरी चेटूक आहे. अहो, हिला आम्हीं छळीत होतों ती उगीच नाहीं हो ! कौटाळीण अशीच आहे !

दिगंबरपंतः–( आपल्याशीं ) ही माझी बायको? हो ! बायको तर खास. पण हिचा तो विलासीपणा गेला कुठें ?

सखूबाईः– ( गिरिजाबाईस पाहून आश्चर्यानें ) तुम्हीं मला आतां विठोबाच्या देवळाजवळ भेटलांत. घागर दिलीत आणखी जातें म्हणालांत, त्या इथें कशा !

गिरिजाबाईः– ( सखूकडे टक लावून पहात फार आश्चर्यानें ) कोणी मीं ? मीं तुला घागर दिली ! सखू, तूं पिशाच्च होऊन आलीस वाटतं. पण.........

सखूबाईः–मी पिशाच्च ? हो, म्हणाल तर तेंही खरं आहे. मी एकदां स्वप्नांत मरून माझा पुनः जन्म झाला आहे खरा !

म्हाळसाबाईः–भूत नाहीन् कांहीं नाहीं; हा या मेल्या भटांचान्, वारकऱ्यांचा माझ्या घरांतले दागदागिने उपटण्याचा घाट दिसतो.

तिघे भटः–अं: ? अं: ? काय, म्हणतां काय हें ?

दिगंबरपंतः–मी तर फारच बुचकळ्यांत पडलों आहें. पण आई, दम धर. हिचं हें पातळ हिनं पुनः नेसूं नये म्हणून मीं आपल्या हातानं लपवून ठेवलं होतं तें जागच्या जागींच आहे का नाहीं तें पहातों. तें हिला मिळालं कसं ? ( आंत जातो. )

गदाधरपंतः–जों जों जास्त चौकशी करावी तों तों जास्तच चमत्कार वाटायला लागला.

म्हाळसाबाईः–पुरे तुमचं.

**दिगंबरपंतः**— ( एक गाठोडें बाहेर घेऊन येऊन ) आई, आई, जुनं पातळ नाहीं, या गाठोड्यांत आतां नवा शालू आहे. आणखी सगळे दागिने आहेत.हे पहा. आतां मात्र हा पिशाच्चांच्या खेळाचा प्रकार दिसतो. कारण ही गेली तेव्हां शालू नेसली होती. दागिने अंगावर होते. मीं नको जाऊं, नको जाऊं म्हटलं, पण ऐकलं नाहीं तिनें. गेली भर्रकन. काय तिच्या मनांत आलं कोणास ठाऊक. आणखी आली ही अशी लंका! अरे बाप रे! गेल्या आठ दहा दिवसांत मीं सारे विलास केले, सुख भोगलं, तें भुताशीं का काय?

**भैरवभटः**—अहो भूत तर काय! इतका वेळ आपण धीर धरला बोआ; पण आतां नाहीं आपल्याच्यानं निघत धीर. चं—चं—चंदनभट.

**चंदनभटः**—अरे पहिल्यानं कोण पाय लावून पळतो याची वाट पहात होतों मी. चला जाऊं. अहो, तुम्हीं याचा चांगल्या पंचाक्षऱ्याकडून उलगडा करा. त्या दंडीबोआ पंचाक्षऱ्याला आणा. तो चांगला वस्ताद आहे या कामांत.

**दिगंबरपंतः**—भिमे, जा. तुझ्या त्या दंडीबोआला लवकर बोलावून आण. ( भीमा जाते. )

**सखूबाईः**—गिरिजाबाई, तुम्हींच ना मला तळघरांतून सोडून आपल्या दिंडीतल्या एका माणसाबरोबर पंढरीला पाठवलंत!

**गिरिजाबाईः**—कोणी, मी? अग सखू, तूं आलीस कशी हें मला माहीत तरी? पंढरपुरास रस्त्यांत भेटलीस तेव्हां मीं नाहीं का तुला विचारलं तूं आलीस कशी न् केव्हां म्हणून? तुझं बोलणं काय समजावं! आम्ही विठोबाच्या जोरावर भुतांना भीत नाहीं म्हणून इथें उभीं राहिलों; पण म्हाळसाबाई, हा कांहीं तरी भुताटकीचाच प्रकार आहे बरं! आतां तुमचे सगळे दागिने आहेत, तेव्हां लबाडांनीं मधून तुम्हांला लुबाडायचा कट केला आहे हें तर खोटं. आतां तुम्हीं म्हणतां तुमची सून इथें होती, अन आम्ही म्हणतों ती पंढरपुरास गेली.

दिगंबरपंतः—अहो होती म्हणजे काय ? त्यांत कांहीं शंका का आहे ! घटकाभऱ्यापूर्वीपर्यंत होती; आतां काय सांगूं आणखी तीन तीनदां तुम्हांला ! पुनः एकदां सांगतों ऐंका. पाणी आणायला म्हणून घागर घेऊन गेली. मी आतांशा तिला पाण्याला जाऊं देत नसें. पण आज काय एकाएकीं तिच्या मनांत आलं. ती आपली उठलीन् जातें म्हणाली पाणी आणायला. गेली तेव्हां दागदागिने घालून शालू नेसलेली तशीच गेली. अन् आली ती ही अशी आली. अन् शालून् दागिने घरांत ! तेव्हां भुताटकीच खरी. आतां मला शंका आहे ती एवढीच, कीं ही आली आहे हीं भूत, का नाहींशी झाली ती भूत ? का दोघीही भुतंच ? बरं पण भूत म्हणतां तर तसं रूप दिसत नाहीं. ते पाय पहा आपल्यासारखेच आहेत. आणखी भुताचं भय वाटावं तसं वाटत नाहीं.

गिरिजाबाईः— अन् मला म्हणते तुम्ही आतां घाटावरल्या देवळांत मला घागर दिलीत ? आम्ही परत आल्यापासून माझी न् हिची तर गांठ मुळींच पडली नाहीं.

म्हाळसाबाईः— दिग्या, अजून तरी तुझे डोळे उघडले असले तर पुनः हिला बांधून टेव. आतां पंचाक्षरी आले म्हणजे भूत आहे का काय आहे तें पाहूं.

दिगंबरपंतः— ( मोठा उसासा टाकून ) हं. त्याखेरीज आतां दुसरा उपाय नाहीं.

महिपतरावः— अहो, हें असं उपयोगी नाहीं. तिला नीट विचारा काय आहे काय नाहीं. मग काय तें करा. दिसतो तर मोठा चमत्कार !

श्रीपतरावः— माझं तेंच म्हणणं. समजुतींत कांहीं तरी घोटाळा आहे.

विश्वंभरबोआः— अहो, हें सारं काय आहे तें माझ्या लक्ष्यांत आलं आहे. हा सगळा त्या विठोबारायाचा खेळ आहे.

**भीमातिरींचा नाटक । यानें लाविला चेटक ॥**
**तुका म्हणे मोठा ठक । जेथें तेथें उभा ठाक ॥**

तसा सखूच्या संकटाला इथें उभा ठाकला. तेव्हां पंचाक्षरी नको नं कांहीं नको.

""म्हाळसाबाई:– हो. हो. पंचाक्षरी नकोन् कांहीं नको. अन् आमची पोरगी तुमच्यां स्वाधीन करावी टाळ कुटून भिक्षेवर पोट भरून तुमची सेवाचाकरी करायला. म्हणे पंचाक्षरी नको. जा रे आणखी कोणी तरी दंडीबोआंना बोलवायला.

**श्रीपतराव:**– हे पहा पंचाक्षरीबोआ आलेच.

**सर्व:**– या, दंडीबोआ या. ( पंचाक्षरीबोआ बसतात. )

**दिगंबरपंत:**– अग, तुझी तरी हकीकत सांग आधीं, मग हे करतील काय उपाय करायचा तो –कोणी बोलूं नका अं. तिलाच बोलूं द्या.

**सखूबाई:**– काय सांगू आतां ? माझं कोणाला खरं वाटत नाहीं. पण विचारतांच तर मी एकदां सांगतें. मला या गिरिजाबाईंनीं मध्यरात्रीं इथें येऊन सोडवलं.

**गिरिजाबाई:**– कोणीं, मीं ? काय ग बाई तरी !

**सखूबाई:**– एक चांगला गरुड नांवाचा वाटाड्या देऊन पंढरपूरला पाठवलं. मी त्रासलें होतें, तिथें एकादशीच्या दिवशीं मीं विठोबाच्या दर्शनाला जाऊन त्याच्या चरणांला मिठी मारून पडलें. पुढें काय झालं तें मला कांहीं ठाऊक नाहीं. मला स्वप्न पडल्याचा मात्र भास झाला. आणखी त्या स्वप्नांत आई रुक्मिणीनं सांगितलं कीं, " तूं परत घरीं जा. मीं तुला पुनर्जन्म दिला आहे. " पुढें जागी झालें. आणखी डोळे उघडले तों मी देवळाच्या एका ओवरींत निजलेली आणखी तो वाटाड्या जवळ ! त्यानंच मला पुनः इथें आणून घातलं. इथें येतें तों आपल्या इथल्या विठोबाच्या देवळाशीं या गिरिजाबाईंनीं माझ्यापाशीं घाईघाईनं ही घागर देऊन आपण निघून गेल्या. घागर भरून घेऊन मी इकडे आलें.

**दिगंबरपंत:**— अन् मग इथें घरांत वावरत होती आज इतके दिवस एकसारखी ती कोण ?

**म्हाळसाबाई:**— अरे, ती डाकीण ?

**गिरिजाबाई:**— ( विश्वंभरबोआंस ) आपण म्हटलं तेंच खरं हो. हा कांहीं भुताटकीचा प्रकार दिसत नाहीं. विठोबारायाचीच लीला दिसते आहे.

**विश्वंभरबोआ:**— ( गिरिजाबाईस ) मला मघांपासूनच तसं वाटतं आहे. देवांनींच तुझं रूप घेऊन तिला सोडवून नेलं, आणखी आपण सखूचं रूप घेऊन इथें राहिले.

**पंचाक्षरीबोआ:**— हं: ! काय बोआ ? तुमचीं हीं बोलणीं ऐकायला का मला बोलावलंत ? का मीं कांहीं उपाय करावे ? मीं आतां नीट निरखून लक्षणं पाहिलीं. भूतबाधा आहे यांत तर कांहींच शंका नाहीं. तेव्हां आपले उपाय करा म्हणत असाल तर करतों. मात्र आपण सगळे अगदीं स्वस्थ बसाल तर सर्व कांहीं ठीक व्यवस्था लागेल.

**सर्वजण:**— आम्ही अगदीं स्वस्थ बसतों. तुमच्या कामाला तुम्ही लागा.

**पंचाक्षरीबोआ:**— भिमाताई, तें माझ्याबरोबर आणलेलं सगळं साहित्य आण पाहूं.

**विश्वंभरबोआ:**— अहो, माझं ऐका. हें लहानसहान भूत नाहीं.—

**भूत नावरे कोणासी । पुंडलिकें खिळिलें त्यासी ॥**

तें हें भूत आहे. यांच्या मंत्रांतंत्रांनीं जाणारं भूत नाहीं. तुम्ही भाग्यवान्, देव तुमच्या घरीं वावरत होता !

**गिरिजाबाई:**— म्हाळसाबाई, तुम्ही आणखी तुमच्यामुळें हें सगळं कऱ्हाड आज धन्य झालं.

**म्हाळसाबाई:**— बरं. बरं. या संताळ्यांच्या गोष्टी नकोत मला. विठोबा येतो आहे माझ्या सुनेचं रूप घेऊन माझ्या घरांत वावरायला ! पंचाक्षरीबोआ, चालूं द्या हो तुमचं.

**महिपतनाथ:**— काय गोंधळ माजला आहे कांहीं समजत नाहीं बोवा

**श्रीपतराव:**— खरंच बोआ, सखू म्हणते तें सारं खरं असलं तर मोठाच चमत्कार म्हणायचा !

**पंचाक्षरीबोआ:**— मग काय ? तुमचीं हीं चमत्काराचीं बोलणींच चालणार कीं मला माझे उपाय करूं देणार ?

**म्हाळसाबाई:**— तुम्ही यांच्या बोलण्याकडे मुळींच लक्ष देऊं नका हो. तुम्हांला मीं बोलावलं आहे, तुमचे आपले उपाय चालूं द्या.

**पंचाक्षरी:**— अस्सा. अस्सा कांहीं तरी एक निर्धार असूं द्या. एवढ्या कामांत तुम्ही या तुमच्या भिमाताईचा कित्ता उचला. अहो तुम्हीच विचार करा, केरवारा, झाडलोट, पाणी आणणं, लुगडीं धुणं हीं बायकांचीं सगळीं कामं करण्याइतका तो तुमचा विठोबा वेडा का आहे ! हीं कामं भुतांचीं आहेत. इतकं तुम्हांला समजूं नये ? असलीं भिकार कामं जर त्यानं स्वतः केलीं तर भुतंन् खेतं त्यानं जन्माला घातलीं कशाला ? कांहीं विचार करा. हा शुद्ध भुताटकीचा प्रकार आहे ! मी सांगतों तुम्हांला, हीं मुलगी मोठी नक्षत्रसारखी आहे, तेव्हां हिच्या अंगांत संचार करून आपली राहिलेली वासना तृप्त करून घेण्याकरितां कोणीं तरी अपघातानं मेलेल्या तरुण स्त्रीनं हिला धरली आहेन् दुसरं काय ? अशा माझ्याकडे पुष्कळ बाया येतात. अहो, या पोरीसोरी वेळीं अवेळीं गंगेच्या कांठीं जातात, तिथें कधीं आस्रा असतात, कधीं जवळच्या स्मशानांतल्याच नुकत्याच हडळी झालेल्या स्त्रिया येतात, कधीं नुकतेच मेलेले पुरुष ब्रह्मसमंध होऊन बसतात. ही एखाद्या दिवशीं अशी एकटी जायला, आणखी नुकतीच मेलेली, सगळ्या आशा राहिलेली अशी एखादी तरुण मुलगी हडळ होऊन वावरतांना तिची हिच्यावर दृष्टि जायला एकच गांठ पडली, तिनं पछाडलं आहे हिला, दुसरं काय ? नवऱ्यांनीं बाहेरच्या नादामुळें ज्यांना टाकल्या आहेत, त्या लवकर तरुणपणींच मेल्या तर त्या अशा हडळी होऊन दुसऱ्या मुलींना पछाडतात आणखी...( डोळे मिचकावीत भिमीकडे पहातात, सर्वजणही साहजिक तिच्याकडे पाहतात. )

**भीमा:–** ( अंगालून पण तिरस्कारानें ) पुरे हो तुमचं दंडीबोआ ! काय उपाय करायचं ते चालूं द्या

**दंडीबोआ:–** चालवणारच. आतां मी या मुलीच्या अंगांतलं भूत काढल्याखेरीज कांहीं परत जात नाहीं. कसलंही जबर भूत असलं तरी त्याचं चांगलं दंडण करून त्याला पक्कं गाडून टाकतों, म्हणून तर मला दंडीबोआ दंडीबोआ म्हणून जें तें आदरानं बोलावतं. माझ्याइतका जबर भूतमंत्री आहे कोण ? उगीच का माझ्या इथं शेंकडों बावळे पुरुष येतात आणखी नादी बायका संध्याकाळपासून सकाळपर्यंत खेटे घालतात त्या ! आज गांवांत तपास करा. माझ्यामुळें कितीक बायका लेंकुरवाळ्या झाल्या आहेत ! बरं पण तें जाऊं द्या. भिमाताई, हें भूत काढायच्या साहित्याचं सूप आणलंत ना ? का कोणाच्या अंगांत भूत घालायच्या साहित्याचं सूप आणलंत ? तुमच्या नेहमीच्या ओळखीचं तें सूप आहे म्हणून विचारतों. घालीन, घालीन. तुम्हीं सांगितलेल्या त्या भागीच्या अंगांत एखादी हडळ खिळवीन. तुम्ही धीर सोडूं नका. मी नुसता भूतच काढीत नाहीं. ज्याला भूतबाधा व्हावी असं मला वाटेल त्यांच्या अंगांत भुतांचा संचार दिखील करतों. आजपर्यंत नवऱ्यांनीं टाकलेल्या बायकांकरितां मीं कितीक दुसऱ्या बायकांना भूतबाधा करवली आहे. अहो, भुतांना कोठें तरी नेहमीं जागा लागते. तेव्हां हिचं काढावं तिच्या अंगांत घालावं. आजच आतां चमत्कार पहा, या सखूबाईच्या अंगांतलं भूत काढतों आणखी भिमाताईच्या नवऱ्याच्या त्या भागीच्या अंगांत. बरं पण तें कशाला इथं आतां सांगूं. भिमाताई, तुम्हाला या कामांतली सगळी माहिती आहे. या अशा माझ्या मदतीला पाहूं. या. आणा ती धुपाटी. ( धुपाटी आणल्यावर तिच्यावर धूप घालून ) म्हाळसाबाई, आतां आधीं तुमच्या सुनेच्या अंगांत आल्यावर तिनं आपल्या कोणाच्या अंगावर धांवून येऊं नये म्हणून मर्यादा घालून टाकतो. अहो, हीं भुतं मोठीं विलक्षण असतात ! त्यांनीं एकदां झाडाला धरलं कीं आपल्याला पाहिजे तसं त्याला नाचवतात. तेव्हां यांच्या नाचण्याला आधीं मर्यादा घातली पाहिजे. आतां

जास्त कांहीं बोलत नाहीं. नाहीं तर म्हणाल की, हे दंडीबोआ नुसती बडबडच करतात.

( सखूच्या भोंवतीं प्रदक्षिणा घालीत छडीनें तिच्याभोंवतीं एक रेघ ओढतात व तोंडानें मंत्र म्हणतात. )

**अमुं मंत्रं पूर्वसेवापूतं जप्त्वा उक्तयोगाभिमंत्रेण सिद्धिः ओं ऱ्हीं चिलि चिलि छिंधि छिंधि हन हन । ओं ऱ्हीं ऱ्हीं ऱ्हूम् ऱ्हूम् चिलि चिलि छिंधि चिलि छिंधि छिंधि ॥**

हे पहा माझे मंत्र. हे मुसलमानी बीरमंत्र नव्हेत बरं ! हे अस्सल संस्कृत ग्रंथांतले आहेत. आमचे गुरु महाकापालिक मुंडमालामंडित. त्यांचे मंत्र म्हणजे काय ! त्यांनीं ही सिद्धि मला दिली ! ओं ऱ्हीं ऱ्हूं चिलि चिलि छिंधि छिंधि चिलि चिलि ऱ्हें फ्लें कें म् इति न्यासः हा न्यास झाला, बरं कां ? पण आतां तुम्हांला सगळ्यांना हें सांगून काय समजायचं आहे ! आतां तुम्हांला एक विचारतों मी. आपला सगळ्यांत जालीम मंत्र आहे त्याचा उपयोग एकदम करूं की आधीं दुसरे तिसरे पाहूं ? मात्र त्या मंत्राला जरा बराच खर्च लागेल. एक शेंकडा तरी निदान.

**म्हाळसाबाई:**— शेंकडा ! शेंकडा कशाला हो !......

**भीमा:**— अग पण काकू, तूं आपली हो म्हणून त्यांची करामत तर बघ.

**दिगंबरपंत:**— चालूं द्या हो ! शेंकडा नाहीं दोन शेंकडे माझ्याकडून.

**दंडीबोआ:**— ठीक आहे. आतां मी विचारतों तें सांगा. मला माझ्या मंत्रसामर्थ्यानं कळलंच आहे म्हणा. पण तुम्हांला विचारतों, हिला कधीं बांधून ठेवली होती का तुम्हीं याच्यापूर्वीं ? ठेवली असली पाहिजे. आणखी मारली का ? हो खरं सांगा. त्या स्थितींत हिला भुतानं पछाडली आहे.

**भीमा:**— मी सांगतें हो. बांधली होतीन् त्या वेळीं मारलीही होती.

**दंडीबोआ:**— झालं तर. तशी पुनः हिला बांधली पाहिजे. बांधली नाहीं तरी चालेल; कारण मीं हिला मर्यादेंत घातली आहे. पण चांगली

झोडपली पाहिजे. हिला प्रेतदशा आणली पाहिजे. तिच्या अंगांत संचारलेलीं भुतं प्रेतदशेसेरीज संचार करावयाचीं नाहींत आणि निर्गमनही करायचीं नाहींत. आतां माझ्या सगळं ध्यानांत आलं. आतां ज्याला कोणाला माझं करणं पाहवावयाचं नाहीं, त्यानं बाहेर जावं. म्हाळसाबाई, आपण माझ्याजवळ मला मदत करायला या. तुमच्या तें अंगवळणीं पडलेलं आहे. भिऊं नका. आपल्याला भुतं कांहीं करणार नाहींत. उलटीं पळून जातील. भिमाबाई, तुम्ही अशा दुसऱ्या बाजूला या.

**दिगंबरपंतः**– अहो, मारण्याबिरण्याचा प्रसंग नाहीं हो मी होऊं देणार. तें कांहीं—

**म्हाळसाबाईः**– गप्प बैस पोरा. अगदींच बावळट झालं.

**महिपतराव**
**श्रीपतराव** } :– अहो म्हाळसाकाकू, हें काय हें ?

**म्हाळसाबाईः**– दंडीबोआ, तुम्ही कोणाच्या बोलण्याकडे लक्ष देऊं नका हो ! तुमचं चालूं द्या. ही मी येतें तुमच्या मदतीला दुसरी काठी घेऊन. मला भूत कांहीं करायचं नाहीं.

**महिपतरावः**– (श्रीपतरावास एकीकडे)भुताला भूत काय करणार बोआ !

**श्रीपतरावः**– खरंच बोआ ! ही भुतालाच तोंडांत टाकायची.

( पंचाक्षरी व म्हाळसाबाई छड्या सरसावून पुढें होतात. भीमाही उडदांचा द्रोण घेऊन जवळ जाते. )

**चंद्रभागाः**– देवा ! आतां सखूचं काय होणार !

**अनसूयाः**– माझ्या तर अंगावर शहारे येताहेत !

**विश्वंभरबोआः**–अहो हें काय करतां ? देवाची जिच्यावर पूर्ण कृपा, जिच्याकरितां देव तुमच्या घरांत राबला, तिचा असा व्यर्थ छळ करूं नका.

**गिरिजाबाईः**– म्हाळसाबाई, नाहीं हो नाहीं, हें चांगलं नाहीं ! देव याची उपेक्षा करणार नाहीं !

**म्हाळसाबाईः**– गप्प बैस थेरडे. येऊं दे देव माझं काय करतो आहे तें करायला.



सखूबाई:--- अहो, हीं पहा, हीं पहा मला पछाडणारीं भुतं माझ्या हांकेला धांवलीं!

[ पृष्ठ ११७.

दंडीबोआ:– अहो, जरा थांबा आणखी काय होतं आहे तें पहा. देवाचं इथें काय काम ? सगळा भुतांचा प्रपंच आहे. माझी करामत तर पाहा. मग तुम्हीच म्हणाल कीं वारे दंडीबोआ !

गदाधरपंत:– अरे हें काय करतां ?

म्हाळसाबाई:– गप्प बसा हो तुम्ही. दंडीबोआ तुमचं आपलं चालूं द्या.

दंडीबोआ:– ठीक आहे; मी आतां मंत्राचं एक एक अक्षर म्हणतों, आणखी हिला एक एक रट्टा हाणतों, तुम्हीही हाणीत जा. ( छडी उगारून ) बोल, बोल. कोणत्या भुतानं तुला पछाडलं आहे ? बोल. घे नांव.

सखूबाई:– ( अत्यंत करुणस्वरानें ) विठ्ठला, पांडुरंगा धांव रे धांव.

पद.

कशि न ये दया तुला । दीनबंधु विठ्ठला ॥
भवार्णवीं या लोटिसि फिरुनी मातेकरवीं कां मला ॥ १ ॥
स्वप्निं दिला परि साच न ठरला आशीर्वाद जो मला ॥ २ ॥
त्वत्पदकमलीं नेउनि पुनरपि समाधिसुख तें दे मला ॥ ३ ॥

अहो, ज्या भुतानं मला पछाडलं आहे त्याचं नांव तर मी रात्रंदिवस घेतें आहें. आणखी काय त्याचं नांव काय घेऊं ! देवा, हे विश्वंभरबोआ म्हणतात, मला पंढरीला पाठवून तूंच माझं रूप घेऊन इथें घरांत राबलास ! मग आतांच कां रे माझ्या हांकेसरसा येत नाहींस ? आई रुक्मिणी, तूंच ना मला, " जा, तुझा संसार सुखाचा होईल. " असं सांगून इकडे पाठवलंस ? देवा ! पंढरीनाथा ! तूं आहेस तरी कुठें ? मला आतां हा मार सोसवणार नाहीं. धांव, धांव, निर्दया धांव. आतां, नको उपेक्षा करूं; ( तिच्या डोळ्यांपुढें विठोबा व रुक्मिणी दिसतात. ) अहो, हीं पहा, हीं पहा मला पछाडणारीं भुतें माझ्या हांकेला धांवलीं ! ( एकदम हंसून )

हें भूत लागलें हो । हें भूत लागलें हो ॥
भूत राहतें वैकुंठपुरीं । तेंची आलें भीमातिरीं ॥
भूत विटेवरी सांवळें । तें जन पाहाती सकळ ॥

( आनंदानें नाचूं लागते. )

विश्वंभरबोआः– हिला विठोबारखुमाईनी दर्शन दिलं वाटतं. वाहवा! धन्य आहे. ( नमस्कार करतो. )

सखूबाईः– हें पहा.

पद.

विश्वपती लगबगा । हरि हा आला ।
संकटसमयाला । हृदयीं जो ठेला ।
माझा देव सांवळा । अर्पिली तनु ही ज्याला ॥ १ ॥
ही माय रमा ये पहा । महाभूताला ।
घेउनि सदनाला । मदीय अवनाला ।
किती कष्ट जिवाला । देखुनि जिव गहिंवरला ॥ २ ॥

गिरिजाबाईः– खरंच, असंच असलं पाहिजे.

( बाकी सर्वजण " काय बोआ ! आपल्याला कांहीं दिसत नाहीं. " असे उद्गार काढीत आपल्याशीं चमत्कारतात. )

दंडीबोआः– पाहिलंत, पाहिलंत माझ्या सिद्धीचा प्रभाव ! हिला तिचीं भुतं दिसूं लागलीं. तरी अजून नुसती छडी मारली ! आतां मी आमच्या कक्षापुटींतला थोरला मंत्र म्हणतों. म्हाळसाबाई, त्यांतल्या प्रत्येक शब्दागणिक, तुम्हीन् मी रद्दा मारूं, आणखी भिमाताई, तुम्ही उडीद फेंका. आधीं या धुपार्तीवर धूप घाला.

[ दंडीबोआ व म्हाळसाबाई छड्या उगारून सखूच्या अंगाजवळ नेतात. भीमा उडीद मारायला हात वर करते व दंडीबोआ ओं व्लें फ्लें न्हीं असें उच्चारतात. तोंच त्या तिघांस धक्का बसल्याप्रमाणे होऊन तीं खालीं पडतात. व विव्हळूं लागतात. ]

म्हाळसाबाईः– अयाई ! माझ्या पोटांत एकदम कोणीं लाथ मारली अन् अंगाला तर आग लागल्यासारखं झालं हो ! हाय ! हाय !

भीमाः–काकू,माझ्या तर सगळ्या अंगाला कळा लागल्या.अयाई, अयाई!

दंडीबोआः– अहो, माझे तर डोळे गेले हो ! आणखी सगळ्या अंगाला ठिकठिकाणीं विंचू डसल्यासारख्या वेदना होऊं लागल्या आहेत !

[ इतक्यांत पडद्यांत आकाशवाणी होते. ]

ओंव्या.

गिरिजेचें रूप धरोनि । सखूसि दिधलें सोडुनी । स्वयें मग सखू बनूनी । तत्पतीसी तोषाविलें ॥ गरुडें वाट दाखविली सखूस।

ती गेली पंढरी नगरीस । येवोनि माझ्या राउळास । पायीं मिठी घातली ॥ माझे चरणा वाहिला । सखूनें प्राण आपुला ॥ ब्राह्मणीं तद्देह जाळिला ॥ सर्वथा सत्य हें असो ॥ परि रुक्मिणीनें तिजला । पुनः घालुनि जन्माला ॥ दिधलें लावूनि कऱ्हाडाला । करावया संसार ॥

**म्हाळसाबाई** } :— आम्हीं व्यर्थ तुझा छळ केला, आतां या यातनां-
**भीमा** } तून सोडीव आम्हांला. ( सखूचे पाय धरूं लागतात. परंतु सखू त्यांस तसें करूं न देतां उठविते. तिचा हात लागतांच त्या व्यथाहीन होतात. )

**पंचाक्षरी**:— अहो सखूबाईला ! माझे डोळे गेले हो ! आपण खास प्रत्यक्ष देव आहांत, सोडवा या यातनांतून ! भूतबीत कांहीं नाहीं. मला सोडवा सोडवा ! ही पोटाची खळगी भरण्याकरितां हें माझं पंचाक्षरीपणाचं सोंग आहे. मी आजपर्यंत कितीक स्त्रीपुरुषांना नाडीं लावून नाडलं. दुसरं काय ? ( सखूबाईचे पाय धरतो. )

**सखूबाई**:— हें काय हें ? आपण माझ्या काय पायां पडतां ? त्या दीनदयाळ प्रभूला शरण जा म्हणजे तो आपल्या सगळ्यानाच या यातनांतून मुक्त करील. ( सखूनें स्पर्श करतांच त्याच्या यातना नाहींशा होतात. )

**दिगंबरपंत**:— हिच्या रूपानं देवांनीं माझी सेवा केली काय ? हिची योग्यता इतकी थोर अं ! खरोखर आम्हीं सर्व मूढ, अंध ! हिला बांधलेली सोडवायला गेलों त्या वेळेपासून मला हिच्याबद्दल कांहीं चमत्कारिक वाटे. ही माझी बायको दिसते, परंतु खरोखर देवता आहे असा मला भास होई. पण तें कायम राहिलं नाहीं. अरेरे ! काय माझ्या हातून अपराध घडले. ( तिचे पाय धरण्यास वांकतो. ) क्षमा कर, क्षमा कर.

**सखूबाई**:— हें काय हें ? माझ्या काय पायां पडायचं ! ( असें म्हणून त्याला उठवित. )

**गिरिजाबाई**:— ( सखूचे पाय धरून ) हे महासाध्वी, तूं आम्हां सर्वांना पावन केलेस.

**सखूबाई**:— हाय ! देवा, या पामराकरितां आपण किती श्रम घेतलेत !

**गदाधरपंत**:— आतां तूंच आमचेवर कृपा कर व आम्हांला त्या परात्पर मूर्तीचं दर्शन करीव.

**म्हाळसाबाई**:— अरे, अरे, अगे, देव अगदीं जवळ असून सुद्धां पाण्याला दिसत नाहीं असं म्हणतात तें किती खरं आहे ! एवढ्यासाठीं

कधीं कोणाला छळूं नये तें चांगलं. सखू, तूं धन्य आहेस. तूच आता आमचा उद्धार कर !

**विश्वंभरबोआ:**— अहो गदाधरपंत, म्हाळसाबाई व दिगंबरपंत, तुमचं कुळ आज धन्य झालं ! सगळं कऱ्हाड धन्य झालं! प्रत्यक्ष देव तुमच्या घरीं तुमच्या सुनेकरितां म्हणजे आपल्या भक्ताकरितां राबला, याबद्दल आतां तर कांहीं संशय नाहीं ना ? हे साध्वी, तूं देवरूपी असून पूज्य आहेस आणि आम्हां सर्वांना व या कऱ्हाड नगरीला धन्य केलेस, आतां तुझ्यापाशीं एवढीच विनंति आहे कीं, त्या परात्पर वैकुंठवासी प्रभूचं आम्हां पाप्यांना एकवार तरी दर्शन करीव म्हणजे आपण सगळे पावन होऊं.

**सखूबाई:**— मीं पामरानं काय करायचं आहे ! आपण सर्वच हरि-चरणीं शरण जाऊन त्याचं भजन करूं म्हणजे तो दीनदयाळ आपली इच्छा पुरवील. ( भजन करूं लागते. )

**अभंग.**

श्रीअनंता मधुसूदना । पद्मनाभा नारायणा । जगद्व्यापक जनार्दना । आनंदघना अविनाशा ॥ १ ॥ चक्रधरा विश्वंभरा । गरुड-ध्वजा करुणाकरा । सहस्रकरा क्षीरसागरा । शेषशायना ॥ २ ॥

**नामस्मरण.**

लक्ष्मी शारंगधर सीतापति रघुवीर ॥ राधागोविंद । रखुमाई पांडुरंग ॥ जय जय विठ्ठल—जय हरि विठ्ठल ॥ १ ॥

( सव मंडळी भजन करतात; व एकदम वैकुंठाचा देखावा दिसतो. )

**भरतवाक्य.**

[ भैरवी—त्रि. र. गम. ]

जय मुरहर कमलावरा ।

ध्रो मुनिगण बहु आळविती नमुनि अनुदिन तुजा ॥ वरदा श्रीभूमाधर ॥ ध्रु० ॥ जय मुरहर कमलावरा । वसुधा सदा सुखसमृद्ध होवो । सुखवुनि जना नरपति । विषमपणा । वर्जुनियां दुखवु नच सुजन तया ॥ देई आरोग्या । भवभय नेई लया । विनंति करूं तुज करुणेश्वरा ॥

[ समाप्त ]